ई/269


DECCAN ... POONA

E
145

इ-130
00930

# लहान मुलांचा महाराष्ट्र.

गो. अ. मोडक.




पुना फिओवर्क्स ५८९ सदाशिव.

Received on 2/8/21
No 13 of 1921/22
ई/२६

# लहान मुलांचा महाराष्ट्र

( मराठ्यांचा गोष्टीरूप इतिहास )

लेखक,

गोविंद अनंत मोडक, बी. ए.

---

प्रकाशक

लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर,

बुधवार चौक, पुणें.

---

मुद्रकः—लक्ष्मण भाऊ कोकाटे, "हनुमान छापखाना"

घ. नं. ३०० सदाशिव, पुणें.

---

प्रथमावृत्ति-१९२१.

किंमत पांच आणे.

# प्रस्तावना.

१ आपल्याकडील मुलें इतिहास शिकण्यास आरंभ करितात, तो महाराष्ट्राच्या इतिहासापासून करितात. अशा मुलांचा इतिहास विषयांत सुलभ व मनोरंजक रीतीनें प्रवेश करून द्यावा या हेतूनें हा 'लहान मुलांचा महाराष्ट्र' लिहिला आहे. यांतील बहुतेक प्रकरणें मुलांच्या महाराष्ट्राचे संक्षेप आहेत. कांहीं थोडीं प्रकरणें नवीन लिहावीं लागलीं. पुस्तकास महाराष्ट्राचा एक नकाशा व सनावली जोडिलीं आहेत. ज्ञान स्पष्ट व स्थिर होण्यास त्यांचा उपयोग होईल.

२ हें पुस्तक शिकवितांना खालील गोष्टी अमलांत आणल्यास सोईचें होईल.

क पहिलें व चौथें प्रकरण तपशीलवार शिकवावयाचीं तीं इतर सर्व प्रकरणें शिकवून झाल्यावर शिकवावीं.

ख कोणतीही गोष्ट वर्गांत संभाषण पद्धतीनें पहिल्यानें शिकवावी.

ग नंतर गोष्टींत कांहीं कठीण शब्द असल्यास त्यांचा मुलांस परिचय करून द्यावा; किंवा संभाषण चालू असतां ते शब्द त्यांत आणून ते मुलांस परिचित करून द्यावेत.

घ मग गोष्ट मुलांकडून वाचून घ्यावी.

ङ कित्येक गोष्टींत पत्रांतील उतारे आहेत. त्यांचा अर्थ मुलांस नीट सांगावा व ते त्यांजकडून चांगले वाचून घ्यावेत. मुलांच्या मनांत ते उतारे महत्त्वाचे आहेत याची जाणीव व त्या उताऱ्यांची गोडी उत्पन्न करावी. उदाहरणार्थः— शाबास ! शिंदे होळकर, शाबास ! या गोष्टींतील बाळाजी बाजीरावाच्या पत्रांतील उतारा अशा रीतीनें तयार करून घ्यावा.

च संभाषणाच्या वेळीं चित्रांचा व नकाशांचा उपयोग करावा.

३ पुस्तकांत चित्रें व कित्येक प्रसंगांचे नकाशे घालावयाचे फार मनांत होतें; परंतु द्रव्यदृष्ट्या व कालदृष्ट्या या सर्वच गोष्टी एकदम करणें अशक्य झालें; तथापि हा प्रयत्न उपयुक्त ठरल्यास पुढील आवृत्तींत या गोष्टी सहज करतां येतील अशी उमेद आहे. हें पुस्तक लहान मुलांस उपयुक्त होवो येवढीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

पुणें, वैशाख वद्य ११ }
गुरुवार, शके १८४३. }

गोविंद अनंत मोडक.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १ उपोद्घात. | १ |
| २ शूर चांदबिबी व हुशार मलिकंबर. | ३ |
| ३ भोंसले घराण्याचा उदय. | ५ |
| ४ शहाजीची कर्तबगारी. | ७ |
| ५ शिवबाचें बाल्पण. | ९ |
| ६ स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी. | १२ |
| ७ स्वराज्य स्थापना. | १४ |
| ८ शहाजीची कैद. | १६ |
| ९ अफजलखानाचा वध. | १८ |
| १० बाजी प्रभूचा पराक्रम. | २१ |
| ११ शाएस्तेखानाची स्वारी. | २३ |
| १२ बादशहाशीं समेट. | २६ |
| १३ कपटानें धरलें पण युक्तीनें सुटले. | २८ |
| १४ स्वराज्यव्यवस्था. | ३१ |
| १५ गड आला पण सिंह गेला. | ३३ |
| १६ दोन मोठ्या लढाया. | ३५ |
| १७ राज्याभिषेक. | ३८ |
| १८ दक्षिण दिग्विजय. | ४० |
| १९ मराठी राज्यावरील अरिष्ट. | ४२ |
| २० स्थलांतर. | ४५ |
| २१ जगण्यासाठीं पराकाष्ठा. | ४७ |
| २२ मराठी राज्यांत दुही. | ५० |
| २३ बाळाजी विश्वनाथास पेशवाई कशी मिळाली. | ५२ |
| २४ मराठी राज्याच्या वाढीची तयारी. | ५४ |
| २५ निजामाचा मोड. | ५७ |
| २६ शिंदे होळकरांचा उदय. | ५९ |
| २७ गजेंद्रमोक्ष. | ६१ |
| २८ कोल्हापूरकर संभाजी समेट. | ६३ |
| २९ आपसांत लढाई. | ६५ |
| ३० बाजीरावाची धडाडी. | ६७ |
| ३१ माझें मस्तक तरी किल्ल्यांत पडूं दे. | ७० |
| ३२ आतां हिंदुमुसलमानांनीं एक झालें पाहिजे. | ७२ |
| ३३ माळव्याची सनद. | ७३ |
| ३४ आधीं एकी मग मुलूखगिरी. | ७५ |
| ३५ शाहूचा मृत्यु. | ७७ |
| ३६ राज्यव्यवस्था. | ७९ |
| ३७ शाबास! शिंदेहोळकर, शाबास! | ८१ |
| ३८ राघोबाची हिंदुस्थानांत पहिली भरारी. | ८३ |
| ३९ शिंद्यांचे मारवाडांतील पराक्रम. | ८५ |
| ४० मराठी राज्याचा कर्नाटकांत विस्तार. | ८७ |
| ४१ भगवा झेंडा अटकेवर | |

| विषय | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| फडकतो ! | ९० | ५३ खड्र्यांची लढाई | ११६ |
| ४२ अर्धी दक्षिण सर झाली. | ९२ | ५४ सवाई माधवरावाचा मृत्यु. | ११८ |
| ४३ पानिपतचा घनघोर संग्राम. | ९४ | ५५ पेशवे परतंत्र झाले ! | १२० |
| ४४ राक्षसभुवनची लढाई. | ९७ | ५६ मराठी राज्याचा शेवट. | १२२ |
| ४५ माधवरावाचा दरारा | ९९ | ५७ सातारचे नामधारी छत्रपती. | १२४ |
| ४६ पानिपतचा सूड | १०२ | ५८ मराठी राज्य कां बुडालें ? | १२६ |
| ४७ दक्षिणचा दिवा मालवला ! हिरा हरपला ! | १०४ | ५९ मराठी राज्याची अन्तर्व्यवस्था. | १२८ |
| ४८ ‘ध’ चा ‘मा’ | १०६ | | |
| ४९ बारभाई | १०८ | | |
| ५० इंग्रजांशीं लढाई | ११० | | |
| ५१ भाग्यवान् सवाई माधवराव पेशवे | ११२ | | |
| ५२ महादजी शिंद्याचा उत्कर्ष | ११४ | | |

परिशिष्टें.

| | |
|---|---|
| १ सनावली. | १–२ |
| २ कठिण शब्दांचा कोश: | १–२ |

छापतांना कानेमात्रा उडून चुका झाल्या आहेत. परंतु त्या सहज समजण्यासारख्या आहेत. खालीं दिलेल्या चुका काढून टाकून मग पुस्तक वाचावें.

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २० | ८ | म्हणून | म्हणून तो |
| ४० | ८ | परक्रमी | पराक्रमी |
| ५२ | १४ | श्रीवधर्नचा | श्रीवर्धनचा |
| ५७ | २२ | ङत्पन्न | उत्पन्न |
| ६७ | १३ | भुरभुरे | भुरभुरे |
| ६७ | २३ | समुदांत | समुद्रांत |
| ६८ | १३ | मानजीला | मानाजीला |
| ८४ | ६ | सुराजलम | सुराजमल |
| १२६ | १९ | असे तीन | तीन |

VERNACULAR TRANSLATION SOCIETY POONA 1894

# लहान मुलांचा महाराष्ट्र.

## उपोद्घात.

१ उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस आरबी समुद्र, ईशान्येच्या टोंकास असलेल्या नागपूर शहरापासून नैर्ऋत्येच्या गोवें शहरापर्यंत असलेली एक वांकडीतिकडी रेघ ह्याच आपल्या महाराष्ट्रदेशाच्या ठोकळ मर्यादा होत. पूर्वी या देशांत शालिवाहन वंशांतील राजे राज्य करीत होते. त्यांचे राजधानीचें शहर गोदावरी नदीच्या कांठचें पैठण हें होतें. या राजांच्या नांवावरून आलेला शालिवाहन शक अजूनही महाराष्ट्रांत चालू आहे. या राजांनीं सन २१८ पर्यंत राज्य केलें. यांच्या मागून सुमारें तीन शतकेंपर्यंत कोणीं राज्य केलें हें प्रसिद्ध नाहीं.

२ सन ५५० च्या सुमारास बदमींतील चालुक्यवंशाचे राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. या वंशांतील चौथा राजा पुलकेशी हा फारच पराक्रमी निघाला. सन ६२० त कनोजचा महत्त्वाकांक्षी राजा हर्ष हा बरोबर सैन्य घेऊन स्वतः महाराष्ट्रावर चाल करून आला. परंतु पुलकेशीपुढें त्याचें कांहीं न चालून त्यास तसेंच कनोजेस परत जावें लागलें. पुलकेशीची कीर्ति केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर इराणापर्यंत पसरली. इराणच्या राजानें पुलकेशीचा स्नेह संपादन करण्याकरितां त्याजकडे एक वकील पाठविला. पुलकेशीच्या मागून चालुक्यवंशाचे आणखी पांच राजे झाले.

३ सन ७७३ पासून राष्ट्रकूट वंशांतील राजे महाराष्ट्रावर राज्य

करूं लागले. या राष्ट्रकूट राजांची राजधानी मालखेड येथें होती. याच वंशाच्या कारकीर्दींत वेरूळचीं लेणीं खोदिलीं गेलीं. राष्ट्रकूटांनीं सन ९७३ पर्यंत राज्य केलें. या सालापासून फिरून चालुक्य घराण्याचा अम्मल सुरू झाला. या चालुक्य घराण्यानें सव्वादोनशें वर्षेंपर्यंत महाराष्ट्रांत राज्य केलें. यांची राजधानी मोगलाईतील कल्याण ही होती.

४ चालुक्यांच्या मागून सन ११९० त देवगड येथील यादववंशांतील राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. यादव वंशांत सिंवण यादव या नांवाचा मोठा पराक्रमी राजा झाला. त्यानें गुजराथ, माळवा इत्यादि भोंवतालच्या प्रांतांवर स्वाऱ्या करून राष्ट्रकूटांच्या ताब्यांत होता तितका मुलूख आपल्या ताब्यांत आणिला. सन १२७१ त रामदेवराव यादव हा गादीवर आला. त्याचा कारभारी हेमाद्री या नांवाचा महापंडित होता. त्यासच पुढें हेमाडपंत असें नांव पडलें. हा हेमाडपंत मोठा शूर असून बुद्धिमान् होता. त्यानेंच पहिल्यानें मोडी लिपी प्रचलित केली. रामदेवराव यादवाच्या कारकीर्दींतच ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ संपविला.

५ रामदेवराव राज्य करीत असतां दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीनें देवगडावर स्वारी केली. रामदेवरावाचा पराभव होऊन त्याला आल्लाउद्दिनास मोठी खंडणी भरावी लागली. फिरून अल्लाउद्दीन खिलजीचा सरदार मलिक काफूर देवगडावर चालून आला व त्यानें रामदेवरावास पकडून दिल्लीस नेलें. नियमितपणें खंडणी देण्याचें कबूल करून रामदेवरावानें दिल्लीहून आपली सुटका करून घेतली. रामदेवराव वारल्यावर त्याचा मुलगा शंकरदेव हा बापाप्रमाणें दिल्लीस खंडणी पाठवीना, म्हणून मलिक काफुरानें सन १३१२ त फिरून दक्षिणेवर स्वारी करून शंकरदेवास ठार केलें व यादवांचें राज्य खालसा केलें. यानंतर सात आठ वर्षांनीं रामदेवरावाचा जांवई हरपाळदेव यानें फिरून हिंदू राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. परंतु दिल्लीच्या मुबारीक खिलजीनें दक्षिणेंत येऊन

हरपाळास पकडून त्याचा वध केला. व तेव्हांपासून ( इ. स. १३१८ ) महाराष्ट्रांत मुसलमानांचा परकीय अम्मल चालू झाला !

---

## २ शूर चांदबिबी आणि हुशार मलिकंबर.

१ मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें सन १३१८ त महाराष्ट्रावर दिल्लीच्या मुसलमान सुलतानांचा अम्मल बसला; परंतु तो फार दिवस टिकला नाहीं. सन १३४७ त महाराष्ट्रांतील जाफरखान नांवाच्या मुसलमान सरदारानें बंड केलें व बेदर येथें आपली स्वतंत्र गादी स्थापिली. हा जाफरखान पूर्वी दिल्लीस एका गंगू नांवाच्या ब्राह्मणाचा गुलाम होता. ' तूं पुढें राजा होशील, ' असें भविष्य गंगूनें जाफरखानास सांगितलें होतें. त्यावेळीं जाफरखानानें ' मी राजा झाल्यास राज्यास तुमचें नांव ठेवीन ' असें कबूल केलें होतें. त्यावरून त्यानें बेदर येथें स्थापिलेल्या स्वतंत्र राज्यास ' ब्राह्मणी राज्य ' असें नांव दिलें, व गंगूस आपल्या खजिन्यावरील अधिकारी नेमिलें. या ब्राह्मणी राज्याचीं दीडशें वर्षांत पांच स्वतंत्र राज्यें झालीं. तीं सर्व मुसलमानांचींच होतीं. त्यांतील तीन प्रबळ होतीं. तीं अहमदनगरची निजामशाही, विजापूरची अदिलशाही, व गोवळकोंड्याची कुतुबशाही हीं होत.

२ यावेळीं दिल्लीस अकबर हा प्रसिद्ध मोंगल बादशहा राज्य करीत होता. त्यानें मोंगल साम्राज्याची दक्षिण सरहद्द नर्मदा नदीपर्यंत आणिलीच होती. आतां दक्षिणेकडील राज्यें जिंकून मोंगल साम्राज्य सबंध हिंदुस्थानवर पसरविण्याचा त्यानें बेत केला. पहिल्यानें निजामशाही राज्यावर हल्ला करून बराच मुलूख मिळवावा व शेवटीं तें राज्यच काबीज करावें असा अकबराचा विचार होता. त्याप्रमाणें त्यानें १५९६ त आपला मुलगा मुराद याच्या हाताखालीं अहमदनगरवर सैन्य पाठविलें.

त्यावेळीं निजामशहा लहान असून राज्यकारभर चांदबीबीच्या हातीं होता. चांदबिबी ही निजामशाही वंशांतीलच होती. तिचें लग्न विजापूरच्या अली अदिलशहाशीं झालें होतें. परंतु नवरा लवकरच वारल्यामुळें ती अहमदनगरास आपल्या माहेरींच राही. मुरादनें वेढा घातला तेव्हां चांदबिबीनें मोठ्या शौर्यानें नगरचें रक्षण केलें. तथापि तहाच्या वेळीं वऱ्हाडप्रांत मोंगलांस देणें भाग पडलें. पुनः १६०० सालीं मोंगल अहमदनगरावर चालून आले. तेव्हां मात्र शूर चांदबिबी मारली गेली व नगर मोगलांच्या हातीं पडलें, पण निजामशहाचे सर्व राज्य या वेळीं मोंगलाच्या हातीं पडलें नाहीं.

३ निजामशाहींत मलिकंबर नांवाचा पराक्रमी पुरुष प्रधान होता. त्यानें दौलताबाद ही राजधानी करून एका नवीन सुलतानाची गादीवर स्थापना केली, व एकसारखें तीस वर्षेंपर्यंत निजामशाहीचें रक्षण केलें. त्यानें जमिनीची मोजणी केली व वसुलाची चांगली व्यवस्था लावून दिली. त्यामुळें रयतेचें कल्याण झालें. यावेळीं दिल्लीच्या गादीवर मोंगल बादशहा जहांगीर होता. तो विलासी व चैनी असे. तेव्हां मोंगल सुभेदारांचे निजामशाहीचा मुलूख ताब्यांत आणण्याचे प्रयत्न शिथिल झाले, त्यामुळें मलिकंबराला चांगलेंच फावलें. शिवाय राज्यांत शूर मराठे सरदार मोठ्या फौजा बाळगून होते. त्यांच्या मदतीनें निजामशाहीच्या रक्षणाचें काम मलिकंबरला सहज करतां आलें. मलिकंबर सन १६२६ त मृत्यु पावला.

४ अशा रीतीनें मोंगलांच्या स्वाऱ्यांपासून शूर चांदबिबी व हुशार मलिकंबर यांनीं कांहीं काळपर्यंत निजामशाहीचें रक्षण केलें. त्यामुळें त्यांचीं नांवें महाराष्ट्राच्या इतिहासांत अढळ होऊन राहिलीं आहेत.

---

## ३ भोंसले घराण्याचा उदय.

१ निजामशाहींत मराठ्यांचीं दोन घराणीं विशेष प्रसिद्धीस आलीं. एक भोंसल्यांचें व दुसरें जाधवांचें. यांपैकीं जाधवांचें घराणें भोंसल्यांच्या आधींच मोठेपणास चढलें होतें. लुकजी जाधवराव हा दहा हजारांची मनसब चालवून एक बडा सरदार ह्मणून निजामशाहींत गाजत होता; तेव्हां मालोजी भोंसले वेरुळांत पाटिलकी करीत बसला होता. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षीं जाधवरावाच्या वतीनें मालोजी शिलेदारी करूं लागला. बरींच वर्षे गेलीं तरी त्यास मुलगा झाला नाहीं. तेव्हां नगरच्या किल्ल्यांत शहासरीफ पीर नांवाचें मोठें जागृत स्थान आहे असें ऐकल्यावरून त्याची स्त्री दिपाबाई हिनें त्या पिराला नवस केला. पुढें तिला दोन मुलगे झाले. हें त्या पिराच्या कृपेचें फळ होय, अशा समजुतीनें त्यांचीं नांवें शाहाजी व सरफजी अशीं ठेविलीं.

२ शहाजी रूपवान् होता व लहानपणापासून मधुर भाषण करण्याची त्याला संवय होती. जाधवराव यांचे घरीं एकदां रंगपंचमीचा समारंभ होता. नेहमींप्रमाणें मालोजी शहाजीला चांगला पोषाख घालून त्या समारंभाला घेऊन गेला. या वेळीं शहाजीचें वय पांच वर्षांचें होतें. तेथें जाधवरावाची मुलगी जिजाऊ ही आली होती. ती तीन वर्षांची होती. लहान मुलें एके ठिकाणीं आल्यावर त्यांचे खेळ सुरू होण्यास उशीर लागत नाहीं, हें सर्वांस ठाऊकच आहे. त्यास अनुसरून शहाजी व जिजाऊ एकमेकांच्या अंगावर रंग उडवूं लागलीं. हें पाहून जाधवरावानें जिजाऊला हांक मारून आपल्या मांडीवर घेतलें व शहाजीला दुसऱ्या मांडीवर बसविलें. त्यानें जिजाऊला विचारलें, " हा नवरा तुला पाहिजे का ? " व मग सर्व जमलेल्या मंडळीकडे पाहून तो म्हणाला, " उभयतां जोडा चांगला दिसतो. " तेव्हां सर्व सभाजन बसले होते त्यांना, " जाधवराव

काय बोलतात तें ऐका" असें मालोजी म्हणाला, नंतर मंडळी आपआपल्या घरीं निघून गेली.

३ पुढें जाधवराव जेवणाचें निमंत्रण करण्यास आला, तेव्हां मालोजीनें त्यास निक्षून सांगितलें कीं, 'आतां लग्नांत तुमचें आमचें भोजन होईल. आधीं व्हावयाचें नाहीं.' हें त्याचें निग्रहाचें बोलणें ऐकून जाधवराव मनांत चपापला, मग त्यानें मालोजीला बोलावून आणिलें व आपण बोललों तें थट्टेनें बोललों असें सांगून निरोप दिला.

४ जाधवराव बोलले तर खरेंच, पण आतां थट्टेवारी नेतात, तेव्हां मालोजीला चिंता पडली. शेवटीं त्यानें निश्चय केला कीं, जर नांवाचा मालोजी असेन, तर हरयत्न करून हें लग्न जमवून आणीन. मग मालोजी वेरुळास परत आला, व तेथें काय करावें या विचारांत तो होता. इतक्यांत त्याला आपल्या बागेंतील वारुळांत द्रव्य सांपडलें. तें नेऊन शेषाप्पा नाईक पुंडे ह्मणून एक भला गृहस्थ श्रीगोंदें येथें रहात होता त्याजकडे ठेविलें. मालोजीनें "घरीं घोडीं खरेदी करून पागा वाढविली, हजार पांचशें केलीं. श्रीशिखर महादेव येथें चैत्री यात्रा बहुत येई. पाण्यावांचून यात्रेस फार श्रम होतात, असें जाणून त्यानें मोठें तळें बांधिलें." श्रीवेरुळ येथील घुसृणेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला व शिवालयतीर्थ बांधिलें. अशीं लोकोपयोगी कृत्यें केलीं.

५ जगपाळराव निंबाळकर हा मालोजीचा मेहुणा होता; त्याच्या साहाय्यानें आपली पागा वाढवून मालोजी मोठमोठे पराक्रम करूं लागला. त्यानें एकदोन वेळां विजापूरकडील फौजेचे पराभव केले. निजामशहाच्या कारभाऱ्यांनीं मालोजीसारखा सेवक निजामशाहीस मिळावा ह्मणून खटपट चालविली. तेव्हां मालोजीनें आपली जाधवरावाविरुद्ध तक्रार तेथील मंडळीपुढें मांडिली. सर्व मंडळीची खात्री झाली कीं, जाधवरावानें वचन मोडलें, ह्मणून तो अपराधी आहे. पण त्याला शासन

करणें शक्य नव्हतें. गोड बोलूनच लग्न करून टाकण्याचा दरबारच्या मंडळींनीं विचार केला. नंतर जाधवरावास बोलावून आणिलें. तेव्हां त्यानें लग्न न करण्याचीं कारणें सांगितलीं, तीं ऐकून पातशहा बोलला, "मग कांहीं हरकत नाहीं; ही मी मालोजीस तुमच्या सवाई मनसब देतों." असें ह्मणून पांच हजार स्वारांची मनसब, राजे असा किताब, शिवनेरी व चाकण हे किल्ले आणि पुणें व सुपें हे प्रांत दिले. जाधवरावही मुलगी खुषीनें देण्यास तयार झाला. मग बादशहानें स्वतः जाऊन लग्नसमारंभ मोठ्या थाटानें साजरा केला.

---

## ४ शहाजीची कर्तबगारी.

१ मालोजी वारला ( सन १६१९ ) तेव्हां शहाजी सुमारें पंचवीस वर्षांचा होता. तो बापासारखाच शूर असल्यामुळें त्यास बापाच्या मृत्यूनंतर लागलीच मनसब मिळाली. शहाजी आपली मनसब करूं लागल्यास वर्ष होतें न होतें तोंच मोंगलांची धाड फिरून एकदां निजामशाही मुलखावर आली. ही धाड परतवून लावण्यांत मलिकंबरास शहाजीची फारच मदत झाली व त्याचें शहाजीवर अतिशयच प्रेम जडलें. तें इतकें कीं, पुढें थोड्याच दिवसांनीं शहाजीचा सासरा लुकजी जाधवराव याच्या मनांत मत्सर उत्पन्न होऊन त्यानें निजामशाहींतील आपली नोकरी सोडली आणि तो मोंगलांस जाऊन मिळाला.

२ मलिकंबर १६२६ त वारल्यावर राज्यांतील मुख्य सत्ता शहाजीच्या हातांत आली. हें मलिकंबराचा मुलगा फत्तेखान यास सहन झालें नाहीं. त्यानें जाधवरावाशीं सख्य केलें व मोंगलांस वश करून घेऊन शहाजीचा पुरता नाश करण्याचा बेत केला. जाधवराव व फत्तेखान हे मोंगलांची मदत घेऊन शहाजीवर चालून आले. तेव्हां त्यांजपुढें हटत हटत शहाजी कोंकणांत माहुली किल्ल्यांत उतरला व तेथें शत्रूशीं सहा

महिनें त्यानें टक्कर दिली. मग नाणें घाटानें तो देशावर आला. वाटेनें येतांना शत्रु त्याचा सारखा पाठलाग करीत होते. त्याची स्त्री जिजाबाई गरोदर होती, म्हणून तिला त्यानें शिवनेरी किल्ल्यांत ठेविलें.

३ मोंगलांनीं फत्तेखानास खुष करण्याकरितां कांहीं जहागीर दिली, त्यांत शहाजीचे कांहीं प्रांत होते. त्यामुळें शहाजीस राग आला व मोंगलांचा सरदार महाबतखान दौलताबादेस होता त्यावर विजापूरकरांच्या मदतीनें स्वारी करण्याचा शहाजीनें बेत केला. फत्तेखानासही त्यानें आपल्या बाजूकडे वळविलें. या युद्धांत मोंगलांना जय मिळाला. त्यांनीं फत्तेखान व निजामशहा या दोघांस कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत पाठविलें. (१६३३) याच स्वारींत एक गोष्ट घडली. ती शहाजीच्या अकलेचें उत्तम उदाहरण आहे.

४ एकदां फौजेचा मुक्काम भीमा—इंद्रायणीच्या संगमावर पडला होता. त्या दिवशीं सोमवार असून सूर्यग्रहण पडलें होतें. तेव्हां विजापूरचा सरदार मुरार जगदेव यानें उत्तम पर्वकाळ आहे असें पाहून सुवर्णतुळा दान केली. त्या प्रसंगीं हत्तीची तुळा कशी करावी हा प्रश्न निघाला; तेव्हां कोणाचीही मती चालेना. अशा वेळीं शहाजीनें युक्ति सुचविली:— "हत्ती नावेंत घालून नाव जितकी पाण्यांत बुडेल तेथें खूण करावी, हत्ता काढून द्रव्य त्यांत घालून खूण जमली म्हणजे तुळा झाली." मुरारपंत शहाजीवर फार खूष झाला, व त्यानें त्या गांवचें नांव 'नागरगांव' होतें तें बदलून 'तुळापूर' असें ठेविलें. तें अद्याप चालत आहे.

५ येणेंप्रमाणें मोंगलांचा जय झाला, तरी शहाजीनें आपला निजामशाही वांचविण्याचा प्रयत्न सोडला नाहीं. त्यानें अहमद निजामशाहाचे वंशांतील एका लहान मुलास गादीवर बसविलें, आणि त्याचा कारभारी म्हणून राज्यकारभार स्वतः चालविला. विजापूरकरांच्या मदतीनें त्यानें मोंगल सरदार महाबतखान याचा परिंडा येथें मोड करून त्याला खान-

देशांत हुसकावून दिलें. शहाजीस विजापुरकरांची मदत आहे हें पाहून दिल्लीचा शहाजहान बादशहा मोठें सैन्य बरोबर घेऊन स्वतः दक्षिणेंत आला. तेव्हां विजापूरकर शरण गेले व त्यांनीं मोंगलांची वरिष्ठ सत्ता कबूल केली ( १६३६ ).

६ मग मोंगल व विजापूरकर शहाजीवर चालून आले. त्यांस हुलकावण्या देऊन आपला मुलख स्वतंत्र राखण्याची चार पांच महिनें शहाजीनें शिकस्त केली. शेवटीं तो एकदां कल्याणजवळच्या माहुली किल्ल्यांत असतां शत्रूनें त्या किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें. त्यांत शहाजीनें शिवनेरी व इतर सहा किल्ले मोंगलांस देण्याचें मान्य करून निजामशहाच्या वंशजास त्यांच्या स्वाधीन केलें. शहाजीस पदरीं ठेवावयाचें व त्यास पुणें व सुपें या दोन परगण्यांची जहागीर द्यावयाची, या ठरावास विजापूरकरांनीं मान्यता दिली. यावेळीं कर्नाटकांत बंडें होत होतीं. विजापूरकरांनीं शहाजीची तिकडे रवानगी केली, व यापुढें त्या प्रांताचा बंदोबस्त करून शहाजी तिकडेच जवळ जवळ स्वतंत्र असा राहूं लागला.

---

## ५ शिवबाचें बालपण.

१ मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें मोंगल शहाजीचा पाठलाग करूं लागले; तेव्हां जिजाबाई गरोदर असल्यामुळें तीस त्यानें शिवनेरी किल्यावर बंदोबस्तानें ठेविलें. त्या संकटकाळीं तिनें तेथें किल्ल्यांवर असलेल्या शिवाई देवीला " मला मुलगा होऊं दे, मी त्याला तुझें नांव ठेवीन " असा नवस केला. तिला मुलगा झाला ( सन १६३० ); तेव्हां तिला फार आनंद झाला. हें देवीला केलेल्या नवसाचें फळ ह्मणून तिनें त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें.

२ शिवाजीचें लहानपण शिवनेरी किल्ला व त्याच्या जवळचा पुणेंप्रांत

यांतच गेलें. तेव्हां त्याची काळजी घेण्यास त्याची आई जिजाबाई हीच काय ती होती. जिजाबाईला माहेरचें सुख पहिल्यापासून नव्हतेंच. इकडे नवऱ्याकडून तिनें सुखाची आशा करावी तर शहाजीचें तिजशीं काय बिनसलें होतें कोणास ठाऊक ! त्यानें मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजशीं दुसरें लग्न केलें. पण ईश्वराची लीला अगाध आहे. त्यानें तिला जो मुलगा दिला होता, त्याची भक्ति तिजवर विलक्षण होती. नवऱ्याविषयीं किंवा बापाविषयीं स्मरण झालें कीं तिला दुःख होई; पण शिवाजी दिसला कीं तें दुःख पार कोठल्याकोठें विरघळून जाई. ती शिवाजीला जवळ बोलावून कधीं रामायणांतल्या तर कधीं महाभारतांतल्या वीरांच्या कथा सांगे. रावणाचें नांव निघालें कीं शिवाजी क्रोधानें लाल होई. रामाच्या वनवासानें त्याचें मन द्रवून जाई. "शत्रूचा नाश करून आपल्या कुळाचा उद्धार करणारा राजा आपल्या कुळांत निपजणार आहे म्हणून देवीचे दृष्टांत झाले आहेत, परंतु ते केव्हां खरे होतील कोण जाणे' असे उद्गार जिजाबाई केव्हां केव्हां काढी. आपल्या प्रिय आईचा उपदेश शिवाजीच्या मनांत सारखा घोळत असे. जिजाबाई हीच त्याचा पहिला गुरु होय.

३ त्याचा दुसरा गुरु म्हणजे शहाजीचा पुणेप्रांताचा कारभारी दादाजी कोंडदेव हा होय. दादाजी कोंडदेव फारच करारी होता. एके दिवशीं दादाजीनें सरकारी बागेंतील एक पाडाचा आंबा तोडिला, पण पुढें हा मालकाला न विचारतां तोडला म्हणून वाईट वाटून त्यानें ज्या हातानें तो आंबा तोडला होता तो हात तोडून टाकण्याचा निश्चय केला. शिवाजी व जवळची इतर मंडळी यांनीं असली कडक शिक्षा स्वतःस करून घेऊं नये म्हणून अत्यंत आग्रह केला. तेव्हां पंतानें फिरून अशी चूक आपल्या हातून होऊं नये म्हणून त्या हाताची अस्तनी जन्मभर लांडी ठेविली. त्यानें शिवाजीला घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, भाला मारणें, तर-

वार वगैरे हत्यारें उत्तम चालविणें इत्यादि राजपुत्रास अवश्य असें सर्व मर्दानी शिक्षण दिलें. शिवाय हिशेबी कामही शिवाजीस त्यानें शिकविलें. गांवांतील तंट्यांचा निवाडा प्रांतांतील मुख्य या नात्यानें दादाजी करी. हें काम चाले तेव्हां शिवाजी जवळच असल्यामुळें त्याला न्याय निवडण्याचीही माहिती मिळाली.

४ शिवाजी सुमारें तेरा वर्षांचा झाला तेव्हां शहाजीस त्याची भेट घेण्याची इच्छा झाली व त्यानें त्यास कांहीं दिवस विजापुरास नेलें. तेथें असतां आईच्या तोंडून ऐकलेलीं दुष्ट कृत्यें त्याच्या दृष्टीस पडूं लागलीं. या गोष्टी डोळ्यांनीं पाहून त्याचें अंतःकरण खवळून जाई व गोवध करणाऱ्यांना शिक्षा करून गोवध केव्हां बंद करीन असें त्यास होऊन जाई. एकदा शहाजीनें बादशहाच्या दर्शनास येण्याविषयीं शिवाजीस आग्रह केला. तेव्हां शिवाजीनें आपली नाखुषी दाखविली. तरी शहाजीनें अत्याग्रहानें एक दिवस शिवाजीस दरबारास नेलें. शहाजी रीतीप्रमाणें सलाम करून आपल्या जागीं जाऊन बसला; परंतु शिवाजी सलाम न करतां तसाच आपल्या जागीं जाऊन बसला. तेव्हां दरबारांत सर्वांस आश्चर्य वाटलें व जिकडे तिकडे चुळबुळ सुरू झाली. इतक्यांत प्रधान मुरारपंत ह्मणाला—“ लेंकरूं आहे, दरबार पाहून घाबरलें. त्याला लवकर दरबारांतून जाऊं द्या. ”

एके दिवशीं शिवाजी विजापुरांत हिंडत होता, तेव्हां एका कसायाच्या घरीं गाईचा वध होत असतां तिनें हंबरडा फोडला, तो त्यानें ऐकला. तेव्हां त्याला गाईची दया येऊन कसायाचा संताप आला. त्यानें कसायास धरून काठीनें मार दिला व गाईची किंमत कसायाच्या हातावर ठेवून त्यास घालविलें. शिवाजीची ही वागण्याची रीत पाहून शहाजी मोठ्या काळजींत पडला. शेवटीं याला कोठें तरी लांब ठेविला पाहिजे असा त्यानें विचार केला. दादाजी कोंडदेव हिशेब देण्यास विजापुरीं

आला होता, त्याजबरोबर शिवाजीस त्यानें पुण्यास परत पाठवून दिलें ( १६४३ ).

---

## ६. स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी.

१ निजामशाहींत गेलीं कित्येक वर्षें चाललेल्या गडबडीमुळें पुणें प्रांत अगदीं उजाड पडला होता तो भरभराटीस आणण्याची दादाजीनें खूप खटपट केली. मुलखांत लांडगे फार झाले होते, ह्मणून त्यानें लोकांस बाक्षेसें देऊं करून लांडगे मारून टाकविले. लोकांस कांहीं वर्षें साऱ्याची सूट देऊन जमिनी लागवडीस आणिल्या. या प्रांतांत राहणाऱ्या लोकांस मावळे ह्मणत. ते अडाणी दिसले तरी प्रामाणिक असून मोठे उद्योगी व चपळ असत. त्यांचें दादाजीनें एक पथक तयार केलें व गांवोगांव चौक्या पहारे बसवून चोरांची भीति नाहींशी केली. आपल्या हद्दींतील किल्ले दुरुस्त केले व त्यांजवर शिबंदी ठेवून दिली. या दादाजीच्या व्यवस्थेनें पुणें प्रांतांत शांतता नांदूं लागली व प्रजा सुखी झाली.

२ लहानपणीं रामायण व महाभारत या ग्रंथांच्या श्रवणानें शिवाजीची हिंदुधर्मावर पक्की भक्ति बसून गेली होती. तो जसजसा मोठा होऊं लागला तसतसें त्याला जास्तच समजूं लागले. गाई, ब्राह्मण व देव यांना तो पूज्य मानीत असे. त्यांचें संरक्षण आपल्या हातून झालें नाहीं तर आपला जन्म व्यर्थ होय असें वारंवार त्यास वाटे, व ही गोष्ट साध्य करण्यास आपण अधिकार मिळविला पाहिजे हेंही त्याच्या लक्षांत आलें. शेवटीं त्यानें निश्चय केला कीं, **धर्मरक्षणार्थ** प्राणहि गेला तरीं हरकत नाहीं, पण धर्मरक्षणाचा प्रयत्न करीन.

३ दादाजीच्या हाताखालीं श्यामराज निळकंठ, सोनोपंत वगैरे ताज्या दमाची तरुण मंडळी होती. शिवाजीनें पहिल्यानें या घरच्या मंडळींचीं मनें आपल्या बाजूकडे वळविलीं. शिवाय दादाजी शिवाजीस

प्रांतांत हिंडावयास घेऊन जावयास लागला होताच. तेव्हां डोंगरांत राहणाऱ्या मावळे लोकांपासून त्यानें त्या सर्व जागांची माहिती करून घेतली. यावेळींच तीन मावळे शिवाजीला अतिशय प्रिय झाले व ते जन्मभर त्याच्या प्रीतींत राहिले. ते तानाजी मालुसरा, बाजी पासलकर व येसाजी कंक हे होत. या सर्व लोकांची शिवाजीवर फारच भक्ति होती. एकदां शिवाजीनें विचारिलें, "आम्हीं कांहीं कार्य अंगावर घेतलें तर तुमची अनुकूलता कशी आहे ?" लोकांनीं उत्तर केलें, " महाराज, तुह्मा धणी कसे मायबाप आहां. तुमचे शब्द तेथें आमचें शीर. जी आज्ञा कराल ती मान्य. "

४ शिवाजी व त्याचे अनुयायी एकत्र जमत व पुढें काय करावें यासंबंधीं त्यांचीं बोलणीं होत. पुष्कळ बोलणीं झाल्यावर आपल्या भोंवतालचे देशमुख आपण आपल्या ताब्यांत आणले पाहिजेत असें ठरलें. मग तें कार्य करण्यास त्या मंडळींनीं आरंभ केला. प्रथम 'मी तुमचा ताबेदार आहें' असा कागद लिहून देण्यास देशमुखास ते विनंति करीत. गोडीनें कार्य होत नाहीं असें आढळून आल्यास धाकदपटशास सुरुवात होई. मग त्या कागद न लिहून देणाऱ्या देशमुखास अडून म्हणा उवड ह्मणा त्रास देत. अशा रीतीनें बारा मावळांतील देशमुख शिवाजीनें बांधून घेतले. दादाजीची शिवाजीस या कामीं मदत होतीच.

५ पुढें शिवाजी व त्याचे अत्यंत विश्वासू अनुयायी यांची 'हिंदवी राज्य' स्थापन करण्यासंबंधीं बोलणीं होऊं लागलीं. शेवटीं त्यांनीं राज्यस्थापना करण्याचें ठरविलें व शपथा घेतल्या. शिवाजीच्या नांवाची एक मुद्रा करण्यांत आली होती. या मसलतींत दादाजीपंत आदिकरून वृद्ध मंडळीही होती. केव्हां केव्हां या तरुण मंडळीच्या कृत्यांची हकीकत विजापूरच्या दरबारास कळत असे. एकदा रोहिडेश्वरच्या डोंगरावर तेथील कुळकर्णी स्वतंत्रपणें वागूं लागला. विजापूरच्या अंमलदारांना तो

वसूल देईना. तेव्हां विजापुराहून त्याला एक खरमरित हुकूम आला. त्या प्रसंगीं शिवाजीनें पत्र पाठवून त्यास धीर दिला. आपलें राज्य व्हावें असें ईश्वराच्या मनांत फार आहे व आपण ईश्वरावर पक्का विश्वास ठेविला पाहिजे असें त्यांत लिहिलें होतें.

६ शिवाजी पुण्यास येऊन राहिला तेव्हांच त्याचीं दोन लग्नें झालीं होतीं. पहिली स्त्री निंबाळकरांची सईबाई, हिलाच पुढें संभाजी झाला. दुसरी शिर्क्यांची सोयराबाई; हिजपासून राजाराम झाला.

---

## ७ स्वराज्यस्थापना १६४६.

१ शिवाजी देशमुखांस ताब्यांत आणीत असतां त्याच्या मनांत एक कल्पना आली. आपला मुलूख डोंगराळ, तेव्हां हा आपल्या हातीं येण्यास किल्ल्या-सारख्या बळकट जागा आपल्या हातीं पाहिजेत; एक एक किल्ला हातीं आला कीं, भोंवतालचा मुलूख सहज घेतां येईल, व मुलूख ताब्यांत आला कीं किल्ल्यावरून त्याच्या आसपासच्या मुलुखाचा बंदोबस्त ठेवणें सोपें पडेल. हे विचार त्याच्या सोबत्यांस पसंत पडून किल्ले घेण्याचा विचार कायम झाला.

२ येसाजी कंक, तानाजी मालुसरे व बाजी पासलकर या मावळ्यांनीं तोरणा किल्ल्यावरील किल्लेकऱ्यांस वश केलें व तोरणा घेऊन शिवाजीनें स्वराज्याची मुहूर्तमेढ रोविली (इ० स० १६४६). त्या किल्ल्याची डागडुजी करीत असतां त्याला एक मोहरांचा हांडा सांपडला; तेव्हां "देवी मला प्रसन्न झाली आहे व तिनें मला हा प्रसाद दिला आहे" असें शिवाजीनें लोकांत प्रसिद्ध केलें. तेव्हां शिवाजीच्या कृत्यास ईश्वराचा आशीर्वाद आहे असें कळल्यावर लोक त्यास देवाप्रमाणें भजूं लागले. तोरण्याच्या आग्नेयीस तीन मैलांवर मुरबादचा डोंगर आहे. त्यावर तोरण्यांत सांपड-लेलें द्रव्य खर्चून शिवाजीनें राजगड किल्ला बांधिला. दादाजी कोंडदेव

अगदीं म्हातारा झाला होता. तो याच सुमारास वारला (१६४७). मरतांना शिवाजीला त्यानें जवळ बोलावून पुढीलप्रमाणें उपदेश केला. "गोब्राह्मणांचें रक्षण करण्याचा जो उद्योग तुम्हीं आरंभिला आहे तो तसाच पुढें चालू ठेवा. यांत देव तुम्हांला खास यश देईल."

३ दादाजीच्या मरणाच्या वेळच्या उपदेशानें शिवाजीस जास्तच जोर आला. त्यानें किल्ले घेण्याचें व आपल्या प्रांतांतील लोकांस ताब्यांत आणण्याचें काम जोरांत चालविलें. त्यानें लवकरच सुपें परगणा आणि चाकण, कोंडाणा व पुरंदर हे किल्ले घेतले. आतां शिवाजीचें सामर्थ्य बरेंच वाढलें होतें व जास्त धीराचीं कामें करण्यास तो तयार झाला. कल्याणचा सुभेदार विजापुराकडे खजिना पाठवीत आहे अशी त्यास बातमी लागली. तेव्हां निवडक लोक बरोबर घेऊन त्यानें तो सर्व खजिना मिळविला. नंतर तुंग, तिकोना, राजमाची हे किल्ले त्यानें घेतले व कोकणांतल्या लोकांनीं बोलावल्यावरून तिकडे उतरून त्यानें तळें व घोसाळें हे किल्ले सर केले. पुढें तर राजापुरापर्यंत स्वारी करून तें बंदर त्यानें आपल्या ताब्यांत आणिलें.

४ कोकणांतील स्वारींत शिवाजीस दोन मोठे लाभ झाले. गोवळकर सांवत भेटले. त्यांनीं तीनशें होनांची एक तलवार शिवाजीस नजर केली. हीच नामांकित भवानी तलवार होय. याच स्वारींत शिवाजीस बाळाजी आवजी चिटणीस मिळाला. शिवाजी राजापुरास गेला तेव्हां जे लोक पकडले गेले त्यांत बाळाजी आवजी चित्रे हा एक होता. याला शिवाजीनें आपल्याजवळ ठेविलें व पुढें त्याची हुशारी व स्वामिनिष्ठा पाहून आपला चिटणीस केलें.

५ याच सुमारास शिवाजीचा विश्वासू सेवक आबाजी सोनदेव यानें कल्याणच्या सुभेदारास पकडलें व सर्व कल्याणप्रांत ताब्यांत घेतला. ही आबाजीची कामगिरी पाहून शिवाजी फार खूष झाला व त्यानें आबाजी-

स कल्याणचा सुभेदार नेमिलें. आबाजीनें मुसलमान सुभेदारास पकडिलें तेव्हां त्याचीं इतर माणसेंही पकडलीं होतीं. त्यांतील त्याची सून फार सुंदर आहे असें पाहून त्यानें तिला शिवाजीस नजर करण्याकरितां ह्मणून आणिलें. परंतु शिवाजीनें तीस वस्त्रें, अलंकार दिले, व पालखी देऊन मोठ्या सन्मानानें परत पाठविलें. केवढा मनाचा थोरपणा !

६ देहूचे प्रसिद्ध तुकाराम महाराज हे लोकांस धर्माचा उपदेश करीत. त्यांचीं लोहगांवास कीर्तनें ऐकण्यास शिवाजी जाई. धर्माचा उपदेश शिवाजीच्या मनावर पक्का ठसल्यामुळें त्याचें वर्तन अगदीं शुद्ध असे व धर्माच्या रक्षणासाठीं कष्ट सोडण्यास तो नेहमीं तयार राही. तुकारामासारख्या साधूंनीं लोकांमध्यें हिंदुधर्माचा अभिमान उत्पन्न केला व त्यामुळें स्वराज्यस्थापनेच्या कामीं मोठी मदत झाली.

---

## ८ शहाजीची कैद १६४८.

१ शिवाजी किल्ले घेऊं लागला तेव्हां विजापूरच्या दरबारांत सर्व सरदारांच्या तोंडून द्वेषाचे उद्गार निघूं लागले. शहाजी विजापूरसरकारचा नोकर असून या वेळीं कर्नाटकांत कामगिरीवर होता. त्याच्यावर तर बादशहा फारच संतापला व त्यानें शहाजीस पत्र लिहिलें. शहाजीनें उत्तर पाठविलें. " माझा मुलगा माझें ऐकत नाहीं, तो जसा आपला अपराधी आहे तसा माझाही आहे. आपण फौज पाटवून त्याचा बंदोबस्त करावा. माझी बिलकुल ना नाहीं " असा मजकूर त्यांत होता. पण या उत्तरानें बादशहाचें मुळींच समाधान झालें नाहीं.

२ शहाजी पराक्रमी सरदार असून त्याच्यापाशीं मोठी फौज होती. तेव्हां त्याला पकडणे ही सोपी गोष्ट नव्हती. त्याला धरण्यास कपटाचा उपयोग करणें भाग होतें. हें कारस्थान बादशहानें बाजी घोरपडे यास पार पाडण्यास सांगितलें. हा बाजी घोरपडे मुधोळचा देशमुख असून

शहाजीच्या हाताखालीं काम करीत असे. तो नीच स्वभावाचा असल्यामुळें आपल्या धन्यास पकडून देण्याचें काम त्यानें मोठ्या हौसेनें पत्करिलें. एके दिवशीं आपल्या घरीं जेवावयास बोलावण्याचें सोंग करून त्यानें शहाजीस पकडलें ( १६४८ ).

३ बाजी घोरपड्यानें शहाजीस विजापुरास आणिलें. बादशहानें विचारिलें, तेव्हां त्यानें मुलगा माझें ऐकत नाहीं असें सांगितलें. शहाजी लबाड आहे, त्याचा छळ केल्याशिवाय हा खऱ्या गोष्टी सांगावयाचा नाहीं असें बादशहास वाटलें. त्यानें शहाजीस एका कोनाड्यांत घातलें व हवा आंत जाण्यापुरती वाट ठेवून कोनाडा बंद केला. शेवटीं त्यानें शहाजीस अशी धमकी दिली कीं, " मुलाला ताळ्यावर आण, नाहीं तर कोनाडा अगदीं बंद करून टाकतों. "

४ शहाजीचा असा छळ चालला होता तरी शिवाजीला पत्रें पाठविण्याची त्याला परवानगी होती. त्याप्रमाणें त्यानें " आम्हांवर तुमच्या कृत्यामुळें बादशहाची गैरमर्जी झाली आहे; तुम्ही सर्व उद्योग टाकून बादशहास शरण आलां तर आमची धडगत आहे; नाहीं तर आम्ही खास मरतों " अशा अर्थाचीं पत्रें पाठविलीं. शिवाजीस ही हकीकत कळतांच अत्यंत दुःख झालें व चिंता पडली. शहाजीचा त्रास कसा चुकवावा याची शिवाजीस मोठी काळजी लागली. अडचणींतून अचुक मार्ग शोधून काढण्याचा गुण शिवाजीच्या अंगीं होता. या वेळेस तो गुण त्याच्या उपयोगीं पडला. त्यानें असें पाहिलें कीं, विजापुरचा बादशहा आपल्या मानानें मोठा सामर्थ्यवान आहे. पण दिल्लीचा बादशहा शहाजहान त्याहूनही सामर्थ्यवान आहे. त्याचें विजापुरकरावर दडपण आणिल्यास आपल्या बापाची सुटका करितां येईल.

५ नंतर शिवाजीनें दिल्लीच्या बादशहास 'माझ्या बापाची तेवढी सुटका करा, मी आपली सेवा करण्यास तयार आहें ' असें लिहिलें. बादश-

ह्याला शहाजीचा पराक्रम माहीत होताच. हे दोघे बापलेक आपल्यास मिळाल्यास आपला मोठा फायदा आहे असें बादशहास वाटलें, व शहाजीस सोडण्याविषयीं त्यानें विजापुरकरास लिहिलें. खुद्द विजापुरांत रणदुल्लाखान, मुरारपंत वगैरे मंडळी शहाजीस सोडविण्याच्या खटपटींत होतीच. या दुहेरी जोरामुळें बादशहानें शहाजीस कोनाड्यांतून सोडून दिलें ( १६४९ ).

६ कोनाड्यांतून सोडल्यावर चार वर्षेपर्यंत बादशहानें शहाजीस विजापुरांतच ठेवून घेतलें त्यामुळें शिवाजीस आपला उद्योग बंद ठेवणें भाग झालें. पण कर्नाटकांत एकसारखीं बंडें होऊं लागल्यामुळें शहाजीची तिकडे रवानगी झाली ( १६५३ ). तेव्हां आपला उद्योग पुनः चालू करण्यास शिवाजीसही मोकळीक झाली. त्याच्या राज्याच्या दक्षिणेकडे जावळीचा डोंगराळ मुलूख होता, तो त्यानें घेतला. आपल्या राज्याची दक्षिण सरहद्द बळकट करण्यासाठीं त्यानें जावळीजवळच्या उंच डोंगरावर प्रतापगड नांवाचा किल्ला बांधिला. त्या कामीं मोरो त्रिंबक पिंगळे याचें फार कौशल्य दिसून आलें. त्यामुळें शिवाजीची त्याच्यावर फार मर्जी बसली. तुळजापुरच्या अंबाबाईचें दर्शन घ्यावयास जावयाचें म्हणजे फार लांब पडतें, याकरितां तुळजापुरच्या सारखीच मूर्ति एका चतुर कारागिराकडून करून घेऊन त्यानें सुमुहूर्तानें प्रतापगडावर देवीची स्थापना केली. या देवीवर शिवाजीची फार निष्ठा होती.

---

## ९ अफजलखानाचा वध १६५९.

१ शिवाजीनें जावळीप्रांत सर केला तेव्हां विजापूरदरबारीं त्याचें बंड पुरतें मोडून टाकण्याचा विचार सुरू झाला. अफजलखान ह्मणून वाईचा पूर्वीचा सुभेदार असून त्याला वाई प्रांताची चांगली माहिती होती. तो म्हणाला "शिवाजीचा मजकूर इतका कशास पाहिजे ? आज्ञा करावी

म्हणजे धरून आणतों किंवा मारून टाकतों. " अशी प्रतिज्ञा करून खान बारा हजार फौज घेऊन निघाला तो तुळजापुरास आला. तेथें भवानी देवीची मूर्ति फोडून त्यानें तिचें पीठ केलें. पुढें पंढरपुरास आला. तेथें त्याची स्वारी विठोबाच्या मूर्तीसही भोंवली. यावेळीं शिवाजी राजगडास होता. खान आपल्यावर चालून येत आहे असें पाहून तो प्रतापगडास गेला. तेव्हां खानही पुण्याचा रस्ता सोडून वाईस गेला. वाटेनें येतांना हिंदूंच्या पूज्य देवांची खानानें विटंबना केल्यामुळें सर्व हिंदु प्रजा चिडून गेली होती. वाईस आल्यावर या अडचणीच्या जागेंत शिवाजी आपल्या हातीं येणे कठीण असें खानास वाटलें. तेव्हां तह करण्याचा घाट दाखवून शिवाजीस पकडावें असा खानानें बेत केला. पुष्कळ वाटाघाटीनंतर जावळीस सडे होऊन दोघांनीं भेटावें असें ठरलें. आतां शिवाजी सहज आपल्या हातीं येईल असें खानास वाटलें.

२ शिवाजीनें प्रतापगडाखालीं भेटीसाठीं एक मंडप तयार करविला. खानाच्या मनांत कपट असल्यामुळें फौजेची तयारी ठेवणें शिवाजीस भाग होतें. खान सैद बंडु नांवाच्या एका शिपायास बरोबर घेऊन भेटीच्या जागीं आला. खान शिवाजीच्या दर्शनास अगदीं उतावीळ झाला होता. इकडे शिवाजीनें किल्ल्याचा चांगला बंदोबस्त केला. जिजाबाई व संभाजी यांजपाशीं विश्वासू अधिकारी ठेविले. " आम्हीं हें अवघड काम आरंभिलें. देवी सिद्धीस नेईलच. कदाचित वाकडेंही पडल्यास तुम्हीं घाबरे न होतां शत्रूस बुडवावें, राज्य रक्षावें, " असें सांगून शिवाजी निघण्याच्या तयारीस लागला. त्यानें अंगांत चिलखत घालून वर झगा घातला. तसेंच डोक्यावर जिरेटोप घालून वर पागोटें घातलें. उजव्या हातांत भवानी तलवार व बाहींत बिचवा आणि डाव्या हातांत वाघनखें अशीं हत्यारें घेतलीं. देवीचा व जिजाबाईचा आशीर्वाद घेऊन शिवाजी निघाला. जिऊ महाला व संभाजी कावजी बरोबर होते.

३ शिवाजी आला तेव्हां सामोरा येऊन खान त्यास भेटला. खान उंच असून धिप्पाड होता. भेटत असतां त्यानें शिवाजीस डाव्या हाताखालीं दाबून धरिलें, व तो आपल्या हातांतील तरवार शिवाजीच्या कुशीवर चालवूं लागला, शिवाजीच्या अंगांत चिलखत असल्यामुळें ती त्यावर खरखरली. इतक्यांत शिवाजीनें डाव्या हातांतील वाघनख खानाच्या पोटांत खुपसलें. खानाच्या अंगांत नुसता अंगरखाच होता. पोटांत वाघनख जातांच आंतडीं बाहेर आलीं. खानानें शिवाजीस धरिलें होतें तें सोडिलें व " दगा ! दगा ! " ह्मणून ओरडला. लागलीच खानानें शिवाजीच्या डोक्यावर तलवारीचा वार केला. पण जिरेटोप घातला असल्यामुळें वार लागला नाहीं. किंचित गल्हाइतकी जखम झाली. शिवाजीनें उलट खानावर तलवारीचा वार केला. तो खांद्यापासून पोटापर्यंत गेला. सैद बंडू अंगावर आला तेव्हां जिऊ महाल्यानें वार करून त्याला ठार केलें. इतक्यांत भोई खानाचें प्रेत पालखींत घालून नेत होते. त्यांना थांबवून खानाचें शिर घेऊन जिऊ महाला व संभाजी कावजी यांना बरोबर घेऊन शिवाजी किल्ल्यावर गेला.

४ खानाची फौज अगदीं घाबरून गेली. शिवाजीच्या फौजेनें चांगलाच सामना देऊन तीस पळावयास लाविलें. विजापूरच्या फौजेंतील लोक जेव्हां पळूं लागले तेव्हां शरण येतील त्यास कैद करण्याचा, व जे शरण न येतील त्यांची कत्तल करण्याचा मराठ्यांच्या फौजेनें सपाटा चालविला. अफजलखानाचा मुलगा फाजलखान हा विजापूरच्या फौजेंत होता. तो शिवाजीच्या फौजेच्या हातीं सांपडावयाचा, पण खंडुजी खोपडे नांवाच्या वाईजवळील एका देशमुखानें द्रव्यलोभानें त्यास सोडून दिलें. म्हणून तो वांचला. या खोपड्यास शिवाजीनें ठार केलें हें सांगणें नकोच.

———

## १० बाजीप्रभूचा पराक्रम. १६६०.

१ अफजलखानाचा वध झाल्यावर विजापूरकरांचा कोल्हापूर प्रांत घेण्याचा शिवाजीनें निश्चय केला. प्रथम त्यानें हिंदु किल्लेदारास वश करून पन्हाळा किल्ला घेतला. नंतर थेट विजापुरापर्यंत खंडण्या घेऊन शिवाजी इतक्या झपाट्यानें परत आला कीं, विजापुराकडील कोणाही सरदारास त्याचा पाठलाग करतां आला नाहीं. शेवटीं बादशहानें सिद्दी-जोहार नांवाच्या एका सरदारास शिवाजीवर पाठविलें. अफजलखानाचा मुलगा फाजलखान हा सूड घेण्याच्या इच्छेनें त्याच्याबरोबर आला.

२ या वेळीं शिवाजी पन्हाळ्यावर होता. ते पावसाळ्याचे दिवस होते तरी शत्रूनें पन्हाळा किल्ल्यास वेढा दिला. तीन महिने झाले तरी वेढा उठत नाहीं असें पाहून शिवाजीनें तह करण्याचें ठरविलें. एके दिवशीं तो सिद्दीस एका चौकीजवळ भेटला व त्या भेटींत दुसऱ्या दिवशीं किल्ला स्वाधीन करावयाचा असें ठरलें. वेढ्याच्या कामास मुसलमानांचें सैन्य अगदीं त्रासलें होतें. तह ठरला तेव्हां त्यांना आनंद झाला व त्या रात्रीं ते सावध राहिले नाहींत. मध्यरात्रीच्या सुमारास अगदीं काळोखांत शिवाजी पन्हाळ्यावरून खालीं आला. शत्रूचे चौकीपहारे चुकवीत तो विशाळगडाकडे चालला.

३ बराच वेळपर्यंत मुसलमानांस या गोष्टीची दाद नव्हती. बराच वेळ गेल्यावर फाजलखानाच्या हाताखालील मुसलमान शत्रूच्या पाठलागास निघाले, सकाळीं नऊ वाजतां शिवाजी विशाळगडचा घाट चढत होता; तेव्हां त्यानें शत्रु आपल्या पाठीवर येत आहेत हें पाहिलें. तेव्हां शत्रूस खिंडींतून पुढें येऊं न देण्यासाठीं सैन्य ठेविलें पाहिजे असें शिवाजीस वाटलें. शिवाजीबरोबरच्या सैन्यांत बाजी प्रभु देशपांडे या नांवाचा एक शूर सरदार होता. पूर्वीं हिरडस मावळच्या बांदल देशमुखाशीं युद्ध

करावें लागलें, त्यावेळीं बाजी प्रभु बांदल देशमुखाच्या बाजूनें लढत होता. त्या युद्धांत शिवाजीनें बाजीप्रभूचा पराक्रम व स्वामिनिष्ठा पाहून त्यास चाकरीस ठेविलें होतें. त्यास हांक मारून "आम्ही जवळच्या किल्ल्यांत पोंचेपर्यंत तुम्ही हें सैन्य घेऊन येथें शत्रूस थोपवून धरावें. आम्ही किल्ल्यांत गेल्यावर तोफेची इशारत करूं, नंतर तुम्हीं निघून यावें" असें सांगितलें. "साहेबांनीं निघून जावें. शत्रूला थोपवून धरतों. खिंड चढूं देत नाहीं" असें त्यानें शिवाजीस उत्तर केलें.

४ शिवाजी किल्ल्याकडे निघून गेला व बाजी प्रभु खिंड धरून राहिला थोड्याच वेळांत शत्रूचे घोडेस्वार खिंड चढूं लागले. बाजीनें शत्रूवर जोराचा हल्ला करून त्यास खिंडीच्या खालीं उधळून लाविलें. नंतर शत्रूच्या पायदळाचे दोन हल्ले त्यानें मोठ्या शौर्यानें परतविले. इतक्यांत ताज्या दमाचे लोक घेऊन फाजलखान तिसरा हल्ला करून आला. शत्रु ताज्या दमाचा व मावळे दमलेले, यामुळें बरेच मावळे या युद्धांत पडले. तथापि बाजीप्रभु न डगमगतां मोठ्या शौर्यानें लढत होता. आतां त्याचें लक्ष किल्ल्यावरच्या तोफेच्या आवाजाकडे सारखें लागलें होतें. युद्ध चालू असतां बाजी प्रभूला एक गोळी लागली. इतक्यांत तोफेचा आवाज त्याला ऐकूं आला. तो ऐकतांच बाजीच्या तोंडून 'मीं आपलें कर्तव्य-कर्म केलें' असे शब्द निघाले व लागलीच त्यानें जीव सोडला १६६०.

५ अशा रीतीनें शिवाजीस एकसारखा जय येऊं लागला, तेव्हां विजापूरच्या बादशहाची निराशा झाली. त्यानें शहाजीस आमचा शिवाजीशीं तह करून द्या म्हणून म्हटलें. शहाजीनें ती गोष्ट कबूल केली. बापलेकांची भेट होऊन फार वर्षें झालीं होतीं. भेटीस बारावर्षांवर दिवस झाले म्हणजे देवळांत भेट घेण्याची चाल आहे, त्याप्रमाणें त्यांची भेट जेजुरीच्या देवळांत झाली. भेट झाल्यावर शहाजीस पालखींत बसवून शिवाजी स्वतः पालखीचा दांडा धरून पायींच घरीं आला. मग शहाजीला राज्यां-

तील किल्ले, ठाणीं, कचेऱ्या वगैरे दाखविलीं. दोन महिने शहाजी राहिला. त्यानें विजापुरकर व शिवाजी यांजमध्यें तह करून दिला व मग तो कर्नाटकांत परत गेला. या तहानें शिवाजीनें आजपर्यंत मिळविलेला सर्व मुलूख त्याच्याकडे कायम झाला. या वेळीं कल्याणपासून गोव्यापर्यंत कोंकणपट्टी व भीमा आणि वारणा या दोन नद्यांमधील शंभर मैल रुंदीचा प्रांत इतका मुलूख त्याच्या ताब्यांत आला ( १६६२ ). शहाजी पूर्वी निजामशाहींत व पुढें कर्नाटकांत स्वतंत्र अधिकाराकरितां झगडत होता; तेव्हां मुलानें स्वतंत्र राज्य मिळविलेलें पाहून यावेळीं त्यास मोठें समाधान झालें.

---

## ११ शाएस्तेखानाची स्वारी.

शिवाजी दक्षिणेकडे विजापूरकरांशीं युद्ध करण्यांत गुंतला असतां त्याच्या राज्यावर उत्तरेकडून एक अरिष्ट कोसळलें. नर्मदेच्या दक्षिणेस दिल्लीच्या मोंगल बादशहांचा ‘ दक्षिणचा सुभा ’ म्हणून प्रांत असे. दक्षिणेकडील सर्व हिंदु व मुसलमान राज्यांचा नाश करण्याचा दिल्लीचा बादशहा औरंगजेब याचा विचार होता. त्यानें आपला मामा शाएस्तेखान याची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक केली व शिवाजीचें पारिपत्य करण्यासाठीं ही तुमची योजना आहे असें त्यास स्पष्ट बजाविलें. लवकरच शाएस्तेखान सासवडवरून पुण्यास येऊन दाखल झाला. नंतर आपलें उत्तरेकडील दळणवळण कायम राहण्यास चाकण आपल्या हातीं येणें जरूर, असें जाणून त्यानें चाकणास वेढा घातला ( १६६० ).

२ त्या किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळा हा मराठा किल्लेदार होता. खानास वाटलें कीं आपण सहज किल्ला घेऊन टाकूं; पण वेढा बसून दोन महिने झाले तरी किल्ला हातीं येईना. शेवटीं एक सुरुंग लागला होता तो उडाला. तेव्हां तटाला एक खिंडार पडलें. मोंगलांनीं आंत शिरण्यासाठीं

फार जोर केला तरी फिरंगोजीनें एक सबंध दिवसभर शत्रूस आंत येऊं दिलें नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन फिरंगोजीनें किल्ला मोंगलांच्या हवालीं केला. शाएस्तेखान फिरंगोजीस म्हणाला, " तुम्ही शिपाई खरे मर्द आहांत; तुह्मांस बाढवितों. आम्हांपाशीं राहावें. " एखादा सामान्य मनुष्य असता तर सहज हो म्हणता; परंतु फिरंगोजी शिवाजीच्या तालमींत तयार झालेला अस्सल मराठा होता. त्यानें खानास उत्तर केलें " मला तुमची बढती नको. मला माझ्या धन्याकडे जाऊं द्या म्हणजे झालें. " खानानें सन्मान करून फिरंगोजीस शिवाजीकडे लावून दिलें. फिरंगोजी शिवाजीकडे गेला तेव्हां त्यानें फिरंगोजीची पाठ थोपटली व ' शर्थ केलीस ' असें म्हणून त्यास भूपाळगडचा किल्लेदार नेमलें. धन्य शिवाजी आणि धन्य त्याचा एकनिष्ठ सेवक फिरंगोजी ! अशी स्वामिसेवकांची जोडी सांपडणें विरळा. १६६१ च्या आरंभीं मोंगलांनीं शिवाजीचे कल्याण व भिवंडी हे प्रांत घेतले. पुढें शिवाजीचे किल्ले घ्यावयाचे, परंतु शाएस्तेखानास डोंगरी मुलखांत शिरणें धोक्याचें वाटलें व त्यानें दोन वर्षें तशींच पुण्यांत स्वस्थतेनें काढिलीं.

३ विजापूरशीं तह होऊन त्या युद्धांतून मोकळा होतांच शिवाजीनें मोंगलांचा समाचार घेण्याचें ठरविलें. त्यानें मोरोपंत पेशवे याजबरोबर पायदळ देऊन जुन्नरच्या उत्तरेकडचे किल्ले काबीज करण्यास त्यास पाठविलें. नेताजी पालकर हा स्वार बरोबर घेऊन मोंगलांचा औरंगाबादेपर्यंत मुलख मारून परत आला. खुद्द शिवाजी कोंडाण्यावर ( सिंहगड ) होता. खान पुण्यांत बंदोबस्तानें राहिला आहे असें पाहून शिवाजीनें त्याच्या पारिपत्याची एक खाशी युक्ति योजिली.

४ खान शिवाजीच्या वाड्यांत उतरला होता. एके रात्रीं कोंडाण्याच्या वाटेनें आपले लोक ठेवीत शिवाजी पुण्यापर्यंत आला. मग एका लग्नाच्या वरातीच्या समारंभांत मिसळून तो शहरांत आला. बरोबर येसाजी कंक,

तानाजी मालुसरे वगैरे निवडक पंचवीस लोक होते. मग मध्यरात्रीं स्वयंपाकघराच्या भिंतीस लहानसें भोंक पाडून शिवाजी कांहीं लोकांसह वाड्यांत शिरला, व वाड्यांतल्या एकूणएक वाटा माहीत असल्यामुळें भराभर आंत गेला. इतक्यांत कांहींसें वाजलें. त्यामुळें खानाच्या बायका जाग्या झाल्या, व त्या घाबरल्या. त्यांनीं खानास जागें केलें, तेव्हां त्याचीही पांचावर धारण बसली. त्यानें दिवा मालवला व तो खिडकीतून पळूं लागला. इतक्यांत त्याच्या बोटावर वार लागून एक बोट तुटलें, पण तो जिवंत सुटला. त्याचा मुलगा दुसऱ्या दालनांत निजला होता तो मात्र ठार झाला. इतकें झाल्यावर शिवाजी व त्याचे लोक परत कोंडाण्यास निघून गेले ( १६६३ ).

५ मागें मोंगल सैन्यांत मोठी गडबड उडाली, व ते शत्रूच्या पाठलागास निघाले. शिवाजीनें कात्रजच्या घाटाच्या बाजूस बैलांच्या शिंगांस व झाडांना पोत गुंडाळून ठेवण्यास सांगितलें होतें. शिवाजी परत फिरल्याबरोबर ते पोत पेटविण्याची सूचना करण्याकरितां करणे वाजले व पोत पेटले. तेव्हां साहाजिकच मोंगलांना शिवाजी कात्रजकडे गेला असें वाटलें व ते तिकडे गेले. शेवटीं उजाडतांच त्यांस खरी बातमी कळली आणि ते कोंडाण्याकडे आले. जेव्हां शत्रु तोफांच्या माऱ्यांत आला, तेव्हां किल्ल्यावरून गोळीबार होऊं लागला. खान मोठ्या चिंतेंत पडला. इतक्यांत तोफेचा गोळा लागून खाशा खानाचा हत्तीच मारला गेला तेव्हां त्याचा अगदींच धीर सुटला, व तो परत गेला. या फजितीचें वर्तमान जेव्हां औरंगजेब बादशहाच्या कानावर गेलें, तेव्हां त्याला आपल्या मामाचा फार राग आला, व त्यानें लागलीच मामास दिल्लीस परत बोलावून नेलें. औरंगजेबाची अशी कल्पना होती कीं, शिवाजीस चिरडून टाकण्यास मुळींच उशीर लागणार नाहीं, पण आतां तो बोलला कीं, “ शिवाजी तो बडा सैतान पैदा हुवा. ”

## १२ बादशहाशीं संमट १६६५

शाएस्तेखानाच्या पराभवानंतर एकामागून एक अशा कांहीं बातम्या दिल्लीस येऊन थडकल्या कीं, त्यामुळें औरंगजेबाचा क्रोधाग्नि भडकला व शिवाजीचा पुरा मोड करण्याचा त्यानें निश्चय केला. शिवाजीचा बहिरजी नाईक नांवाचा एक हुषार हेर होता. तो शिवाजीस फार महत्वाच्या बातम्या गुप्तपणें कळवीत असे. त्यानें सुरतेची खडान् खडा माहिती शिवाजीस कळाविली; तेव्हां शिवाजी निवडक लोक बरोबर घेऊन सुरतेवर आला व त्या शहराची त्यानें सहा दिवसपर्यंत खंडणी वसूल केली. शिवाजीच्या आरमारावरील अधिकाऱ्यांनीं मक्केच्या यात्रेकरूंनीं भरलेलीं गलबतें पकडलीं व मोठा खंड घेऊन सोडून दिलीं; ही गोष्ट औरंगजेबास कळली, तेव्हां तर त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. बादशहा स्वतःच शिवाजीवर आला असता; पण उत्तरेकडे बंडें उद्भव त्यामुळें त्याला येतां येईना. तरी त्यानें जयपूरचा राजा मिरजा जयसिंग व पठाण दिलेरखान या दोघांस ताबडतोब रवाना केलें. दिलेरखानानें पुरंदरास वेढा घातला आणि जयसिंग सर्व मोहिमेची व्यवस्था लावण्याकरितां पुरंदरजवळ राहिला.

२ पुरंदर किल्ल्यावर मुरारबाजी महाडकर हा मुख्य होता आणि त्याच्या हाताखालीं दोन हजार लोक होते. चोरवाटांनीं किल्ल्यावर धान्य जात होतें. शिवाय किल्ल्यावरील लोकांपाशीं दारूगोळ्याचा चांगलाच संग्रह होता. त्यामुळें बरेंच दिवस मोंगलांचा उपाय चालेना. शवटीं एके दिवशीं मोंगलांनीं शिकस्त केली, तेव्हां त्यांचा खालच्या कोटांत प्रवेश झाला. किल्ल्यावरील मराठ्यांची शिबंदी सर्व वरच्या कोटांत गेली. तेव्हां मोंगलांना वाटलें, शत्रु आपणांस भिऊन पळाले. ह्मणून ते खालच्या कोटांतल्या वरांतून लुटालूट करण्याच्या नादीं लागले. मोंगली लष्कराची ही अव्यवस्था पाहून किल्लेकऱ्यांनीं वरून तोफा डागण्यास

सुरुवात केली. बरेच मोंगल पटापट मरून पडले; कांहीं खालीं पळून गेले व कांहीं लपून बसले. ही आपल्या फौजेची झालेली फजिती पाहून खानास त्वेष आला. त्यानें भिऊन पळणाऱ्या आपल्या लोकांस धीर येईल असे भाषण केलं व सर्व लोकांस परत फिरवून फिरून हल्ला केला.

३ त्या वेळीं मराठ्यांची व मोंगलांची फार निकराची लढाई झाली. मुरारबाजी मोठ्या आवेशानें लढत होता. इतक्यांत दुर्दैवानें त्याची ढाल तुटली. तेव्हां त्या वीरानें कंबरेचा शेला सोडला व शत्रूचे घाव तो त्या शेल्यावर झेलून घेऊं लागला. इतक्या अवकाशांत दिलेरखानानें एक बाण सोडला. मुरारबाजीचें शीर उडालें व तो रणांगणावर पडला. दिलेरखानास किल्ला आतां सहज स्वाधीन होईल असें वाटलें. त्यानें वरच्या शिबंदीस शरण येण्यास सांगितलें. तेव्हां वरच्या लोकांनीं उत्तर केलें, " एक मुरारबाजी पडला तरी काय झालें ? आम्ही तसेच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों. " शेवटीं त्यांनीं मोंगलांस किल्ला घेऊं दिला नाहींच.

४ शिवाजी दक्षिण कोंकणांतल्या समुद्रावर स्वारी करण्यास गेला होता. तो परत आला तोंच दिलेरखान व जयसिंग हे दोन सरदार मोठी फौज घेऊन आपल्या राज्यावर चाल करून आले आहेत ही बातमी त्याला समजली. तेव्हां आपण आतां काय करावें याचा शिवाजीस मोठा विचार पडला. लवकरच आपला शूर व एकनिष्ठ सरदार मुरारबाजी पडला, ही दुःखकारक बातमी शिवाजीच्या कानावर येऊन आदळली. शिवाजीवर अति भयंकर संकटें येत, त्याला दुःखही होई. परंतु त्याची ईश्वरावर निष्ठा होती; यामुळें प्रत्येक संकटाला तोंड देऊन शिवाजी त्यांतून निभावून जाई. मोंगल किल्ले घेतात; आज एक घेतला, उद्यां दुसरा व असेंच ते बळावत जाणार; अशा तऱ्हेचा प्रसंग पाहून त्यानें मोंगलांशीं समेट करण्याचें ठरविलें.

५ शाएस्तेखानाची फजिती झाल्यापासून शिवाजीविषयीं मोंगलांच्या दरबारांत धाक बसून गेला होता. शिवाय जयसिंगाच्या लष्करासही रात्रीं त्रास देण्याचें मराठ्यांनीं सोडलें नव्हतें. या कारणांनीं जयसिंगही तह करण्यास तयार होता. अशा रीतीनें दोन्ही बाजू तह करण्यास तयार असल्यामुळें लवकरच तह झाला ( १६६५ ).

६ शिवाजीनें बारा किल्ले आपणाकडे ठेवून बाकी राहिलेले वीस मोंगलांस देण्याचें कबूल केलें. शिवाजीचा आठ वर्षांचा मुलगा संभाजी यास बादशहाकडून पांच हजार घोडेस्वारांची मनसब मिळाली. विजापूरच्या राज्यांत चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क वसूल करण्याची शिवाजीस परवानगी मिळाली. कुलाब्यानजीकचा सिद्यांच्या सत्तेखालचा जंजिरा आपल्याला मिळावा म्हणून त्यानें फार खटपट केली; पण बादशहानें असें लिहून धाडिलें कीं, ' हुजूरभेटीला याल तेव्हां त्या गोष्टीचा निकाल करूं. '

---

## १३ कपटानें धरले पण युक्तीनें सुटले ! १६६६

७ पुरंदरचा तह झाल्यावर जयसिंगानें विजापुराशीं युद्ध करण्यास सुरुवात केली, त्यांत शिवाजीनें त्याला चांगली मदत केली. शिवाजीनें केलेल्या साहाय्याचें वर्णन जयसिंगानें आग्र्यास लिहून पाठविलें. तें वाचून बादशहा अगदीं खूष झाला. त्यानें भेटीस येण्याविषयीं शिवाजीस आग्रहाचें बोलावणें केलें. शिवाजीच्या मनांतही एकदां जाऊन तेथील स्थिति बारकाईनें पाहून येण्याचें होतेंच. त्यानें जाण्याचा निश्चय केला. त्यानें आपल्याबरोबर संभाजी, तानाजी मालुसरे, बाळाजी आवजी हे लोक व हजार फौजही घेतली. निघाल्यापासून दोन महिन्यांनीं तो आग्र्यास पोंचला. शहराबाहेर स्वागताकरितां जयसिंगाचा मुलगा रामसिंग आला होता.

२ मग एके दिवशीं दरबारांत जाण्याचें ठरलें. दरबारांत बादशहास सला-

म करणें, नजर देणें, या गोष्टी झाल्यावर बादशहानें शिवाजीस जसवंतसिंग मारवाडचा राजा उजवे बाजूस होता त्याचे खालीं उभें राहण्यास सांगितलें. तेव्हां शिवाजीस क्रोध आला; आणि त्या जागीं जातांना तो मराठींत “ ज्याची पाठ माझ्या फौजांनीं पाहिली, त्या जसवंतसारख्या सरदाराच्या खालच्या बाजूस मला उभें करावें म्हणजे काय ? ” असे कांहीं शब्द पुटपुटला. हें पाहून बादशहानें जवळच्या मंडळीस शिवाजी काय म्हणतो, हें विचारलें. मग त्यानें कांहींएक कमजास्त न करतां “ शिवाजीस उतरल्या ठिकाणीं घेऊन जा ” म्हणून रामसिंगास सांगितलें. नंतर बादशहानें पोलादजंग कोतवालास पांच हजार स्वारांनिशीं शिवाजीवर पहारा ठेवण्यास सांगितलें. आतां शिवाजी मोठ्या संकटांत पडला.

३ शिवाजीनें रामसिंगाकडून बादशहास विनंति केली कीं, आमच्या बरोबरच्या लोकांस कांहीं येथील हवापाणी मानवत नाहीं, तेव्हां त्यांना परत जाण्याचा हुकूम व्हावा. बादशहास वाटलें कीं, शिवाजी आपण होऊनच आपली फौज परत करतो हें बरेंच. आतां तो येथें राहिल्यावर काय करणार आहे ? असा विचार करून औरंगजेबानें शिवाजीच्या फौजेस परत जाण्याचा हुकूम दिला. मग कांहीं निवडक मंडळी मात्र शिवाजीजवळ राहिली.

४. नंतर मी आग्र्यास राहण्यास कबूल आहें, अशा अर्थाचे निरोप शिवाजी बादशहास पाठवूं लागला. दरबारांतील लोकांच्या घरीं नजराणे म्हणून मिठाईनें भरलेले पेटारे शिवाजीकडून जाऊं लागले. पहिल्यापहिल्यानें पहारेकरी पेटारे तपासून पहात, पण पुढें पुढें तपासण्याचा ते कंटाळा करूं लागले. मग पहारेकऱ्यांस शिवाजीच्या लोकांनीं सांगितलें कीं, ‘ महाराजांचें कपाळ दुखतें. तुम्ही गलबला करूं नका. ’ मिठाईचे पेटारे मागच्याप्रमाणें जातच होते. असे दहा पंधरा दिवस गेले; मग एके दिवशीं संध्याकाळीं शिवाजी एका पेटाऱ्यांत व संभाजी एका पेटा-

त्यांत असे कुलस्वामीचें चिंतन करून बसले. पेटारे रोजच्याप्रमाणें तपासणी न होतां चालले. ते गांवाबाहेर पूर्वींच ठरलेल्या जागीं आले. तेथें तानाजी वगैरे जीवास जीव देणारी मंडळी होतीच. वेष पालटून ते कसेबसे मथुरेस पोंचले. इकडे हिरोजी फर्जंद हा शिवाजीचा पोशाख करून डोळ्यांवर पांघरूण घेऊन निजला होता. तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं लवकर उठला आणि पहारेकऱ्यांस 'महाराज जास्त आजारी आहेत, मी औषध आणण्यास जातों,' असें सांगून निघाला, आणि त्यानें दक्षिणेचा मार्ग धरला. दुपार झाली तरी कांहीं हालचाल नाहीं, असें पाहतांच पाहरेकरी आंत गेले आणि पाहतात तों शिवाजी तेथें नाहीं. औरंगजेबास वाटत होतें कीं, आपण शिवाजीस आतां अडकावून टाकलें. पण ईश्वरी इच्छा निराळी. शिवाजी बादशहाचे हातावर तुरी देऊन दक्षिणेकडे निघून गेला.

५ मथुरेस मोरोपंत पेशव्यांचे मेहुणे होते. त्यांच्या घरीं संभाजीस ठेवलें. बैराग्याच्या वेषानें काशीयात्रा करून शिवाजी गेल्यापासून १० महिन्यांनीं ( १६६६ दिसेंबर ) रायगडास आला. शिवाजीचें आग्र्यास गमन व तेथील त्याचा बंदिवास हें एक मराठ्यांच्या राज्यावर मोठें संकट येऊन गेलें ! या वेळीं कारभाऱ्यांनीं व्यवस्थितपणें राज्यकारभार चालविला होता. हें कळल्यावर शिवाजीस फार आनंद झाला. आपल्या मागें आपलें काम चालविण्यास योग्य माणसें आहेत हें पाहून कर्त्या पुरुषास समाधान वाटतें, तसेंच या प्रसंगीं शिवाजीस झालें. दहा महिने मालक जाग्यावर नसतां महाराष्ट्रांतील एकही मराठा फितूर होऊन त्या वेळीं चहूंकडे गाजणाऱ्या मोंगलांस मिळाला नाहीं !

६ संभाजीला घेऊन पेशव्याचे मेहुणे थोडयाच दिवसांनीं दक्षिणेंत आले. वाटेंत उज्जनीस संभाजीविषयीं लोक चौकशी करूं लागले, तेव्हां 'हा आमचा भाचा आहे' असें त्यांनीं सांगितलें. तर तुम्ही एके

ठिकाणीं जेवा पाहूं ' असा तेथील लोकांनीं आग्रह धरिला. ' याची मुंज झाला आहे, तेव्हां एके ठिकाणीं जेवतां येत नाहीं, असें ते म्हणाले. लोकांना तें कारण पटलें. नंतर त्यांनीं दही पोहे कालवून एकत्र खाल्ले, तेव्हां लोकांचा संशय दूर झाला. अशा संकटांतून आपला मुलगा आणला हें पाहून शिवाजीनें देणग्या देऊन त्यांची योग्य संभावना केली.

---

## १४ स्वराज्यव्यवस्था. १६६८।१६६९

१ शिवाजी आग्र्याहून सुटला तेव्हां औरंगजेबास फार दुःख झालें. पण नाइलाज म्हणून त्याने शिवाजीशीं तह केला. ' राजे ' हें पद भोंसले कुळांत पूर्वीपासून चालत होतेंच. औरंगजेबानें तें आतां मान्य केलें. कोंडाणा, पुरंदर हे किल्ले वगळून पुणें व सुपें हे जहागिरीचे परगणे परत दिले. आणखी वऱ्हाडप्रांत जहागीर दिला. विजापुरकरांनींही दरसाल तीन लाख रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. गोवळकोंड्याच्या सुलतानानें याचप्रमाणें पांच लक्ष खंडणी कबूल केली. हे तिन्ही तह झाल्यावर दोन वर्षेपर्यंत परराज्यांशीं शिवाजीचें सख्य कायम राहिलें. हा काळ शिवाजीनें आपल्या राज्याची व्यवस्था लावण्यांत खर्च केला. ती राज्यव्यवस्था कशी होती हें आतां सांगावयाचें.

२ पहिल्यानें शिवाजीच्या सैन्याची व्यवस्था कशी होती हें पाहूं. शिवाजीच्या पायदळांत घाटमाथ्यावर राहणारे मावळे व कोंकणांत राहणारे हेटकरी असत. त्यांचीं शस्त्रें म्हणजे तलवार, ढाल, बंदुक किंवा तीरकमठा. डोंगर चढण्याच्या कामांत ते अगदीं पटाईत असत. त्यांतल्या त्यांत शिवाजीचे हेटकरी अचुक नेम मारीत आणि मावळे लढाईला तोंड लागलें म्हणजे तलवार घेऊन निकरानें लढण्यांत तरबेज असत. किल्ले घेतांना पायदळाची शिवाजीला उत्कृष्ट मदत झाली. त्यावर मुख्य येसाजी कंक हा होता.

३ शिवाजीचें घोडदळ दोन प्रकारचें होतें. एक शिलेदार व दुसरे बारगीर. शिलेदार जरा श्रीमंत असून घोडीं, दारूगोळा, हत्यारें वगैरे त्यांचीं स्वतःचीं असत. कांहीं शिलेदार आपल्या हाताखालीं पांच पन्नास स्वार बाळगून असत. बारगीर हे गरीब असत. त्यांस वापरावयास घोडीं हत्यारें इत्यादि सरकारांतून मिळत. शिवाजीचा बारगिरांवर विशेष भरंवसा असे. त्यांचीं हत्यारें ढाल, तलवार व भाला हीं असत. बंदुकाही कित्येकांपाशीं असत. परमुलखावर स्वाऱ्या करतांना शिवाजीला घोडदळाची मदत विशेष असे. घोडदळाचा प्रसिद्ध असा सरनोबत प्रथम नेताजी पालकर व नंतर प्रतापराव गुजर हा होता.

४ किल्ले—कोट हे माझ्या राज्याचे जीवप्राण आहेत असें शिवाजी म्हणे; किल्ल्यावर धान्य व दारूगोळा सांठविलेला असे. राज्यांत शत्रु शिरला असतां किल्ल्यांचा उपयोग फार होई, शिवाय शत्रूच्या मुलखांत स्वारी करावयाची तेव्हां जवळच्या किल्ल्यांत स्वारीवर काय मिळेल तें आणून टाकलें म्हणजे शत्रूचा कांहीं इलाज चालत नसे. प्रत्येक किल्ल्यावरचा मुख्य अधिकारी एक मराठा हवालदार असे. त्याच्या मदतीस एक ब्राह्मण सबनीस व प्रभु कारखाननीस असत. सबनीस लिहिण्याचें काम करी, व कारखाननीस धान्य, दारूगोळा, शिबंदीचे पगार इत्यादि गोष्टींची व्यवस्था पाही.

५ वसुलाचें काम करण्याकरितां प्रत्येक खेड्यांत पाटील कुळकर्णी नेमिले होते. बरींच खेडीं मिळून तालुका होई; त्यावर तालुकदार म्हणून ब्राह्मण किंवा प्रभु अम्मलदार असे. त्याच्या जोडीस हवालदार म्हणून एक मराठा अम्मलदार असे. त्यांच्यावरचा अधिकारी म्हटला ह्मणजे सुभेदार हा होय. हे सर्व अधिकारी पगारदार असत. सुभेदाराचा वार्षिक पगार चारशें होन ह्मणजे दरमहा शंभर रुपये असे. शिवाजीच्या राज्याचे एकंदर बारा सुभे होते; व प्रत्येक सुभ्याचें उत्पन्न सुमारें चार

लाख येई. म्हणजे एकंदर राज्याचें उत्पन्न सुमारें अर्ध कोटी होतें. जमिनीवरील कर उत्पन्नाच्या दोन पंचमांशापेक्षां केव्हांही जास्त नसे.

६ गांवांतील तंट्यांचा निकाल पूर्वापार चालीप्रमाणें पंच नेमून करीत. फौजदारी खटल्याची चौकशी करण्याचा अधिकार जमीनमहसुलाकरितां नेमिलेल्या अम्मलदारांसच दिलेला होता. त्यांपुढें फौजदारी खटले चालून हिंदुधर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अपराध्यांस शिक्षा होई.

७ विद्वानांस दक्षिणा देऊन त्यांची योग्य संभावना करण्याचा शिवाजीनें प्रघात पाडिला. जमिनी शिवाजीनें कोणासही तोडून दिल्या नाहींत. पण देवालयांना मात्र शिवाजीनें जमिनीचीं उत्पन्नें तोडून दिलीं होतीं ! मुसलमानांच्या मशिदी व पीर यांचींही इनामें त्यानें चालू ठेविलीं.

---

## १५ गड आला पण सिंह गेला १६७०.

१ औरंगजेबाच्या संशयी स्वभावामुळें मागील गोष्टींत सांगितलेला तह फार काळ टिकला नाहीं. पूर्वीं कोंडाणा व पुरंदर हे पुण्याजवळचे किल्ले औरंगजेबाच्या ताब्यांत गेले होते. त्यांपैकीं कोंडाणा किल्ला प्रथम सर करण्याचें शिवाजीनें ठरविलें. एके दिवशीं जिजाबाई प्रतापगडावर बसली होती, तों तिची नजर ईशान्य दिशेकडे गेली व कोंडाणा किल्ला तिच्या ध्यानीं आला. लागलीच शिवाजीस बोलावून ' कोंडाणा मला घेऊन दे ' असें ती म्हणाली. शिवाजी मोठा मातृभक्त होता. परंतु त्याच्यानें लवकर होय म्हणवेना. कारण या कामगिरीवर कोणास पाठवावें याचा लवकर निश्चय होईना. इतक्यांत त्यास तानाजीचें नांव सुचलें व मग त्याचा संशय दूर झाला. त्यानें आईस किल्ला घेऊन देतों असें म्हटलें व त्या कामावर तानाजीची नेमणूक केली.

२ यावेळीं तानाजी आपल्या कोंकणांतील गांवीं होता, व त्याच्या मुलाचें लग्न ठरलें असल्यानें त्या धांदलींत तो होता. परंतु कोंडाण्याच्या काम-

गिरीवर जाण्याचा शिवाजीचा हुकूम आला तेव्हां ' आधीं लगीन कोंडाण्याचें, मग रायबाचें करीन ' असा तानाजीनें निश्चय केला. कोंडाणे किल्ला बळकट असून त्यावरील फौजही बलाढ्य आहे असें कोणी म्हणाला ; तेव्हां " अम्ही शूर मर्द क्षत्री, नाहीं भिणार मरणाला " असें बोलून तानाजीनें हजार मावळे घेतले व कोंडाण्याकडे चाल केली.

३ कोंडाणें किल्ला मुळचाच बळकट असून त्यावर उदेभान हा किल्लेदार यावेळीं होता. त्याच्या हाताखालीं अठराशें पठाण व रजपूत यांची मिळून फौज होती. उदेभान स्वत: मोठा शूर असून त्याच्या हाताखालचे लोकही मोठे कडवे होते.

४ रात्र पडतांच तानाजीनें सैन्याच्या पांचपांचशेंच्या दोन टोळ्या केल्या. त्यांपैकीं एक टोळी आपला भाऊ सूर्याजी याच्या हाताखालीं त्यानें दिली व मध्यरात्रीच्या अगोदर किल्ल्याच्या दक्षिणेकडील कल्याण दरवाजाजवळ येण्यास त्याला सांगितलें. दुसरी टोळी आपल्या हाताखालीं घेऊन तानाजी किल्ल्याच्या पश्चिमेकडे गेला. या बाजूचा कडा उभाच्या उभा आहे. त्यामुळें इकडून शत्रु येईल अशी मोंगलांची कल्पना नव्हती, त्यामुळें तिकडे बंदोबस्त चांगलासा नव्हता. तानाजीनें या बाजूने किल्ल्यांत जाण्याचा निश्चय केला. घोरपडीच्या साहाय्यानें एक इसम वर गेला, मग त्यानें मेखा ठोकून दोर सोडिले. त्याबरोबर पटापट तीनशें मावळे वर चढून गेले.

५ इतक्यांत पश्चिम बाजूस कांहीं गडबड आहे असा किल्ल्यावरील लोकांस संशय आला. त्यांनीं मशाली पेटविल्या व पाहिलें; तेव्हां त्यांना मावळे दिसले. त्याबरोबर ते शिपायी चाल करून आले. मावळेही सज्जच होते. लवकरच मोठें युद्ध सुरू झालें. किल्ल्यावर सारखा तलवारींचा खणखणाट चालू होता. कांहीं मावळ्यांनीं कल्याण दरवाजा उघडला व तेथें ते सूर्याजीची वाट पहात बसले. इकडे तानाजी व उदे-

भान यांचें युद्ध जुंपलें. दोघेही मोठ्या शौर्यानें लढले व शेवटीं एकमेकांचे वार लागून पडले.

६ जेव्हां तानाजी पडल्याची बातमी मावळे लोकांत पसरली तेव्हां त्यांचा धीर सुटला व ते जिकडे दोरावरून चढले होते तिकडेच उतरण्यासाठीं पळूं लागले. इतक्यांत तानाजीचा भाऊ सूर्याजी कल्याण दरवाजानें आंत येऊन पश्चिमच्या बाजूला लढत होता, त्याला ही बातमी समजली. तो मोठ्या आवेशानें म्हणाला "षंढांनो, धिक्कार असो तुम्हांला! अरे तुमचा सेनापति-तुमचा बाप—मेला असतां तुम्ही त्याच्याबद्दलचा सूड उगविल्यावांचून असे बायकांसारखे पळून कोठें चालला? काय? तुम्ही दोरावरून उतरून जाणार? मीं ते दोर अगोदरच तोडून टाकले आहेत. आतां तुह्मी कड्यावर जाऊन भागूबाईसारखे जीव द्या, किंवा मागें उलटून मर्दांसारखे या, शत्रूशीं लढा व जय मिळवा." हें जोरदार भाषण ऐकून मावळे लज्जेनें परत फिरले आणि जिवावर उदार होऊन लढले तेव्हां लवकरच किल्ला सर झाला.

७ यावेळीं पहाटचा सुमार होता. तेव्हां सूर्याजीनें एका गवताच्या गंजीस आग लावली. त्या जाळावरून किल्ला सर झाल्याचें शिवाजीस समजलें. दुसऱ्या दिवशीं तानाजी पडल्याची बातमी शिवाजीस समजली. तेव्हां शिवाजी देहभान विसरला. एक दीर्घ सुस्कारा टाकून तो ह्मणाला 'गड आला, पण सिंह गेला.' यामुळें त्या किल्ल्याचें नांव सिंहगड पडलें.

---

## १६ दोन मोठ्या लढाया.

१ सिंहगड सर झाल्यावर एक महिन्याच्या आंत सूर्याजी मालुसऱ्यानें पुरंदर किल्ला घेतला. मोरोपंत पेशव्यानें कल्याणप्रांत हस्तगत केला. शिवाजीनें सुरतेवर दुसरी स्वारी केली. नंतर मोरोपंत बागलाणांत शिरला व औंढा, पट्टा आणि साल्हेर हे किल्ले त्यानें मोंगलांपासून हां हां

म्हणतां सर केले. प्रतापराव गुजर खानदेशांत शिरला व तेथें त्यानें त्या मोंगलांच्या प्रदेशांतून चौथाई वसूल केली. या गोष्टी औरंगजेबास समजल्या तेव्हां त्यानें महाबतखानाची दक्षिणेकडे रवानगी केली.

२ सालेरकिल्ला नाशिकजिल्ह्यांत असून गुजराथेंत उतरावयाची वाट त्या किल्ल्याजवळून असे. शिवाय तो किल्ला म्हणजे बागलाण प्रांताचें नाक होतें. तो किल्ला असा महत्त्वाचा असल्यामुळें मोंगलांनीं त्याला वेढा दिला. तेव्हां प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांस किल्ल्याच्या मदतीस जाण्याचे शिवाजीनें हुकूम पाठविले. प्रतापराव किल्ल्याजवळ गेला तेव्हां त्याची व मोंगलांची लढाई जुंपली. मोंगल फौज अंगावर आली तेव्हां प्रतापरावानें आपण भ्यालों असें दाखविलें. मग मोंगलास कां बरें आवेश चढणार नाहीं ? हा हल्ला भ्यालेल्या शत्रूवर, तेव्हां मोंगल शिपायी स्वच्छंदानें वागूं लागले. पण मराठ्यांचा गनिमी कावा मोंगलांस काय माहीत ? मोंगलांच्या फौजेंत अव्यवस्था झालेली पाहतांच प्रतापरावानें तिजवर एकदम हल्ला चढविला; या वेळीं मोरोपंतही आपल्या सैन्यासह येऊन पोंचला. मग मोठें युद्ध झालें. त्यांत मोंगलांचा पूर्ण पराजय झाला ( १६७२ ).

३ ही सालेरची लढाई मराठ्यांच्या इतिहासांत फार महत्त्वाची आहे. मराठ्यांचें मोंगलांशीं समोरासमोर असें हेंच पहिलें युद्ध झालें. मोंगलांशीं प्रत्यक्ष लढाई करण्याचा प्रसंग आला तरी आपल्याला ती गोष्ट सहज करतां येते असा यावेळीं मराठ्यांस आत्मविश्वास आला. या युद्धानंतर मोंगलांचा नवा सुभेदार आला. त्यानें लढाई चालू ठेविण्याची आपल्या अंगांत ताकद नाहीं हें ओळखून मराठ्यांशीं तह केला.

४ याच सुमारास विजापुरचा सुलतान वारला व त्याचा लहान मुलगा गादीवर आला ( १६७२ ). तेव्हां शिवाजीनें आपलें राज्य दक्षिणेकडे वाढविण्यास उत्तम संधी आहे असें ओळखिलें. त्यानें

पन्हाळा काबीज केला, व हुबळी शहरावर स्वारी केली. इकडे प्रतापराव गुजर खुद्द विजापूरजवळच्या मुलुखांत खंडणी वसूल करूं लागला. विजापूरचा सरदार त्याच्यावर चालून आला, तेव्हां प्रतापरावानें त्याला अडचणीच्या जागेंत कोंडिलें. तो शरण आला. तेव्हां प्रतापरावानें 'फिरून मी मराठी मुलुखांत चाल करून येणार नाहीं' अशी त्याच्या पासून कबुली घेतली व त्यास परत जाऊं दिलें.ही दया करण्यांत प्रतापरावाच्या हातून चूक झाली.

५ विजापूरचा सरदार पुन: सैन्य घेऊन चाल करून आला. तेव्हां प्रतापरावानें चिडून जाऊन त्याजवर जसरी येथें जोराचा हल्ला चढविला, पण तो घाईनें केलेला असल्यामुळें बरोबर लागूं पडला नाहीं. खुद्द प्रतापराव युद्धांत पडला. तेव्हां मराठी फौजेचें धैर्य गळून जाऊन ती पळूं लागली. अशा वेळीं हंसाजी मोहिते हा शूर सरदार पुढें झाला व त्यानें मराठी फौजेच्या अंगांत आवेश उत्पन्न केला. लागलीच मराठे लोकांस वीरश्री चढली व त्यांनीं शत्रूवर असा निकाराचा हल्ला केला कीं शत्रूनें विजापुराकडे पळच काढला. एकदां लोक पळूं लागले म्हणजे त्यांना फिरून धीर देऊन शिरजोर झालेल्या शत्रूवर हल्ला करणें हेंच फार अवघड. त्यांतून तो हल्ला यशस्वी करून शत्रूस पळवून लावणें तर जवळ जवळ अशक्यच ! पण शिवाजीच्या वेळचे मराठे म्हणजे वाघाचे बच्चे होते, त्यांना कांहींच अशक्य वाटत नसे. पहा ! हंसाजी मोहित्यानें पळून चाललेली मराठी फौज एक करून शत्रूवर हल्ला केला व त्यास पळावयास लावलें कीं नाहीं ! याच लढाईंत धनाजी जाधव व संताजी घोरपडे या तरुण जोडीनें छोटासा पराक्रम दाखविला. हंसाजीची कर्तबगारी पाहून शिवाजीनें त्यास हंबीरराव हा किताब दिला व या लढाईंत त्यानें प्रतापरावाची जागा जशी भरून काढली तशीच तो नेहमीं भरून काढील या उमेदीनें त्यास सेनापति केलें.

## १७ राज्याभिषेक १६७४.

१ दक्षिणेच्या मोंगल सुभेदारानें शिवाजीशीं तह केला व विजापूरकरही त्याच्याशीं युद्ध करण्याचें सोडून देऊन स्वस्थ बसले. आतां १६७४ वर्ष सुरू झालें होतें. मराठी राज्य उत्तरेस तापीपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलें होतें. सुरतेपासून कारवारापर्यंत कोंकणपट्टीही शिवाजीच्या ताब्यांत होती. तिच्या रक्षणार्थ सिंधुदुर्ग, विजयदुर्ग हे बळकट जंजिरे त्यानें बांधिले होते. १६४६ पासून जो २८ वर्षांचा काळ गेला त्यांत शिवाजीनें ही राज्याची भव्य इमारत उठवून दिली होती.

२ आपल्या देशांत हिंदु स्वराज्य स्थापावयाचें याच उद्देशानें शिवाजी त्याचे अनुयायी यांनीं कामास सुरवात केली होती. आतां बराच मोठा मुलूख त्यांच्या ताब्यांत आला. हें स्वराज्य स्थापन झालें आहे व शिवाजी आपले हिंदु राजे आहेत हें सर्व लोकांस प्रसिद्धपणें कळविण्याची आतां योग्य वेळ आली होती. तेव्हां आपल्या हिंदुधर्मांत सांगितल्याप्रमाणें राज्याभिषेकाचा समारंभ करण्याचें ठरलें.

३ राज्याभिषेक करून घेण्यास आणखीही कारणें होतीं. जुन्या मराठा घराण्यांतील सरदार शिवाजीशीं बरोबरीच्या नात्यानें वागत. शिवाजीनें राज्य मिळविलें होतें व हे सरदार खरें म्हटलें तर त्याच्या नोकरींत असत. विजापूरकर व दिल्लीचे मोगल शिवाजीशीं व्यवहार करतांना हा एक आपला सरदार आहे असें मानीत. यामुळें आपण स्वतंत्र निराळे राजे आहोंत हें सिद्ध करणें भाग होतें.

४ शत्रूस दुःसाध्य ठिकाण असावें म्हणून रायगड ही राजधानी ठरली. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या पुण्य दिवशीं शिवाजी सिंहासनारूढ झाला. राज्याभिषेकाच्या समारंभाकरितां गागाभट्ट या काशीच्या विद्वान् ब्राह्मणास शिवाजीनें आणिलें होतें. या प्रसंगीं शिवाजीनें खूप दानधर्म केला. शिवाजीनें आपली सुवर्णतुळा केली. त्याचें वजन १६०००

होन भरले. ते होन ब्राह्मणांस दक्षिणा म्हणून वांटले. या दिवसापासून 'नवीन राज्याभिषेक शक' सुरू झाला. महाराजांच्या दरबारीं सर्व राजकीय व्यवहारांत याच शकाचा उपयोग करीत.

५ याच वेळीं शिवाजीनें अष्टप्रधानांचीं फारसी नांवें बदलून संस्कृत नांवें ठेविलीं, आणि त्यांचीं कामें कायम केलीं. १ **मुख्य प्रधान** हा सर्व प्रधानांत श्रेष्ठ असे. हा राजाच्या हाताखालीं असून सर्व मुलकी व लष्करी कामांवर त्याची देखरेख असे. हल्लींचा मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हा होता. २ **सेनापतीकडे** सर्व लष्करचा अधिकार होता. या जागेवर हंबीरराव मोहिते होता. ३ **अमात्याची** सर्व वसुलावर देखरेख असे. या हुद्यावर रामचंद्र निळकंठ बहुतकर होता. ४ **सचिवाकडे** सर्व राज्यांतील दप्तर सांभाळण्याचें काम होतें. हें पद अण्णाजी दत्तोकडे होतें. ५ **सुमंत** परकीय राजांशीं कोणताही व्यवहार करी. या कामावर जनार्दनपंत हणमंते होता. ६ **मंत्रि** राज्याचा खाजगी कारभार पाही. या अधिकारावर दत्ताजीपंत होता. ७ **न्यायाधीश** राज्यांतील न्यायाचें काम पाही. या पदावर बाळाजीपंत होता. ८ **पंडितराव** धार्मिक भानगडी राज्यांत निघाल्यास दूर करी. राज्याभिषेकाच्यावेळीं रघुनाथपंत पंडितराव होता.

जिजाबाई आतां अगदीं म्हातारी झाली होती. ती या समारंभानंतर बारा दिवसांनीं मरण पावली. शिवाजी त्याच्या लहानपणापासून तिला अत्यंत प्रिय होता व त्याला उदात्त वळण लावण्याचा तिनें एकसारखा उद्योग केला होता. आपल्या प्रिय पुत्राला राज्याभिषेक झालेला तिनें आपल्या डोळ्यांनीं पाहिला; तेव्हां तिला किती धन्यता वाटली असेल बरें !

---

## १८ दक्षिणदिग्विजय.

कर्नाटकांत तंजावराकडे शहाजीची जहागीर होती तिचा उपभोग शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी हा घेत होता. त्याचा कारभारी रघुनाथ नारायण हणमंते हा होता. तो मोठा पाणीदार व महत्त्वाकांक्षी असे. पण व्यंकोजीच्या भित्र्या स्वभावामुळें त्याला कांहीं कर्तबगारी करून दाखवितां येईना. एकदां व्यंकोजी त्याला टोंचून बोलला. तेव्हां "तुमच्या मांडीस मांडी लावून बसेन तरच नांवाचा रघुनाथ" असें बोलून तो तापट रघुनाथपंत तेथून चालता झाला.

२ शिवाजी पराक्रमी, हुशार व मोठा कर्तबगार आहे असें ऐकल्यापासूनच त्याच्याकडे जावें असें पंतास वाटत असे. आतां त्यानें शिवाजीकडे जाण्याचा बेत कायम केला. कांहीं तरी मोठी कामगिरी घेऊन जाऊं असा त्यानें विचार केला. तो हैद्राबादेस गेला व गोवळकोंडयाच्या कुतुबशहाचा दिवाण मादण्णापंत यास भेटला. शिवाजीशीं तुमचें सख्य करून देतों असें त्यानें मादण्णास सांगितलें; त्यामुळें मादण्णास विशेष समाधान झालें. मग कुतुबशहाचीं पत्रें घेऊन तो शिवाजीकडे आला. कर्नाटकांत मोठा मुलूख जिंकतां येईल असें पाहून शिवाजी पाऊण लाख फौज घेऊन कर्नाटकावरील स्वारीस निघाला ( १६७६ ).

३ पहिल्यानें हैद्राबादेस जाण्याचें ठरलें. कुतुबशहाच्या राज्यांतून लष्कर अगदीं व्यवस्थितपणें चाललें होतें. हैद्राबादेस पोंचतांच कुतुबशहानें शिवाजीचा मोठा सन्मान केला. एके दिवशीं कुतुबशहा म्हणाला, " माझ्या हत्तीबरोबर झुंजेल असा कोणी माणूस तुमच्या लष्करांत आहे काय ? " " हत्तीबरोबर झुंजणें कठीण; तरी पण हत्ती तर सोडा " असें शिवाजीनें उत्तर केलें. मग बादशहाचा सर्वांत मस्त हत्ती सोडिला. त्याबरोबर एसाजी काळे यास शिवाजीनें खुणेनें उठण्यास सांगितलें. दोन तीन झटापटी होतांच हत्तीची सोंड तुटून तो परत फिरला. तेव्हां

कुतुबशहा अगदीं खुष झाला व त्यानें काळ्यास मोठें बक्षिस दिलें. एके प्रसंगीं बाळाजी आवजीची हुशारी व स्वामिनिष्ठा पाहून आम्हांस तुमचा हा चिटणीस द्या म्हणून कुतुबशहानें शिवाजीस म्हटलें. शिवाजीनें उत्तर केलें. " एक एक माणूस मिळवून माळेस मणी लाविले आहेत, ते माळे-चे मणी कसे काढतां येतील ? "

४ कुतुबशहाशीं स्नेह दृढ करून शिवाजी कर्नाटकाकडे जाण्यास निघाला. तुंगभद्रा उतरून त्या प्रांतांतील सर्व किल्ले शिवाजीनें काबीज केले. विशेष लक्षांत ठेवण्यासारखा किल्ला म्हणजे जिंजीचा होय. याच किल्ल्याचा पुढें राजारामाच्यावेळीं अत्यंत उपयोग झाला. व्यंकोजी-पाशीं शिवाजीनें जहागिरीचा अर्धा वांटा मागितला; पण त्यानें तो दिला नाहीं. पूर्व कर्नाटकांत हें जें शिवाजीनें राज्य जिंकलें त्याच्या व्यवस्थेस रघुनाथ नारायण हणमंते यास ठेविलें. मग शिवाजी पश्चिम कर्नाटकांत आला. तेथें बंगलूर, कोलार, हुस्कोटें, शिरें व बाळापूर हे पांच परगणे त्यानें घेतले व मोहिमेस निघाल्यापासून अठरा महिन्यांनीं तो रायगडास परत आला

५ यानंतर एकदां दक्षिणच्या मोंगल सुभेदारानें विजापुरास वेढा घातला. तेव्हां तेथील कारभाऱ्यांनीं शिवाजीपाशीं साहाय्य मागितलें. तें देऊन त्यानें मोंगलांस विजापूरचा वेढा उठविण्यास भाग पाडिलें. हेंच शिवाजीचें शेवटचें मोठें कृत्य होय. पुढें लवकरच त्याला गुडघी नांवाचा रोग झाला व त्यांत त्याचा अंत झाला. त्यानें महाराष्ट्रांत स्वतंत्र राज्य स्थापिलें व उत्कृष्ट राज्यपद्धति घालून दिली. तो अत्यंत शूर असून पहिल्या दर्जाचा मुत्सद्दी होता. त्याची मातृभक्ति व धर्मश्रद्धा अढळ होती. लोकांना आपल्या भजनीं लावण्याचा गुण तर त्याच्या ठिकाणीं उपजत होता. प्रसिद्ध समर्थ रामदास स्वामी हे शिवाजीचे गुरु होते. शिवाजीस राज्य सोडून आपण एकांत स्थळीं देवाची भक्ति करीत रहावें

अशी इच्छा होई. तेव्हां राज्य करणें हेंच क्षत्रियाचें पवित्र कर्तव्य आहे असा रामदासांनीं त्याला उपदेश केला. आणखी रामदासांनीं लोकांमध्यें हिंदुधर्माचा अभिमान उत्पन्न केला. त्यामुळें शिवाजीच्या कार्याला मोठा उपयोग झाला.

---

## १९ मराठी राज्यावरील अरिष्ट.

१ शिवाजी वारला, तेव्हां संभाजी हा शिवाजीचा वडील मुलगा पन्हाळ्यास नजरकैदेंत होता. तो दुर्वृत्त असल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ राजाराम यास गादीवर बसविण्याचें कारभाऱ्यांनीं ठरविलें. पण तो बेत फसला व संभाजी पन्हाळ्यावरून रायगडास आला व त्यानें गादी मिळविली. लवकरच त्यानें राजारामाची आई सोयराबाई हीस भिंतींत चिणून क्रूरपणानें ठार केलें व शिवाजीच्या वेळच्या बहुतेक सर्व कर्त्या पुरुषांस जीवें मारिलें. कलुशा नांवाचा एक संभाजीचा दुष्ट सल्लागार होता. संभाजी जात्या शूर असल्यामुळें जंजिऱ्याचा सिद्दी व गोव्याचे पोर्तुगीज यांच्याशीं तो मोठ्या शौर्यानें लढला व त्यांच्या मनावर त्यानें मराठी सत्तेचा चांगलाच वचक बसविला.

२ दक्षिणेंतील राज्यें काबीज करून सर्व हिंदुस्थान आपल्या सत्तेखालीं आणावें ही दिल्लीच्या मोंगल बादशहाची फार वर्षांपासून इच्छा होती. दक्षिणेंत तीन राज्यें होतीं; १ विजापूरची आदिलशाही, २ गोवळकोंड्याची कुतुबशाही व ३ शिवाजीनें स्थापिलेलें मराठी राज्य. या तिन्ही राज्यांस दुर्बळ करून टाकण्यासाठीं औरंगजेबानें एकामागून एक बलाढ्य सरदार पाठविले; परंतु तें काम त्यांच्या हातून मुळींच झालें नाहीं. हें महत्त्वाचें कार्य करण्यास खुद्द बादशहाच येणार होता, पण उत्तरेकडे एकसारखे दंगे होत असल्यामुळें त्याला मुळींच फुरसत सांपडली नाहीं.

३ १६८३ मध्यें उत्तरेकडे शांतता झाली. तेव्हां औरंगजेबानें दक्षिण

जिंकण्याकरितां एक मोठी स्वारी काढिली. त्यानें बरोबर चार लक्ष फौज घेतली. अफगाणिस्थान व पंजाब या प्रांतांतील उंच बांध्याचे लोक त्या फौजेंत होते. बरोबर उत्कृष्ट तोफखाना असून त्यावर युरोपियन गोलंदाजांची नेमणूक केली होती. स्वारीचा थाटही प्रेक्षणीय होता. त्या फौजेचा एखाद्या ठिकाणीं तळ पडला कीं एकादें मोठें शहर वसल्याप्रमाणें होई. बरोबरचें सामान दुहेरी असे. तंबू वगैरे पुढल्या मुक्कामाची नीट व्यवस्था लागल्यावर मागल्या मुक्कामाहून तळ हलवीत. अशा डौलानें औरंगजेब बऱ्हाणपुरास येऊन पोंचला.

४ पहिल्यानें मराठ्यांचा मुलख जिंकण्याचें औरंगजेबानें ठरविलें. त्यानें मराठी मुलखावर एक उत्तरेकडून व एक दक्षिणेकडून असे दोन हल्ले एकदम केले. उत्तरेकडील मोंगलांनीं सालेर किल्ला सर केला व ते मराठी मुलखामध्यें आंत आंत येऊं लागले. तेव्हां मात्र मराठ्यांनीं वेळोवेळीं हल्ले करून त्यांस अगदीं हैराण केलें. दक्षिणेकडील फौजेनें कल्याण प्रांतावर हल्ला केला व तो प्रांत उध्वस्त केला. पण यांत तिनें आपलाच तोटा करून घेतला. त्या फौजेस धान्यसामुग्री मिळेनाशी होऊन तिची उपासमार होऊं लागली. इकडे संभाजीनें भडोचवर चाल केली, व तेथें खूप खंडणी वसूल केली. त्याचप्रमाणें एक दहा हजार मराठ्यांची टोळी बऱ्हाणपूरपर्यंत दौड मारीत गेली व तेथें खंडणी वसूल करून परत आली. औरंगजेबास कळून आलें कीं, मराठ्यांस सहज जिंकतां येणार नाहीं. तेव्हां त्यानें तूर्त मराठ्यांचा नाद सोडून दिला.

५ नंतर विजापूर व गोवळकोंडे येथील राज्यांकडे औरंगजेबानें आपला मोर्चा वळविला. वास्तविक यावेळीं दक्षिणेंतील तिन्ही राज्यांच्या जिवावरचा प्रसंग होता. म्हणून त्यांनीं एक होऊन औरंगजेबाशीं टक्कर द्यावयास पाहिजे होती. सर्वांना मिळून बादशाहाचा सहज प्रतिकार करतां आला असता. परंतु तसा प्रयत्न झाला नाहीं. थोड्याच वेळांत

औरंगजेबानें दोन्ही मुसलमानी राज्यांचा नाश केला व मराठ्यांचा समाचार घेण्यासाठीं तो फिरून महाराष्ट्रांत आला ( १६८८ ). यावेळीं मराठी राज्यांत कलुशाचें वजन अतोनात वाढलें होतें. त्याचा मंत्रतंत्रावर अतिविश्वास होता. बादशहाच्या स्वारीची गोष्ट निघाली कीं, तो म्हणे " बादशहाचा नाश करावयास सैन्याची काय जरूर ? मी चेटकें करितों कीं बादशहाचा नाश होईल. " राज्यकारभाराची सर्व शिस्त बिघडली. संभाजी व्यसनांत अगदीं चूर होऊन गेला. त्यामुळें औरंगजेबाचें काम अगदीं सुलभ झालें.

६ औरंगजेबानें खानदेश, कोंकण व कोल्हापूरप्रांत अशा तीन ठिकाणीं एकदम हल्ले करण्याचें ठरवून तीन सरदारांची रवानगी केली. कोल्हापूरकडे पाठविलेल्या सरदारास संभाजी संगमेश्वर या गांवीं व्यसनांत दंग आहे अशी बातमी लागली. त्यानें जाऊन संभाजीस अचानक पकडलें व बादशहाच्या छावणींत तुळापुरास नेऊन हजर केलें. औरंगजेबानें संभाजीस निरोप पाठविला कीं, " तुम्ही मुसलमान झालां तर तुम्हास जीवदान देण्याचा आमचा विचार आहे. " संभाजी व्यसनी असला तरी वीराचा बच्चा होता. कैदेंत घातलें तेव्हांपासूनच तो आपल्या जिवास कंटाळला होता. बादशहास खरमरित उत्तर पाठविल्यास तो आपणास ठार मारील व आपण या त्रासांतून सुटूं असें संभाजीस वाटलें. म्हणून त्यानें बादशहास निरोप पाठविला कीं, " जर तुझी बेटी मला देशील तर मी मुसलमान होतों. "

७ औरंगजेबास तो निरोप ऐकून संभाजीचा अत्यंत क्रोध आला. त्यानें जीभ तोडून, डोळे काढून, हाल हाल करून त्यास ठार मारण्याचा हुकूम केला. त्या हुकुमाप्रमाणें अत्यंत क्रूरपणानें संभाजीचा वध झाला ( १६८९ ). विजापुर व गोवळकोंडे हीं शहरें घेतल्यावर तेथलीं राज्यें औरंगजेबाच्या सहज हातीं पडलीं त्याचप्रमाणें संभाजीचा वध केल्यावर

मराठी राज्य आपल्या हातीं आलें असें औरंगजेबास वाटलें. तेव्हां आपलें दक्षिण जिंकण्याचें काम संपलें असें तो बादशहा आपल्या मनांत मांडे खाऊं लागला.

---

## २० स्थलांतर.

संभाजीच्या वधाची भयंकर बातमी महाराष्ट्रभर पसरली. तेव्हां जिकडे तिकडे हाहा:कार झाला. संभाजीची बायको येसूबाई व मुलगा शिवाजी हीं रायगडावरच होतीं. राजाराम रायगडावर नजर कैदेंत होता. सर्व मराठे सरदार रायगडावर जमा झाले. मग शिवाजी लहान असल्यामुळें राजारामाच्या हातीं कारभार द्यावयाचा व मराठी राज्याचें रक्षण करावयाचें असें ठरलें. सर्वांनीं एका ठिकाणीं राहणें धोक्याचें होतें. तेव्हां रायगडचा चांगला बंदोबस्त करून त्यावर येसूबाई व बालशिवाजी यांस ठेविलें; राजाराम निघाला तो प्रतापगडच्या देवीचें दर्शन घेऊन किल्ल्यांच्या बंदोबस्तास लागला.

२ बादशहानें सर्व महाराष्ट्र हातीं घालण्यासाठीं आपल्या फौजेच्या तीन टोळ्या केल्याचें मागील गोष्टींत सांगितलेंच आहे. त्यांपैकीं कोंकणांतील टोळीवर झुलफिकारखान हा मुख्य होता. त्यानें रायगडास वेढा दिला. रायगड किल्ला मूळचाच मजबूत आहे; व राजारामानें त्याचा चांगला बंदोबस्त केला होता. तेव्हां मोंगलांनीं पुष्कळ हल्ले चढविले; पण त्यांचें कांहीं चालेना, शेवटीं झुलफिकारखान फितूर करण्याच्या प्रयत्नास लागला. सूर्याजी पिसाळ वाईची देशमुखी मिळविण्यासाठीं हापापला होता. झुलफिकारखानानें ती देशमुखी देण्याचें आनंदानें कबूल केलें व पिसाळानें मोंगलांस गुप्तवाटा दाखविल्या. त्याबरोबर मोंगल फौज वर चढून गेली, व रायगड मोंगलांच्या हातीं गेला. स्वार्थासाठीं मनुष्य किती नीचपणाचीं कृत्यें करण्यास तयार होतो याचें पिसाळ हें

एक उत्तम उदाहरण आहे. लागलीच येसूबाई व शिवाजी यांस खानानें औरंगजेबाकडे पाठवून दिलें. तेथें औरंगजेबानें त्यांस आपल्या लष्करांतच ठेवून घेतलें. ' हा तेवढा साव इतर चोर ' असें तो लडिवाळपणानें म्हणे. त्यावरून शिवाजीचें शाहू असें नांव पडलें.

३ मोंगलांनीं रायगड घेतला व त्यांच्या फौजा इतर ठिकाणींही काबीज करूं लागल्या. तेव्हां महाराष्ट्रांत राहून कांहीं उपयोग नाहीं, आपण आतां दक्षिणेस जिंजीकडे पळावें असें राजारामाच्या मनांत आलें. सर्वांस हा उपाय पटला. मग राजाराम, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ चिटणीस, धनाजी जाधव, संताजी घोरपडे व खंडेराव दाभाडे या मंडळींनीं लिंगाईत यात्रेकरूंचा वेष घेऊन जिंजीची वाट धरली.

४ लवकरच ही मंडळी कर्नाटकाकडे गेल्याची बातमी औरंगजेबास समजली. त्यानें कर्नाटकांतील फौजदारांस सांपडतील तेथें या टोळींतील मंडळींस पकडण्याचा हुकूम पाठविला. राजाराम व त्याचे सरदार बंगलुरास पोंचले; व तेथें ते एका धर्मशाळेंत उतरले.

५ तेथें राजारामाचे पाय धुवावयाचे होते, त्यावेळीं एका गड्यानें त्याच्या पायांवर पाणी घातलें. हें पाहून एक कानडा जवळच्या माणसास म्हणाला ' या एका माणसाच्या पायांवर दुसऱ्यानें पाणी घातलें, तेव्हां हे कोणीतरी वेषांतर केलेले असावे.' ही बातमी लवकरच सर्व गांवभर पसरली. खंडो बल्लाळानें तें ऐकतांच हें चिन्ह बरोबर नाहीं असें म्हटलें व निरनिराळे फुटून निघून जाण्याविषयीं राजारामास विनंती केली. राजारामादि मंडळी चालती झाली. खंडो बल्लाळ व आणखी दोघे तिघे तेथें स्वयंपाक करीत राहिले. त्या सर्वांस पकडून ठाण्यांत नेलें. ठाणेदारानें विचारलें ' तुम्ही कोण ? कोठें चालला ? ' यांनीं उत्तर केलें ' आम्ही यात्रेकरू, रामेश्वरास जात आहों. जवळ आणखी कोणी यात्रेकरू उतरले होते; पण ते जेवण करून अगोदरच निघून गेले. ' ठाणेदारानें त्यांच्या

डोक्यावर तीन तीन मणांचे दगड ठेविले, त्यांना चाबकानें मारिलें, राखेचे तोबरे दिले; तरी त्यांचा पहिला जबाब कायम होता ! हा केवढा दृढ निश्चय ! ही केवढी स्वामिभक्ति ! तीन दिवस झाले. त्यांनीं सांगितलें ' आम्हांस सोडिल्याशिवाय अन्न घेणार नाहीं. ' त्यांचा इतका निग्रह पाहून ठाणेदाराचा संशय फिटला व त्यानें त्यांस सोडून दिलें. ते पुढील लोकांस जाऊन मिळाले. शेवटीं राजाराम प्रमुख सरदारांसह जिंजीस पोंचला व तेथें राहून त्यानें स्वराज्यरक्षण करण्याची उमेद धरली.

---

## २१ जगण्यासाठीं पराकाष्ठा.

१ राजारामानें रामचंद्रपंतास महाराष्ट्राची व्यवस्था करण्यास ठेविलें होतें. त्यानें किल्लोकिल्लीं फिरून जे किल्ले मराठ्यांच्या ताब्यांत होते तेथील शिबंदी, दारुगोळा व दाणावैरण इत्यादि बंदोबस्त केला. रामचंद्रपंतास दोन पुरुष फार उपयोगीं पडले. एक परशुराम त्रिंबक कुळकर्णी, हा हल्लींच्या औंधच्या पंतप्रतिनिधींचा मूळ पुरुष; दुसरा शंकराजी नारायण गांडेकर, हा हल्लींच्या भोरच्या पतसचिवांचा मूळ पुरुष.

२ राजाराम जिंजी किल्ल्यावर बंदोबस्तानें राहिला. धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांची महाराष्ट्रांत परत रवानगी झाली. त्यांनीं बादशाही मुलुखांत संचार करून मुलूख उध्वस्त केला. उत्तरेकडून बादशहाच्या सैन्याकरितां धान्य घेऊन मोठमोठे तांडे येत. अशा प्रकारचे तीन तांडे संताजीनें वाटेंत गांठले व लुटले. हे धनाजी व संताजी यांचे पराक्रम पाहून इतर मराठे शिलेदारांस हुरूप आला व त्यांनीं ईर्षेनें मोगल मुलुखांतून खंडणी उकळण्यास आरंभ केला. इकडे प्रल्हाद निराजीच्या सल्ल्यानें, राजारामानें मराठे सरदारांस इनामें व पदव्या देण्यास सुरवात केली. इनामांसाठीं मराठे लोकांत मोठी चढाओढ सुरू झाली, व तीं बादशहाच्या मुलुखांत असल्यामुळें, मोंगली मुलुखांत धुमाकूळ माजून गेला.

३ जिंजीस असलेले राजाराम आदिकरून पुढारी या दंग्याच्या मुळाशीं आहेत असें चाणाक्ष औरंगजेबानें तेव्हांच ताडलें. हा गोंधळ बंद करण्यासाठीं जिंजी किल्ला घ्यावा असें बादशहानें ठरविलें. झुलफिकारखानानें रायगड सर केला, त्यामुळें औरंगजेब त्याच्यावर खूब झाला होता. तेव्हां जिंजी घेण्याच्या कामगिरीवर त्याची नेमणूक झाली. खानानें किल्ल्याला वेढा घातला; पण त्याच्यापाशीं भरपूर सैन्य नसल्यामुळें वेढ्याचें काम नीट चालेना. शिवाय मराठे त्यास एकसारखे त्रास देत होते. पांच सात वर्षे झालीं तरी किल्ला मोंगलांच्या हातीं आला नाहीं. औरंगजेब खानावर अतिशय रागावला, व किल्ला सर करण्याविषयीं त्यानें त्यास सक्त हुकूम पाठविले. तेव्हां एकदा खानानें जोराचा हल्ला करून किल्ला सर केला ( १६९८ ). परंतु राजाराम त्यावरून अगोदरच निसटून गेला होता !

४ राजाराम जिंजीहून निघून सुखरूपपणें महाराष्ट्रांत येऊन पोंचला. आजपर्यंत रायगड ही मराठी राज्याची राजधानी होती. ती बदलून सातारा हें राजधानीचें ठिकाण झालें. मग राजारामानें खानदेश—वऱ्हाडाकडे एक भली मोठी मोहीम केली. यावेळीं मराठ्यांची जेवढी फौज एकत्र जमली होती तेवढी पूर्वीं कधींही जमली नव्हती. परत येतांना राजारामानें एक एक सरदार एकएका प्रांतांत नेहमीं वसूल करण्याकरितां ठेविला. परसोजी भोंसले यास वऱ्हाडांत ठेविलें. त्याचप्रमाणें खानदेशांत नेमाजी शिंदे, बागलाणांत खंडेराव दाभाडे, गंगथडींत हैबतराव निंबाळकर असे सरदार ठेविले. वाटेंत दगदगीनें राजारामास नवज्वर येऊन सिंहगडास पोंचल्यावर थोड्याच दिवसांनीं तो मृत्यु पावला (सन १७००). त्याला दोन बायका होत्या. एक ताराबाई, हिला शिवाजी म्हणून दहा वर्षांचा मुलगा होता. दुसरी राजसबाई, हीस संभाजी नांवाचा तीन वर्षाचा मुलगा होता.

५ राजारामाच्या मृत्यूनें मराठ्यांस जिंकण्याचें काम सोपें पडेल असें औरंगजेबास वाटलें; परंतु त्याचा अंदाज खोटा ठरला. ताराबाई ही कर्तबगार बाई होती. तिनें आपला मुलगा शिवाजी यास गादीवर बसवून राज्यव्यवस्था आपल्याकडे घेतली, व राज्यरक्षणाचें काम जोरानें चालविलें. औरंगजेबानें मराठ्यांचे सर्व किल्ले घ्यावयाचे व मैदानांतील मुलूखही काबीज करावयाचा असें दुहेरी धोरण अंगीकारिलें. परंतु या दोन्ही कामीं त्यास अपयश आलें. मोंगली फौजेस मैदानांत मराठ्यांनीं कधींही तोंड दिलें नाहीं. मोंगल फौज एक होऊन चाल करून आली तर मराठे पांगत. लहानशी टोळी भेटली तर तिच्यावर हल्ला करून मराठे तिला चीत करीत. मोंगलांच्या सामुग्रीवर मराठे धाड घालीत, व मुलूख बेचिराख करून त्यांस पेंचांत आणीत. याच लढाईच्या पद्धतीस 'गनिमी काव्याची लढाई' म्हणतात. तिचा आश्रय करून मराठ्यांनीं औरंगजेबास टेंकीस आणिलें.

६ औरंगजेब आतां नव्वद वर्षांचा झाला होता. त्याला दक्षिणेंत येऊन जवळजवळ पंचवीस वर्षें झालीं होतीं. इतक्यांत आपण इतक्या श्रमानें सर केलेले किल्ले मराठ्यांनीं परत घेतल्याची बातमी येऊन धडकली, तेव्हां त्याला दुःख झालें. त्याचा आजार वाढला, तेव्हां तो अहमदनगरीं गेला. तेथें सन १७०७ मध्यें त्याचा अंत झाला. औरंगजेब वीस वर्षेपर्यंत मराठी राज्य जिंकण्याकरितां एकसारखी खटपट करीत होता. फौज काय, पैसा काय, किंवा इतर सामुग्री काय, कशाची म्हणून त्याला कमतरता नव्हती. अशा सर्वस्वी बलाढ्य बादशहाशीं मराठ्यांनीं जीवावर उदार होऊन टक्कर दिली, आणि आपल्या राज्याचा बचाव केला.

---

## २२ मराठी राज्यांत दुही.

१ औरंगजेब वारल्यावर त्याच्या मुलांत गादीबद्दल तंटे उत्पन्न झाले. अजीमशहा हा एक मुलगा दक्षिणेकडे होता. तो गादी मिळविण्याकरितां नर्मदा उतरून उत्तरेकडे चालला. त्याच्याबरोबर शाहू होता. शाहूस सोडावें म्हणजे मराठे लोकांत तंटे उत्पन्न होतील व आपल्या मुलुखाचा त्रास वांचेल अशा आशेनें अजिमानें शाहूची सुटका केली. शाहू नर्मदा उतरून दक्षिणेकडे येऊं लागला. त्या वेळीं वऱ्हाडांत परसोजी भोंसले व खानदेशांत चिमणाजी दामोदर मोघे हे दोघे मराठे सरदार होते; ते शाहूस मिळाले.

२ ताराबाई मोठी महत्त्वाकांक्षी होती. संभाजीच्या मृत्यूनंतर राजारामानें मराठी राज्य वांचविलें होतें. त्याच्यामागेंही मोठ्या दगदगीनें ती स्वत: झटली होती. तेव्हां शाहू आयतें राज्य मिळविण्यास आला म्हणून तिला त्याचा राग आला. तिनें पहिल्यानें शाहू तोतया आहे अशी कंडी पिकविली. शेवटीं सेनापति धनाजी जाधव व परशुराम-त्रिंबक प्रतिनिधि या दोघांस तिनें शाहूचा मोड करण्यास पाठविलें.

३ शाहूस ही सर्व बातमी समजली. त्यानें आपण वडील घराण्यांतले, तेव्हां राज्य आपल्यालाच मिळालें पाहिजे असा निश्चय केला. तो अहमदनगरावरून पारद गांवीं आला. तेथील पाटलानें तें ठाणें त्याच्या हातीं देण्याचें नाकारिलें. त्या समयीं एक पाटलाची बाई, एक मूल घेऊन शाहुकडे आली, व तें मूल शाहूच्या पालखींत टाकून म्हणाली, "यास वांचवावें, अन्यायी होते ते मारले गेले. हें मूल आपणास वाहिलें आहे." त्यावरून शाहूनें तें मूल ठेवून घेतलें. पहिल्यानें त्या गांवीं जय मिळाला म्हणून त्या मुलाचें नांव फत्तेसिंग भोंसले असें ठेविलें. हाच फत्तेसिंग भोंसले अक्कलकोट संस्थानचा मूळ पुरुष.

४ शाहू पारदाहून निघाला, तो खेडला आला. याच सुमारास

त्याच्या पारिपत्याकरितां ताराबाईनें पाठविलेले धनाजी जाधव व प्रतिनिधी तेथें येऊन पोंचले होते. धनाजी जाधवाबरोबर खंडो बल्लाळ चिटणीस होता. त्यानें शाहू खरा अशी खात्री करून घेतली. मग धनाजी जाधव शाहूस मिळाला. प्रतिनिधि मात्र शाहूशीं लढला; पण त्याचा पराभव झाला व त्यास पळून जावें लागलें. शाहूनें धनाजी जाधवाचा सन्मान करून त्यास सेनापति पदाचीं वस्त्रें दिलीं. मग शाहूनें सातारा राजधानी काबीज केली व आपल्याला राज्याभिषेक करून घेतला (१७०८). ताराबाई कोल्हापुराकडे पळून गेली.

५ ताराबाईनें कोल्हापुराकडे नवीन गादी स्थापून आपला मुलगा शिवाजी यास गादीवर बसविलें. आतां मराठे लोकांत उघड दोन पक्ष झाले. पहिल्यानें शाहूला बरेच मराठे सरदार मिळाले होते. परंतु लवकरच धनाजी जाधव हा वजनदार सरदार वारला व त्याचा मुलगा चंद्रसेन हा ताराबाईस मिळाला. औरंगजेबाशीं युद्ध करितांना मुलुखांत स्वतंत्रपणें खंडणी घेत संचार करण्याची मराठे सरदारांस संवय लागली होती. आतां आपण ताराबाईच्या पक्षाचे असें सांगून बरेच सरदार मुलुखांत दंगे करूं लागले. दमाजी थोरात हा हिंगणगांवच्या गढींत राहून जवळच्या मुलुखांत खुशाल खंडणी गोळा करूं लागला. कृष्णराव खटावकरानें खटावजवळच्या माणदेशांत दंगा आरंभिला. उदाजी चव्हाण मिरजेकडे ‘ चव्हाण चौथाई ’ वसूल करूं लागला. वाडीच्या खेम सांवतानें दक्षिण कोंकणांत गडबड मांडिली, व कान्होजी आंग्रे उत्तर कोंकण बळकावून बसला.

६ या अव्यवस्थेनें शाहूची सत्ता अगदीं संपुष्टांत आली. या दंग्याच्या मुळाशीं ताराबाई होती. तिचें उच्चाटन करण्याची शाहूनें एक खाशी युक्ति काढिली. राजारामाची दुसरी बायको राजसबाई आपला पुत्र संभाजी यास घेऊन कोल्हापूरकडेच होती. ताराबाईस कैदेंत टाकून

गादीचे मालक बनण्याविषयीं त्यानें संभाजीस भर दिली. त्याप्रमाणें संभाजीनें गडकऱ्यांच्या साहाय्यानें ताराबाई व शिवाजी यांस पन्हाळ्यावर कैदेंत टाकिलें व आपण राज्यसूत्रें धारण केलीं ( १७१२ ). शिवाजी हा पुढें कैदेंतच वारला. त्याचा एक मुलगा ताराबाईनें गुप्तपणें पळवून नेऊन वांचविला, तोच शाहूच्या मागें साताऱ्च्या गादीवर बसलेला रामराजा होय. येणेंप्रमाणें ताराबाईचा मोड झाला. दंगे करणाऱ्या सरदारांस शाहूनें कसें नरम आणिलें हें पुढील गोष्टींत पाहूं.

---

## २३ बाळाजी विश्वनाथास पेशवाई कशी मिळाली १७१३.

धनाजी जाधव वारल्यावर शाहू व ताराबाई यांच्यामधील कलहास उग्र स्वरूप आलें. एकदां तर शाहूचा नाश होतो कीं काय असें वाटूं लागलें होतें. अशा स्थितींत सुदैवानें शाहूस एक मोठा पुरुष लाभला. तो बाळाजी विश्वनाथ भट हा होय. त्याच्या शहाणपणामुळें शाहूची पडती बाजू चांगलीच सावरली.

२ बाळाजी विश्वनाथ हा मूळचा श्रीवर्धनचा देशमुख. श्रीवर्धन हें गांव कोंकणांत जंजिऱ्याच्या सिद्याच्या मुलुखांत आहे. बाळाजी चिपळुणास जकात वसुलीच्या कामावर होता. सिद्याच्या जुलुमास कंटाळून कोंकण सोडून देशांत जाण्याचा बाळाजीनें निश्चय केला. बाळाजी देशावर जाणार असें ऐकून वेळासचे तिघे भानू रामाजी महादेव, हरि महादेव व बाळाजी महादेव हे येऊन त्यास भेटले. ' आम्हीही देशावर येणार ' असें ते म्हणूं लागले. बाळाजी भानूंस म्हणाला, " बरें आहे, चला; आम्हांस भाकर मिळेल त्यांत तुम्हांसही चतकोर मिळेल. "

३ बाळाजी राजारामाच्या कारकीर्दींत देशावर आला. तो संकराजी नारायण सचिव याजकडे भोरास चाकरीस राहिला. तेथें अंबाजीपंत पुरंदरे याच्याशीं त्याची ओळख झाली. मग ते दोघे मिळून धनाजी

जाधवाजवळ नोकरीस राहिले. लवकरच बाळाजीनें सरसुभेदारीचें पद मांडिलें. धनाजी जाधव शाहूस मिळाला त्यांत बाळाजीची बरीच खटपट होती. सातार्‍यास गादीवर बसल्यावर शाहूनें धनाजीस सेनापतिपद दिलें व वसुलाचें काम पाहण्यास सांगितलें. धनाजीनें वसुलाचें काम सर्वस्वी बाळाजीवर सोंपाविलें; तें त्यानें उत्कृष्ट बजाविलें. धनाजी वारल्यावर वसुलाच्या कामावर शाहूनें बाळाजीची स्वतंत्र नेमणूक केली.

४ धनाजीचा मुलगा चंद्रसेन हा जेव्हां ताराबाईस मिळाला तेव्हां त्यानें इतरही बर्‍याच सरदारांस फितविलें. या संकटकाळीं बरेच सरदार शाहूस सोडून गेले. बाळाजी मात्र त्यास चिकटून राहिला. जाधवाकडून फुटून आलेले शिलेदार व त्याची स्वतःची मिळून बाळाजीजवळ दोन हजार फौज होती. आणखीही त्यानें शाहूच्या पडत्या काळांत नव्यानें सैन्य जमविलें. या कामगिरीबद्दल शाहूनें बाळाजीस 'सेनाकर्ते' ही पदवी दिली. पुढें ताराबाईस कैदेंत टाकून संभाजीनें राज्य मिळविलें, व त्यामुळें विरुद्ध पक्ष लंगडा झाला यांत बाळाजीचें अंग होतेंच.

५ दंगेखोर सरदारांचा मोड करण्याच्या कामीं पहिल्यानें यश आलें नाहीं. हिंगणगांवास राहून दमाजी थोरात दंगा करीत होता, त्याच्यावर शाहूनें बाळाजीस पाठविलें. थोरात गरिबीनें सामोरा आला व दगा करणार नाहीं म्हणून बेलभंडार उचलून तह करण्याकरितां बाळाजीस गढींत घेऊन गेला. तेथें त्यानें बाळाजी, त्याचे दोन मुलगे व अंबाजीपंत पुरंदरे यांस कैद केलें. जेव्हां त्याला बेलभंडाराच्या शपथेची आठवण दिली तेव्हां तो म्हणाला, "बेल म्हणजे झाडापाला व भंडार तर आम्ही दररोज खातों!" त्यानें जबर खंडणी मागितली व ती न दिल्यास 'राखेचे तोबरे देईन' अशी धमकी दिली. मग अंबाजीपंत पुरंदरे रक्कम आणण्याकरितां शाहूकडे गेला. त्यानें लागलीच पैसे भरून बाळाजीची सुटका केली. थोराताचें पारिपत्य करण्याचें काम शाहूनें सचिवास सांगितलें.

थोरातानें त्यालाही कैद केलें. पुढें कांहीं काळानंतर बाळाजीनें सचिवास सोडविलें व हिंगणगांवची गढी जमीनदोस्त करून दमाजीचें पारिपत्य केलें.

६ कृष्णराव खटावकर माणदेशांत व कान्होजी आंग्रे कोंकणांत गडबड करीत होते. खटावकरावर शाहूनें बाळाजीस पाठविलें व आंग्र्यावर पेशवे बहिरोपंत पिंगळे याची रवानगी केली. बाळाजीबरोबर परशुरामपंत प्रतिनिधीचा मुलगा श्रीपतराव होता. खटावकराचा पराभव झाला व तो शरण आला; तेव्हां शाहूनें त्यास खटाव हा गांव इनाम दिला. आंग्र्यावरील मोहिमेचा मात्र निराळाच शेवट झाला. बहिरोपंतास आंग्र्यानें पकडलें व आंग्रे सातारवर चालून येणार अशी मुमका उठली. तेव्हां शाहूनें बाळाजीस आंग्र्यावर पाठविलें. कान्होजी आंग्रे हा बलाढ्य सरदार होता. तेव्हां त्यास गोडीगुलाबीनें वश करणेंच फायदेशीर होतें. बाळाजीनें आंग्र्याचें मन मोठ्या युक्तीनें वळविलें व त्याच्याशीं तह केला. कोंकणप्रांत व आरमाराचा अधिकार आंग्र्याकडे ठेविले. आंग्र्यानें बहिरोपंतास सोडून दिलें व राजमाचीशिवाय सर्व किल्ले परत केले. असा विजय मिळवून बाळाजी साताऱ्यास आला. बाळाजी सारखा उपयोगीं पडला ह्मणून बहिरोपंताकडून पेशवेपद काढून शाहूनें तें बाळाजीस दिलें ( १७१३ ).

---

## २४ मराठी राज्याच्या वाढीची तयारी.

१ पेशवाई मिळाल्यावर बाळाजीनें राज्याची व्यवस्था लाविली व दिल्लीहून सनदा आणिल्या. त्यामुळें मराठ्यांचें राज्य पुढील ४० वर्षांत सबंध हिंदुस्थानभर वाढलें. तेव्हां बाळाजीच्या या कामगिरीची आपण या गोष्टींत माहिती करून घेऊं.

२ शिवाजीनें अष्टप्रधान नेमून राज्यव्यवस्था लाविली होती. पुढें

औरंगजेब महाराष्ट्रावर चाल करून आला, व राजारामास जिंजीस पळून जावें लागलें. तेव्हां कोणतीच व्यवस्था अमलांत राहिली नाहीं. पुढें औरंगजेब मरण पावल्यावर मराठे सरदारांस स्वतंत्रतेनें वागण्याची झालेली संवय थोडीच एकदम जाणार ? अशा स्थितींत सरदारांना जहागिरी देऊन बाळाजीनें राज्यांत व्यवस्था केली. सरदारांना जहागिरी देतांना बाळाजीनें पुढील अटी घातल्या.

१ सरदारांनीं आपआपल्या मुलखांत लष्करी व मुलकी अम्मल चालवावा.

२ छत्रपति व त्यांचे मुख्य प्रधान यांच्या हुकुमाशिवाय कोणत्याही सरदारानें परराष्ट्राशीं लढाई किंवा तह करूं नये.

३ ठरविलेली खंडणी सरकारांत भरावी.

४ जहागिरीचे हिशेब सरकारच्या दरफदारांस तपासूं द्यावे.

३ या अटी सरदारांनीं मोठ्या खुषीनें पत्करिल्या. जवळचा मोंगलांचा प्रांत काबीज करून आपली जहागीर वाढविण्याची जो तो सरदार खटपट करूं लागला. शिवाय प्रत्येक मराठा सरदाराचें महाराष्ट्रांत मुख्य सत्तेच्या हद्दींत कांहीं वतन असे तें राखण्यासाठीं तो मुख्य सत्तेशीं नम्रपणानें वागे. या व्यवस्थेनें कान्होजी आंग्र्यास कोंकण, खंडेराव दाभाड्यास खानदेश, परसोजी भोंसल्यास वऱ्हाड व परशुरामपंत प्रतिनिधीस नीरा व वारणा या नद्यांमधील मुलूख मिळाला.

४ या वेळीं दिल्लीस फर्रुखसेयर बादशहा होता. त्याला अबदुल्ला व हुसेन या सय्यदबंधूंनीं गादीवर बसविलें होतें. त्यामुळें सय्यद बंधूंच्या हुकुमाशिवाय राज्यांतील पानसुद्धां हालेनासें झालें. लवकरच बादशहास या परावलंबनाचा कंटाळा आला व त्यानें सय्यदांची ताडातोड करण्याचा बेत करून हुसेन अल्लीची दक्षिणच्या सुभ्यावर रवानगी केली. यानंतर बादशहा एकसारखा सय्यदांच्या नाशाच्या खटपटी करीत राहिला.

तेव्हां हुसेन अलीनें मराठ्यांच्या मदतीनें दिल्लीवर चालून जाण्याचा निश्चय केला. मराठ्यांस चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा बादशहापासून मिळवून देण्याचा करार करून हुसेन अलीनें मराठ्यांची मदत मिळविली व तो दिल्लीस गेला. त्याच्याबरोबर बाळाजी विश्वनाथ व खंडेराव दाभाडे हे फौज घेऊन होते.

५ दिल्लीस गेल्यावर सय्यदांनीं फर्रुखसेयरची समजूत काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यांचे श्रम व्यर्थ गेले. शेवटीं त्यांनीं त्याचे डोळे काढले व त्यास ठार केलें. त्याच्या मागून दोन बादशहा गादीवर बसविले, पण ते लवकरच मेले. शेवटीं तिसऱ्या एका पुरुषाचें महमदशहा असें नांव ठेवून सय्यदांनीं त्याला गादीवर बसविलें ( १७१९ ); व त्याच्याकडून सनदा मिळवून देण्याची हुसेनअलीनें बाळाजीस हमी दिली.

६ मराठ्यांस सनदा मिळणार हें दरबारांतील लोकांस आवडलें नाहीं; व त्यांनीं पेशवे सनदा घेऊन बाहेर पडतील तेव्हां त्यांस ठार मारून सनदा हिसकावून घेण्याचा बेत केला. तेव्हां सनदा घेऊन नीटपणें आपण कसें बाहेर पडूं याची बाळाजीस चिंता लागली. इतक्यांत बाळाजी महादेव भानू जवळ होता, तो म्हणाला “ तुम्ही दरबारांतून सनदा घेऊन निराळ्याच वेषानें बाहेर पडा. मी तुमचा पोशाक घालून पालखींत बसून थाटानें येतों. ” बाळाजीस ही युक्ति पसंत पडली. मग दरबारांतून सनदा घेऊन ठरल्याप्रमाणें आडवाटेनें तो आपल्या लष्करांत येऊन दाखल झाला. बाळाजीपंत भानू पेशव्यांच्या पालखींत बसून निघाला. लोकांनीं त्यास पेशवा समजून ठार केलें. अशा रीतीनें बाळाजीपंत भानूनें स्वराष्ट्राकरितां प्रत्यक्ष देह अर्पण केला. प्रसिद्ध नाना फडणीस हा याचा नातू होय.

७ बाळाजी सनदा घेऊन व फौजेचा झालेला खर्च घेऊन दक्षिणेंत आला. त्यानें तीन सनदा मिळविल्या. एक वऱ्हाड, खानदेश, औरं-

गाबाद, बेदर, विजापूर व हैद्राबाद या साही सुभ्यांच्या चौथाईची; दुसरी सरदेशमुखीची; व तिसरी शिवाजीनें जिंकलेल्या मुलुखाची म्हणजे स्वराज्याची. या सनदांनीं मिळालेला वसूल कोणास मिळावयाचा व तो कोणीं गोळा करावयाचा याची व्यवस्था लावण्यांत बाळाजीनें एक वर्ष घालविलें. नंतर तो १७२० त मृत्यु पावला. याप्रमाणें बाळाजीनें मराठे सरदारांत ऐक्य उत्पन्न केलें व नवीन वसूलबाबी मिळवून देऊन पराक्रम गाजविण्यास त्यांस मार्ग उघडा करून दिला. त्यामुळें मराठी राज्य पुढील चाळीस वर्षांत मोठ्या झपाट्यानें वाढलें. परंतु दुर्दैवानें मराठे सरदारांत पुरी एकी नांदली नाहीं व त्यामुळें मराठी राज्य चिरस्थायी झालें नाहीं !

---

## २५ निजामाचा मोड १७२८.

१ बाळाजीस दोघे मुलगे होते. वडील बाजीराव आणि धाकटा चिमाजीआप्पा. दोघेही शूर होते व चिमाजी नेहमीं बाजीरावाच्या आज्ञेमध्यें वागत असे. त्यावरून रामलक्ष्मणांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. शाहूनें बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें दिलीं व बाळाजीप्रमाणें पराक्रम करून स्वामिसेवा करण्याविषयीं उत्तेजन दिलें. बाजीरावानें लागलीच खानदेशाकडे एक स्वारी केली व मोंगलांच्या मुलुखांतील चौथाई न देणाऱ्या फौजदारांचें पारिपत्य केलें. दोन तीन वर्षांत माळव्यावर त्याच्या तीन मोहिमा झाल्या. त्याचें धाडस कांहीं विलक्षण होतें. त्यामुळें मराठे शिलेदारांवर त्याचा तेव्हांच वचक बसला व ते त्याच्या आज्ञेप्रमाणें वागूं लागले.

२ यावेळीं दक्षिणच्या सुभ्यावर निजामुल्मुल्क हा कर्तबगार पुरुष होता. त्यास दक्षिणेंत स्वतंत्र अधिकार मिळविण्याची इच्छा उत्पन्न झाली. अर्थातच दिल्लीच्या बादशहास ही गोष्ट आवडली नाहीं व त्यानें दक्षिणेकडील आपल्या पक्षाच्या लोकांस निजामाशीं युद्ध करण्याची भर

दिली. तेव्हां निजामुल्मुल्कानें बाजीरावाशीं संधान बांधिलें व त्याच्या मदतीनें बादशहाच्या पक्षाच्या लोकांचा साखरखेडें यथें मोड करून निजामुल्मुल्क विजयी झाला ( १७२४ ). त्याला आपण बादशहाच्या जांचांतून अजीबात सुटलों असें वाटलें व आनंद झाला.

३ निजामुल्मुल्काला आतां एक नवीनच शत्रु उत्पन्न झाला. मराठ्यांचा साही सुभ्यांवर खंडणी घेण्याचा हक्क त्यानें कबूल केला होता. त्या हक्काचा वसूल दरसाल मराठे करीत. त्यामुळें आपल्या मुलुखांत स्वस्थता ठेवणें निजामाला फार अवघड पडूं लागलें. मग एकदां बाजीराव कर्नाटकांत स्वारीवर गेला असतां शाहूजवळ श्रीपतराव प्रतिनिधी होता. निजामानें प्रतिनिधीस वऱ्हाडांत जहागीर देऊन खूष केले व त्याच्या मध्यस्थीनें शाहूपासून ‘ हैद्राबादजवळच्या मुलुखांत मराठे चौथाई व सरदेशमुखी वसूल करणार नाहींत ’ अशी सवलत मिळविली. याची बातमी बाजीरावास लागतांच त्याला प्रतिनिधीचा राग आला, व त्याचें प्रतिनिधीशीं भांडण झालें. हें निजामास कळलें तेव्हां मराठ्यांत दुही पाडण्याचें धोरण पुढें चालविण्याचा त्यानें विचार केला, व कोल्हापूरच्या संभाजीस हातीं धरलें. त्यानें शाहूकडील वसूल करणाऱ्या लोकांस हाकून दिलें व शाहूस निरोप पाठविला कीं, “तुमचे लोक वसूल करण्यास येतात, आणि कोल्हापूरच्या संभाजी राजाचेही येतात. या तुह्मां दोघांपैकीं खरा वारस कोण हें अगोदर ठरवा; म्हणजे मग खऱ्या वारसास मी हक्क वसूल करूं देईन.”

४ हा मग्रुरीचा निरोप ऐकून शाहूस अत्यंत क्रोध आला. त्यानें बाजीरावास निजामाची खोड मोडण्याची परवानगी दिली. बाजीराव फौज घेऊन निघाला व निजाम आणि त्याचे साह्यकर्ते संभाजी व चंद्रसेन यांच्या फौजा एक होण्यापूर्वींच त्यानें जालना प्रांतांत शिरून खूप खंडणी वसूल केली. मग बऱ्हाणपुरावर आपण स्वारी करणार अशी अवई

उठवून भरारी मारीत बाजीराव गुजराथेंत शिरला व निजामुल्मुल्काच्या हुकुमानें आपण खंडणी घेत आहोंत असें त्यानें तेथें जाहीर केलें. इकडे निजामुल्मुल्क मोठ्या घाईनें बऱ्हाणपुरास गेला. तेथें गेल्यावर बाजीरावानें आपणास पुरतें चकविलें असें त्यास आढळून आलें. मग पुणें जाळून टाकावें या उद्देशानें तो परत फिरला. तो अहमदनगरास पोंचला नाहीं तोंच बाजीराव आपल्या मुलुखांत लुटालूट करीत आहे असें त्यास कळलें. मग फजित पावून निजाम तसाच आपल्या मुलुखांत गेला. कांहीं दिवस मराठे व निजाम यांच्या चकमकी होत होत्या. शेवटीं बाजीरावानें निजामास पालखेड येथें अशा अडचणींत कोंडिलें कीं, त्यास पाणी मिळेना, धान्य मिळेना ! निजाम अगदीं जेरीस आला व त्यानें बाजीरावाशीं तह केला. त्याप्रमाणें चौथाई व सरदेशमुखी हे हक्क पूर्वीप्रमाणें वसूल करूं देण्याचें निजामानें कबूल केलें. निजामानें संभाजीस पन्हाळ्यास पोंचवावें, मग शाहूनें त्याच्याशीं काय वाटेल तो ठराव करावा, निजामानें मध्यें पडण्याची जरूर नाहीं असें ठरलें ( १७२८ ).

---

## २६ शिंदेहोळकरांचा उदय.

१ होळ म्हणून नीरेचे कांठीं जेजुरीजवळ एक खेडें आहे. तेथें खंडुजी नांवाचा एक चौगुला पाटलाच्या हाताखालीं काम करून असे. त्याला मल्हारजी नांवाचा एक मुलगा होता. मल्हारजी तीन वर्षांचा असतांच खंडुजी वारला. मग मल्हारजी आईसह आपल्या मामाच्या घरीं राहूं लागला. मामानें त्याला मेंढरें राखण्याचें काम सांगितलें. एके दिवशीं दोन प्रहरची वेळ होती. मल्हारी थकून एका झाडाखालीं निजला होता. इतक्यांत एका नागानें त्याच्यावर फणेची छाया केली. इतक्यांत मल्हारजीची आई भाकरी घेऊन आली. तिनें तें पाहिलें व भयभीत होऊन माघारी जाऊन ती भावास घेऊन आली. शेवटीं

माणसांची गर्दी झाल्यावर नाग बिळांत निघून गेला. हा वृत्तांत एका ज्योतिष्यास कळला; तेव्हां तो म्हणाला, " या मुलाला राज्य मिळणार."

२ मामानें मल्हारजीस रानांत पाठविणें बंद केलें व त्यास घोड्यांची देखरेख सांगितली. कांहीं दिवसांनीं मल्हारजी शिलेदारी करूं लागला. याच वेळीं बाजीराव पेशव्याच्या माळव्यांत स्वाऱ्या सुरू झाल्या. त्यांत मल्हारजीचा पराक्रम दिसून आला. मग पांच हजारापर्यंत फौज त्याच्याजवळ झाली व त्यास मल्हारराव होळकर हें नांव मिळालें.

३ सातारा जिल्ह्यांत कोरेगांव तालुक्यांत कण्हेरखेड म्हणून एक गांव आहे त्या गांवची पाटीलकी शिंदे घराण्याकडे होती. नेमाजी शिंदे या सरदाराचें नांव मागें आलेंच आहे. पण या वेळीं त्या घराण्यास गरिबी आली होती. राणोजी शिंदे हा पहिल्यानें बाळाजी विश्वनाथाच्या सैन्यांत बारगिरी करीत असे. बाजीरावाची हुजऱ्याची नोकरी त्यानें आतां पत्करिली होती. एके दिवशीं बाजीरावास दरबारांत कामामुळें बराच उशीर झाला. काम आटोपल्यावर बाहेर येऊन पाहतो तों राणोजीस झोंप लागली आहे, पण त्यानें आपले ( बाजीरावाचे ) जोडे घट्ट उशाशीं धरले आहेत.

४ एकदां मल्हारराव होळकर हिंदुस्थानांत स्वारी करण्यास निघणार होता. तेव्हां त्याच्याबरोबर पेशव्याची एक पागा द्यावयाचें ठरलें होतें. एके दिवशीं बाजीराव होळकरास म्हणाला, तुह्मी सांगाल त्यास पागा देतों. राणोजी पेशव्यावर चवरी वारीत होता. त्याच्याकडे होळकरानें बोट केलें. तेव्हां बाजीरावानें पागेचीं वस्त्रें राणोजीस दिलीं. पुढें तो पराक्रम करून होळकरांच्या बरोबरीचा सरदार झाला.

५ तिसरा एक सरदार उदाजी पवार हा माळव्यांत मुलूखगिरी करीत असे. पेशव्यांनीं माळवा प्रांताच्या वसुलाच्या वांटण्या पाडल्या. त्यांत शेंकडा ४५ पेशव्यांनीं घ्यावयाचे; बाकीच्या ५५ त २२।। शिंदे,

२२।। होळकर व १० पवार अशा वांटण्या झाल्या. शिंदे, होळकर व पवार कायमचेच माळव्यांत राहूं लागले. शिंदे उज्जनीस, होळकर इंदुरास व पवार धारेस असे रहात.

६ एकदां बाजीराव निजामुल्मुल्कास भेटण्यास औरंगाबादेस गेला होता. बाजीरावाबरोबर फौज नव्हती. कांहीं खिजमतगार मात्र बरोबर होते. उभयतांच्या भेटी होऊन बिछायतीवर बसले. बरींच बोलणीं झाल्यावर नबाब बाजीरावास म्हणाला, "आतां तुमचे शिंदेहोळकर कोठें आहेत? आम्हीं दगा केल्यास कसें होईल?" बाजीरावानें उत्तर केलें, "आपण असा विश्वासघात करणार नाहीं. केलाच, तर माझे शिंदे होळकर येथें प्रकट होऊन, जेथें माझें शीर तेथें त्यांचीं शिरें पडतील." इतकें बोलणें होतांच खिजमतगारांत उभे असलेले शिंदे होळकर एकदम सलामास पुढें आले. हें पाहून नबाब चपापला.

---

## २७ गजेंद्रमोक्ष १७२९.

१ बाजीरावास पेशवाई मिळाल्यावर मराठ्यांनीं जोरदार धोरण स्वीकारिलें. माळवा प्रांतावर एकसारख्या त्यांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या. त्या प्रांताचे दोन सुभेदार लढाईंत पडले. तेव्हां माळव्यावर चांगल्या खंबीर पुरुषाची योजना करण्याचें बादशाहानें ठरविलें. व अलाहाबादेचा सुभेदार महमदखान बंगष हा या कामास चांगला आहे असें पाहून त्यानें त्याची माळव्यावर नेमणूक केली.

२ महमदखान बंगषास मराठ्यांनीं पूर्वींच्या सरदारांची लाविलेली वाट ठाऊक होती; त्यामुळें त्यानें पहिल्यापासूनच सावधगिरी ठेवण्याचा निश्चय केला. मराठ्यांची स्वारी माळवा प्रांतांत उतरण्यापूर्वींच त्या प्रांतांतील राजे लोकांस आपल्या हाताखालीं आणण्याचा त्यानें उद्योग आरंभिला. पहिल्यानें बुंदेलखंडावर त्यानें स्वारी केली. बुंदेलखंडाचा

राजा छत्रसाल हा म्हातारा झाला होता. तेव्हां तो स्वतः मोहिमेवर जाण्यास निरुपयोगी झाला होता. त्याला दोघे मुलगे होते; पण तेही फारसे कर्तृत्ववान नव्हते. अशा स्थितींत मराठ्यांना मदतीस बोलवावें म्हणजे ते या बंगषाचा समाचार घेतील असा छत्रसालाच्या मनांत विचार आला. मग लागलीच शंभर दोहऱ्यांचें एक पत्र लिहून त्यांत त्यानें बाजीरावास माळव्यांत येण्याविषयीं लिहिलें.

३ बाजीरावानें पुण्यास शनिवारचा वाडा बांधण्यास सुरवात केली होती; त्यामुळें तो त्या वेळीं पुण्यास होता. याच वेळीं छत्रसालानें पाठविलेलें पत्र बाजीरावास पोहोंचलें. त्यांतला एक दोहरा असा होता:—

**जो गति ग्राह गजेंद्रकी सो गत भइ है आज ।**
**बाजी जात बुंदेलकी राख बाजी लाज ॥**

अर्थ:—गजेंद्रास जेव्हां मगरानें धरिलें तेव्हां त्याची जशी स्थिति झाली तशी आज माझी झाली आहे; श्रीविष्णूनें गजेंद्राचें रक्षण केलें, तसें, अहो बाजीराव, तुह्मी माझें करा.

असें तें पत्र वाचून, गजेंद्राचा धांवा ऐकून जसें विष्णूच्या पोटांत कालवलें, तसेंच बाजीरावास झालें. बुंदेलखंडांत जाऊन बंगषास केव्हां पिटाळून लावीन असें त्यास झालें. तो एकदम पुण्याहून निघाला व नर्मदा उतरून गेला. मग धामोरा या ठिकाणीं छत्रसालाची त्यानें भेट घेतली व बंगषाचा पराभव करण्याकरितां तो मोठ्या ईर्षेनें पुढें चालून गेला. जैतपूर मुक्कामीं दोन्ही सैन्यांची गांठ पडली. बंगष मोठ्या शर्थीनें लढला, पण त्याजवर मराठ्यांनीं असा कांहीं जोराचा मारा केला कीं बंगषाची फौज दशदिशा पळूं लागली. खुद्द बंगष जीव घेऊन पळून गेला १७२९.

४ या कामगिरीबद्दल छत्रसाल अगदीं खूष झाला व त्यानें बाजीरावास झांशी व तिच्याजवळचा अडीच लक्षांचा मुलूख दिला. फिरून

दोन महिन्यांनीं महमदखान बंगषाचा मुलगा कायमखान बंगष बुंदेल-खंडांत शिरला. ही बातमी कळतांच बाजीराव वाघासारखा त्याच्या अंगावर चवताळून गेला, व त्यानें कायमखानाचा पुरा मोड केला. या कामगिरीमुळें तर छत्रसालाची बाजीरावावर फारच मर्जी बसली. छत्र-साल आतां अगदीं मरावयास टेंकला होता. " जसे हे माझे दोन पुत्र तसेच तुम्ही तिसरे. " असें म्हणून त्यानें आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा बाजीरावास दिला. प्रसिद्ध मस्तानी ही बाजीरावास येथेंच नजर मिळाली. बाजीरावाजवळ गोविंदा खेर नांवाचा एक शागीर्द होता, त्यानें या युद्धांत बराच पराक्रम केला होता. त्यास बाजीरावानें नवीन मिळालेल्या मुलखाचा सुमेदार नेमलें. हाच गोविंदा पुढें गोविंदपंत बुंदले अगर झांशीवाले या नांवानें प्रसिद्धीस आला.

---

## २८ कोल्हापूरकर संभाजीशीं समेट १७३१.

१ निजामाशीं झालेल्या लढाईंत कोल्हापूरच्या संभाजीचा फारच अपमान झाला होता. त्याचें उट्टे काढण्यास योग्य संधीची तो वाट पहात होता. उदाजी चव्हाण हा पुंड मिरजेकडे चौथाई वसूल करीत असे, म्हणून मागें सांगितलेंच आहे. या उदाजी चव्हाणानें शाहू एकदां शिकारीस गेला असतां त्याच्यावर मारेकरी घालण्यास कमी केलें नाहीं. तेव्हां संभाजीस उदाजी चव्हाणाचें आयतेंच साहाय्य मिळालें. उदाजी चव्हाण व संभाजी हे दोघे एक होऊन फौज बरोबर घेऊन वारणा नदी उतरले. आणि शाहूचा मुलख लागतांच लुट लूट करण्यास त्यांनीं आरंभ केला. संभाजीनें स्वारीवर आपलीं बायकामाणसेंसुद्धां आणलीं होतीं.

२ त्यांच्या दंग्याची हकीकत शाहूस समजली तेव्हां बाजीराव गुजरा-थेकडे गुंतला होता. अशा वेळीं त्याचें पारिपत्य करण्यास कोणास पाठवावें

या चिंतेंत शाहू होता. इतक्यांत त्याची काळजी दूर झाली. श्रीपतराव प्रतिनिधीनें एक कृष्णराव खटावकराचें बंड मोडलें तेव्हांपासून कोणताही पराक्रम केला नव्हता. त्यामुळें प्रतिनिधि अगदीं मागें पडला. त्यांतून प्रतिनिधीच्या मसलतीनें निजामुल्मुल्काशीं आंतबट्ट्याचा तह करावा लागला होता. तो बाजीरावास मुळींच मान्य न होऊन निजामुल्मुल्काशीं त्यानें एकदम युद्ध सुरू केलें, व निजामास चौथाई व सरदेशमुखीचें हक्क कबूल करावयास लाविलें. या गोष्टींनीं शाहूस बाजीराव अत्यंत प्रिय व तितक्याच मानानें प्रतिनिधि अप्रिय झाला होता. इतक्यांत सुदैवानें बाजीराव उत्तरेकडे जाण्यास व संभाजीचा दंगा उपस्थित होण्यास एकच गांठ पडली. तेव्हां ही संधी उत्तम आहे असें पाहून प्रतिनिधीनें संभाजीचें पारिपत्य करण्याचें काम पत्करिलें.

३ मग त्यानें एकदम संभाजीच्या लष्करावर छापा घातला, व त्याची सर्व चीजवस्त लुटली. तेव्हां संभाजी पन्हाळ्याकडे पळून गेला. आणि ताराबाई व तिची सवत राजसबाई या प्रतिनिधीच्या हातांत सांपडल्या. याप्रमाणें संभाजीचा पराजय झाल्यावर त्या दोघींस घेऊन प्रतिनिधि साताऱ्यास आला. ताराबाईचा शाहूनें सन्मान केला. परत जाण्याविषयीं तिला विचारिलें असतां "कोठेंही कैदेंत रहावयाचें. व ते तुम्ही दोघेही मला सारखेच आहां; तुम्हांपाशींच राहतें." असें ती म्हणाली, तेव्हां तिला साताऱ्याच्या किल्ल्यांत ठेविलें.

४ संभाजीची खात्री झाली कीं, शाहूपुढें आपलें कांहीं चालत नाहीं; तेव्हां त्यानें स्वतः होऊनच सलोखा करण्याविषयीं बोलणें काढिलें. शाहूनें त्याला भेटीस बोलाविलें. मग कऱ्हाडाजवळ जखिणवाडी येथें दोघांच्या भेटी झाल्या. शाहू संभाजीसह साताऱ्यास आला. तेथें सन १७३१ त उभयपक्षीं तह ठरून वारणा व तुंगभद्रा या नद्यांमधील मुलूख संभाजीस दिला. कोपळ किल्ला संभाजीस देऊन शाहूनें रत्नागिरी आप-

त्याकडे घेतला. कोंकणांत साळशीपासून दक्षिणेकडचा मुलूख संभाजीस देण्यांत आला. येणेंप्रमाणें शाहूची मोंगलाच्या हातून सुटका झाल्याबरोबर ताराबाईनें जो तंटा सुरू केला होता तो या तहानें पूर्णपणें मिटला.

---

## २९ आपसांत लढाई १७३१.

१ गुजराथ प्रांतांत कंठाजी कदम बांडे व दाभाडे हे सरदार वसुलासाठीं धुमाकूळ घालीत. त्यामुळें तेथें स्वस्थता नव्हती. तेथील सुभेदारानें दिल्लीच्या बादशहास मदत करण्याविषयीं पुनःपुनः लिहिलें; पण उपयोग होईना. शेवटीं बाजीराव पेशव्यास त्यानें प्रांताचा बंदोबस्त राखण्यासाठीं मदतीस बोलाविलें. चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याची परवानगी मिळवून बाजीरावानें सुभेदारास मदत करण्याचें कबूल केलें. मग गुजराथचा बंदोबस्त करून २५०० घोडेस्वार बाजीरावानें त्या प्रांतीं ठेवून दिले.

२ हें कृत्य त्या प्रांतांतील मराठे सरदारांस रुचलें नाहीं. खंडेराव दाभाडे आतां मृत्यु पावला होता व सेनापतीपद त्याचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे यास मिळालें होतें. बाळाजी विश्वनाथानें प्रांताची वांटणी केली तेव्हां गुजराथ दाभाड्याकडे सोंपविली होती. आपल्या प्रांतांत पेशवे ढवळाढवळ करूं लागले हें त्रिंबकरावास खपलें नाहीं. दाभाडे रागावला आहे ही संधि साधून, निजामानें मागें कोल्हापूरच्या संभाजीस हातीं धरून जशी लढाई केली तशीच आतां दाभाड्याशीं ऐक्य करून लढाई करण्याचा बेत केला.

३ त्रिंबकरावानें युद्धाची तयारी केली. त्याला बरेच मराठे सरदार मिळाले. त्याची एकंदर फौज पसतीस हजार जमली. अशी मोठी फौज घेऊन तो निजामास मिळण्यासाठीं दक्षिणेकडे येऊं लागला. बाजीरावास लवकरच निजाम व दाभाडे या दोघांच्या कटाची बातमी लागली. मग

त्यानें निजामुल्मुक मिळण्यापूर्वीं दाभाड्यास गांठून एकट्याशींच लढाई द्यावी असा बेत केला. मग बाजीराव झपाट्यानें गुजराथेकडे कूच करीत चालला. त्याची फौज दाभाड्याच्या फौजेच्या निम्मीही नव्हती. पुण्याहून निघाल्यापासूनच, ' निजामास मिळून गृहकलह वाढविण्यांत कांहीं अर्थ नाहीं ' असें बोलणें दाभाड्याशीं त्यानें चालविलें. परंतु दाभाड्यास अनावर क्रोध आला होता व स्वजन कोण, परका कोण हें ओळखण्याइतकेंही त्याचें डोकें शांत नव्हतें. त्यामुळें शांततेच्या मार्गानें तंटा मिटविण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले.

४ बाजीरावाचा सरदार आवजी कवडे हा मुख्य सैन्यापासून जरा पुढेंच होता. तो नर्मदा उतरला, तेव्हां त्याची व शत्रूच्या एका टोळीची गांठ पडली. दोन्हा टोळयांची चकमक उडून आवजी कवड्याचा पराभव झाला. पण बाजीराव पडला धीराचा सरदार. तो काय असल्या पराभवानें कचरतो ? त्यास उलट दुप्पट हिंमत चढली व त्यानें शत्रूशीं एकदम लगट करून लढाई करण्याचा निश्चय केला.

५ मग बडोद्याजवळ डभई येथें दोन्ही सैन्यांची गांठ पडली. बाजीरावानें एकदम लगट करून हल्ला करतांच दाभाडे यांच्या सैन्यांत नव्यानेंच भरती केलेले लोक पळून गेले. मग रणांगणावर खंडेराव दाभाड्याच्या वेळची फौज तेवढी राहिली. त्रिंबकराव हत्तीवर बसला होता. तो शूर होता. सैन्यांत उडालेल्या गडबडीमुळें मुळींच डगमगून न जातां उरलेल्या फौजेस युद्धाचें सारखें प्रोत्साहन तो देत होता व स्वतः सारखे बाण सोडीत होता. लढाई जोरांत चालली होती. इतक्यांत त्रिंबकराव दाभाड्यास गोळी लागली व तो पडला. दाभाड्याकडील बरेच सरदार पडले; कांहीं पकडले गेले व कांहीं पळून गेले. त्याचा पूर्ण पराभव झाला.

६ या युद्धामुळें दाभाड्यांच्या मनांत पेशव्यांविषयीं वांकडें आलें. पण शाहूनें हें राज्यास अपायकारक असें समजून त्रिंबकरावाची आई उमाबाई दाभाडे हीस सातार्‍यास नेलें. बरोबर बाजीरावासही नेलें.

उभयपक्षीं समाधान करून त्रिंबकराव दाभाडे याचा धाकटा भाऊ यशवंतराव दाभाडे हा होता, त्यास सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. गुजराथचें अर्धें उत्पन्न सेनापतीनें घ्यावें व अर्धें पेशव्यातर्फे सरकारांत द्यावें असा ठराव झाला. यशवंतराव दाभाड्याच्या अंगांत कर्तृत्व मुळींच नव्हतें, शिवाय तो व्यसनी होता. त्यामुळें यापुढें दाभाड्यांनीं नेमलेला कारभारी दमाजी गायकवाड हा गुजराथ प्रांताचा कारभार स्वतंत्रपणें पाहूं लागला. डभईच्या लढाईनंतर आणखी एक फरक झाला. दाभाडे सेनापति श्रावण महिन्यांत तळेगांव येथें ब्राह्मणांस दक्षिणा वांटीत असत. पण आतां त्यांनीं ती बंद केली. तेव्हां पुण्यास पेशवे ती वांटूं लागले. हा दक्षिणा-समारंभ पुढें फार मोठा होऊं लागला.

---

## ३० बाजीरावाची धडाडी.

१ बाजीराव अत्यंत शूर होता; त्याचप्रमाणें तो अगदीं काटक होता. धान्याची कणसें चोळीत व चणेभुरभुरे फाकीत दिवसच्या दिवस तो घोड्यावर स्वार होऊन मजल मारीत असे. पेशवाईवर आल्यावर त्याचीं पहिलीं आठदहा वर्षें घरच्या कलागती मोडण्यांत व निजामुल्मुल्काचा मोड करण्यांत गेलीं. तरी याही काळांत माळव्यांत कित्येक स्वाऱ्या केल्याशिवाय तो राहिला नाहीं. पुढें मात्र हे घरगुती प्रश्न संपले व बाजीरावाचा शत्रूच्या मुलखांत अबाधित संचार सुरू झाला. लवकरच त्यानें परमुलुखावर स्वाऱ्या करून मोठे विजय संपादन केले व मराठ्यांच्या नांवाचा दरारा चोहोंकडे बसविला. या स्वाऱ्यांचें वर्णन या गोष्टींत करूं.

२ कोंकणांत जो मराठ्यांचा मुलूख होता, त्यावर आंग्रे हा मराठा सरदार मुख्य असे. त्याचें राहण्याचें ठिकाण कुलाबा असून तेथून तो मुलुखाचा बंदोबस्त करी. कुलाब्याजवळच समुद्रांत जंजिऱ्याचा किल्ला आहे. तेथील सिद्दी हा मुसलमान सरदार प्रबळ असून त्यानें कोंकणांत

बराच मुलूख मिळविला होता. त्याचीं व आंग्र्याचीं नेहमीं भांडणें होत; आंग्र्यास सिद्दीचा बंदोबस्त आपल्या हातून होणार नाहीं असें वाटलें व त्यानें शाहूपाशीं मदत मागितली. मग शाहूच्या आज्ञेवरून सन १७३३ त बाजीराव कोंकणांत उतरला. लवकरच रायगड, तळें, घोसाळें इत्यादी ठाणीं बाजीरावाच्या हातीं आलीं. खुद्द जंजिऱ्यास बाजीरावानें खुष्की-वरून मोर्चे लाविले व मानाजी आंग्र्यानें तो किल्ला समुद्रांतून वेढला. सिद्दी लोकांत दोन पक्ष होते. एक मराठ्यांचा अंमल मान्य करण्यास तयार होता. लवकरच तो पक्ष वरचढ झाला, व त्या पक्षातर्फे जंजिरा बाजीरा-वाच्या हातीं आला. बाजीरावानें आपल्या तर्फेच्या अबदुल रहमान सिद्दी सरदारास जंजिऱ्यांत स्थापिलें, व मराठी मुलुखास त्रास न देण्याचें सिद्दयापा-सून वचन घेऊन बाजीराव परत गेला. पुढें मानाजी आंग्रे व संभाजी आंग्रे या दोघां आंग्रे बंधूंत भांडण लागलें. तेव्हां बाजीराव फिरून कों-कणांत उतरला. त्यानें मानजीला कुलाब्याचें ठाणें दिलें व संभा-जीला विजयदुर्गास स्थापिलें व दोघां भावांचा तंटा मिटवला ( १७३५ ).

३ बाजीरावाने माळव्यांत शिंदे, होळकर व पवार कायमचे ठेवून दिले होते. त्यामुळें माळवा प्रांताची खंडणी दरवर्षी वसूल होत असे. परंतु माळवा प्रांताच्या चौथाई—सरदेशमुखीची सनद अजून बादशहाकडून मिळाली नव्हती. आतां माळव्याच्या सुभ्यावर जयपुरचा राजा सवाई जयसिंग याची नेमणूक झाली होती. त्याचे व बाजीरावाचें सख्य होतें. त्याच्यातर्फे माळव्याची सनद करून देण्याविषयीं बादशहाशीं बाजीरावानें बोलणें लाविलें. बादशहानें 'माळव्याच्या उत्पन्नापैकीं तेरा लाख रुपये घेण्याबद्दल सनद करून देण्यास आपण तयार आहों,' असें वकील पाठवून बाजीरावास कळविलें. त्या वकीलाब-रोबर गुप्तपणें माळव्याच्या सनदाही दिल्या होत्या, व मराठे तह करीत असतील तर त्या द्यावयाच्या असें दिल्लीस ठरलें होतें. पण ही गुप्त

बातमी बाजीरावास कळली व त्यानें आपल्या मागण्या अतोनात वाढविल्या.

४ मग दोन्ही पक्षीं युद्धाची तयारी झाली. दिल्लीभोंवतीं सैन्य जमा होऊं लागलें. बाजीराव बुंदेलखंडांत होता. तो मोंगलांची पुरी तयारी होण्यापूर्वींच दिल्लीजवळ झीलच्या तलावावर जाऊन तळ देऊन राहिला. तहाचीं बोलणीं चाललींच होतीं. अशांत एकदां सात आठ हजार बादशाही फौज बाजीरावावर चालून आली. लढाई झाली. तींत मराठ्यांचा पूर्ण जय झाला (१७३७). इतक्यांत निरनिराळ्या ठिकाणचे मोंगल सरदार दिल्लीजवळ एक झाले. गंगा व यमुना यांजमधील प्रदेशास दुआब म्हणतात. त्या दुआबांत या लोकांस आपल्या पाठीवर घेऊन बुडवावें असा बाजीरावानें विचार केला व तो जयपुरास आला; परंतु लवकरच त्याला दक्षिणेकडे जावें लागलें व हा बेत सिद्धीस गेला नाहीं.

५ यापुढें बादशहानें माळव्याच्या बचावाची एक निराळीच युक्ति काढिली. निजामुल्मुल्कास दिल्लीस बोलावून नेऊन माळवा व गुजराथ प्रांत त्याच्या स्वाधीन केले. या दोन्ही प्रांतांतून मराठ्यांस मी हाकून देईन असें बादशहानें त्याच्यापासून वचन घेतलें. मग चौतीस हजार सैन्य व उत्तम तोफखाना बरोबर घेऊन निजाम सिरोंज येथें आला. इकडून बाजीरावही नर्मदा उतरून चाल करून आला. मराठे जवळ आले असें पाहतांच निजाम भोपाळ किल्ल्याच्या आश्रयास राहिला. मराठ्यांनीं त्या स्थळास वेढा घातला. निजामाच्या तोफखान्यामुळें मराठ्यांचें बरेंच नुकसान झालें. तथापि मराठ्यांनीं लवकर शत्रूस चोहोंकडून घेरलें. दाणावैरण बंद केली. बरेच दिवस निजामानें दम धरला; पण शेवटीं बाहेरून मदत येण्याची आशा नाहीं असें पाहून जड सामान भोपाळ किल्ल्यांत टाकून तोफखान्याच्या आश्रयानें तो परत जाऊं लागला. पण मराठ्यांच्या हल्ल्यामुळें तीनचार मैलावर जमीन चालून होईना. शेवटीं निजामानें तह केला. त्यानें लिहून दिलें कीं

'तुह्मांस माळवा प्रांताची सनद व नर्मदा आणि चंबळा यांजमधील सर्व मुलूख बादशहापासून मी मिळवून देईन व फौजेच्या खर्चाबद्दल पन्नास लाख रुपये देवविण्याचे मी हमी घेतों ' ( १७३८ ).

---

## ३१ माझें मस्तक तरी किल्ल्यांत पडूं दे १७३९.

१ हिंदुस्थानांत युरोपियन लोक व्यापाराकरितां येऊन ठाणीं करून राहूं लागले, त्यास मूळ आरंभ पोर्तुगीज लोकांपासून झाला. त्यांचा मुख्य सरदार वास्को डिगामा हा पहिल्यानें कालिकोट बंदरावर आला. गोवें प्रांत व हल्लींच्या ठाणें जिल्ह्याचा सर्व पश्चिम भाग हीं हळु-हळू त्यांच्या ताब्यांत आलीं. त्यांच्या राजानें मुंबई बेट इंग्रज राजास आंदण दिलें होतें. पोर्तुगीजास धर्मवेड फार होतें. त्यामुळें त्यांच्या राज्यांतील हिंदुप्रजेस फार त्रास होऊं लागला. 'गांवचे गांव घेऊन बाटविले. देवालयें फोडून साफ केलीं. ब्राम्हणांस मुलुखांत फिरण्याची बंदी झाली.' तेव्हां त्या प्रांतांतील लोकांनीं पोर्तुगीजांच्या जुलमापासून सुटका करण्याची पेशव्यांस विनंति केली. बाजीराव व चिमाजीआप्पा यांनीं 'सवड सांपडताच पोर्तुगीजांचें कार्य हातीं घेतों ' अशीं त्यांस उत्तरें पाठविलीं.

२ १७३७ त चिमाजीनें साष्टी बेट काबीज केलें. नंतर पुन: १७३९ त तो कोंकणांत उतरला व त्यानें पोर्तुगीजांचा वसई प्रांतांतील अम्मल पुरा उठविण्याचा निश्चय केला. त्यानें मराठे सरदारांस निरनिराळीं ठाणीं हस्तगत करण्यास पाठविलें. राणोजी शिंद्यानें डहाणू घेतलें. तारापुरास तर मोठी निकराची लढाई होऊन तींत बाजी भीमराव रेटरेकर पडला. पण शेवटीं तें स्थळ मराठ्यांच्या हस्तगत झालेंच. अशीं भराभर स्थळें काबीज झालीं. शेवटीं एका वसईखेरीज पोर्तुगीजांकडे कांहीं राहिलें नाहीं. तेव्हां चिमाजी आप्पानें वसईस वेढा घातला.

३ वसई मोठी बळकट जागा. पश्चिमेस व दक्षिणेस खाडी आणि

पूर्वेकडून चिखल. त्यामुळें दोहोंकडूनही हल्ला करणें अशक्य होतें. एकट्या उत्तरेकडून हल्ला करावयाचा तर तिकडेही वाळू होती. त्यामुळें त्रास फार होई. मराठ्यांनीं खुप जोर केला, पण पोर्तुगीजांच्या बंदुकीपुढें कांहीं चालेना. दोन महिने झाले तरी जयाचें कांहींच चिन्ह दिसेना.

४ आप्पानें तर निश्चय केला होता कीं, ' वसई घेतल्याशिवाय परत फिरणार नाहीं. ' त्यानें सरदार लोकांस बोलावून म्हटलें " माझें डोकें उडवून तरी वसईच्या किल्ल्यांत टाका. " या आप्पाच्या निर्वाणीच्या शब्दांनीं मराठे लोकांस स्फुरण चढलें, व लागलीच वसईचें काम ताबडतोब शेवटास नेण्याच्या खटपटीस ते लागले. दहा सुरुंग तयार केले होते. कांहीं सुरुंगांस बत्त्या दिल्या. अर्धवट सुरुंग उडाले; पण कांहीं लोक घाईनें तसेच वर चढून गेले. इतक्यांत उरलेले सुरुंग उडाले व सर्व लोक जाया झाले. परंतु मल्हारराव होळकरानें केलेला सुरुंग अजून उडावयाचा होता. तो सुरुंग उडतांच किल्ल्यावर निशाणें लावण्याचा बेत करून तो उडविला, तो उडतांच अर्धा बुरुज कोसळला. त्याबरोबर मराठे वर चढले व त्यांनीं हल्ल्यास सुरुवात केली. पोर्तुगीज लोकांनीं आंतून तोफांचा मारा केला, पण मराठे त्या बुरुजावरून हटत ना. तेव्हां नाइलाज होऊन पोर्तुगीज किल्ला सोडण्यास तयार झाले. आठ दिवसांच्या आंत पोर्तुगीजांनीं सर्व चीज वस्त घेऊन चालतें व्हावें, असा करार झाला. नंतर मराठ्यांचें निशाण किल्ल्यावर फडकूं लागलें. ( सन १७३९ ).

५ वेढा चालू असतां एके दिवशीं एका पोर्तुगीज सरदाराची बायको जहाजांत बसून बाहेर निघाली. तिला कांहीं मराठ्यांनीं जाऊन धरून आणून आप्पाच्यापुढें उभी केली. " हिला कशास धरून आणली ? " असें बोलून आप्पानें तिला परत जाऊं दिलें.

---

## ३२ आतां हिंदुमुसल्मानांनीं एक झालें पाहिजे !

१ बाजीरावानें निजामुल्मुल्कास भोपाळ्यांत कोंडलें होतें त्या वेळीं नागपुरकर रघूजी भोंसल्यानें अलाहाबादपर्यंत स्वारी केली, व तेथील सुभेदारास ठार मारून व बरीच खंडणी उकळून तो नागपुरास परत आला. मराठ्यांची पोर्तुगीजांबरोबर चाललेली लढाई ऐन रंगांत आली असतां रघूजीनें पूर्वेकडे स्वारी करून सर्व कटक प्रांत लुटून फस्त केला. त्यानें या दोन्ही स्वाऱ्या पेशवे दुसरीकडे गुंतले आहेत असें पाहून केल्या. त्यांस त्यांची परवानगी घेतली नव्हती. रघूजीचें हें वर्तन पाहून बाजीरावास राग आला व त्यानें त्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला.

२ इतक्यांत दिल्लीहून पुढील बातमी आली—" इराणचा बादशहा नादिरशहा दिल्लीवर चालून आला. युद्ध झालें. नादिरशहानें महमदशहास कैदेंत टाकिलें आहे. दिल्लींत कत्तल केली, तींत सुमारें दोन लक्ष लोक ठार झाले, व यापुढें त्याचा दक्षिणेकडे चालून येण्याचा बेत आहे." बाजीरावास या वेळीं अतिशय कर्ज झालें होतें. त्यामुळें पैसा मिळून फौज तयार होणें अवघडच होतें. चिमाजी आप्पा वसईकडे गुंतला होता. अशा वेळीं नादिरशहाची वरील बातमी बाजीरावास लागली. तरी बाजीरावाचें धैर्य किमपीही ढळलें नाहीं. उलट जितकें भयंकर संकट त्यावर कोसळलें त्या मानानें त्यास विलक्षण अवसान आलें.

३ ब्रह्मेंद्रस्वामी ह्मणून बाजीरावाचे गुरु होते. त्यांस या सुमारास बाजीरावानें एक पत्र लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो, " नादिरशहा दिल्लीस दाखल झाले आहेत. याउपरी दक्षिणेवर स्वारी होणार आहे. याउपरी त्यांस कोणी गनीम ( शत्रु ) आहे असें नाहीं. आम्ही त्यांस व ते आम्हांस गनीम आहों. अशास जों तेथून ( दिल्लीहून ) ते निघाले नाहींत तों तमाम मराठे फौजा एकत्र होऊन चमेली ( चंबळा ) पार होऊन त्यास अलीकडे येऊं न द्यावें, असा विचार आहे. " दुसरे एके

ठिकाणीं बाजीराव म्हणतो " आपलीं घरगुती भांडणें--रघूजीचें पारिपत्य, पोर्तुगीजांचा पराभव, हीं बाजूला ठेवलीं पाहिजेत. आतां सर्व हिंदुस्थानास एक शत्रु उत्पन्न झाला आहे. दक्षिणेंतील हिंदु व मुसलमान या दोघांनींही एक झालें पाहिजे."

४ लागलीच बाजीराबानें चिमाजी आप्पास वसईचा वेढा सोडून येण्यास पत्र पाठविलें व निरनिराळ्या मराठे सरदारांस हिंदुस्थानचा शत्रु नादिरशहा याचा समाचार घेण्यासाठीं सैन्य घेऊन बोलाविलें. चिमाजी आप्पानें वसई घेऊन बाजीरावाकडे जाण्याचा विचार केला व वेढ्याचें काम जोरांत चालविलें. वसई सर झाल्याबरोबर त्यानें शिंदेहोळकरांस बाजीरावाकडे पाठविलें. पण यापूर्वींच नादिरशहा परत गेल्याची बातमी आली होती. जातांना त्यानें चौदा कोटी रुपयांची लूट व बादशहाचें रत्नजडित मयूरसिंहासनही बरोबर नेलें.

५ पुढें लवकरच बाजीराव उत्तर हिंदुस्थानांत स्वारी करण्याकरितां जात होता. वाटेंत नर्मदातीरीं तो मृत्यू पावला ( १७४० ). बाजीराव अत्यंत शूर व महत्त्वाकांक्षी होता. " मूळच उपटलें कीं, खांद्या आपोआप खालीं येतील" हा त्याच्या कार्याचा बीजमंत्र होता. त्याचा सर्व जन्म स्वाऱ्यांत गेला. प्रतिनिधि व दाभाडे हे घरचे प्रतिपक्षी आणि निजाम व उत्तरेकडील सरदार हे उघड शत्रु यांशीं तो सारखा झगडला व त्यानें त्या सर्वांवर चांगलाच वचक बसविला. परंतु त्याचें कार्य पूर्ण होण्यापूर्वींच तो वारला व त्याच्या पुत्रावर कार्याचा प्रचंड भार एकदम येऊन पडला ! !

---

## ३३ माळव्याची सनद १७४३.

१ बाजीरावास तिघे मुलगे होते. पहिला बाळाजी, दुसरा रघुनाथ व तिसरा जनार्दन. थोरला बाळाजी एकवीस वर्षांचा असून मोहिमांवर जाऊं लागला होता, व त्याचें कर्तृत्व व हुशारी स्पष्ट दिसूं

लागली होती. नागपूरकर रघूजी भोसले हा वऱ्हाड प्रांताचा सरदार मोठा शूर व महत्त्वाकांक्षी होता. बाळाजीस पेशवाई मिळाल्यास आपणास त्याच्या तंत्रानें वागावें लागेल असें रघूजीनें पाहिलें. तेव्हां बाळाजीस पेशवाई मिळूं देऊं नये व आपल्या मुठींतील एकाद्या क्षुल्लक मनुष्यास पेशवा करावा असा त्यानें बेत केला.

२ बाबूजी नाईक बारामतीकर हा एक श्रीमान् सावकार होता. त्याच्यापासून पेशव्यांनींही बरेंच कर्ज काढलें होतें. सातान्यास जाऊन बाबूजीस पेशवाई देण्याची रघूजीनें खटपट चालविली, रघूजीनें नाइकाकडून फार मोठा नजराणा देववितों म्हणून बोलणें लाविलें; पण शाहू त्याच्या म्हणण्यास कबूल झाला नाहीं. बाजीरावाचा पराक्रम, स्वामिनिष्ठा व आपण त्यास दिलेलीं वचनें तो विसरला नव्हता. बाजीरावाच्या मृत्यूनंतर दोन महिन्यांनीं शाहूनें बाळाजीस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं.

३ सूड घेण्याच्या बुद्धीनें बाबूजी नाइकानें 'आमचे पैसे परत द्या' असें बाळाजीच्या मागें टुमणें लाविलें. बाळाजी अगदीं पेंचांत आला, पण त्याचा कारभारी महादोजीपंत पुरंदरे यानें कर्जाची हमी घेतली, व अगदीं पहिल्या संकटांतून बाळाजीस सोडविलें. हे त्याचे उपकार बाळाजी जन्मभर विसरला नाहीं.

४ निजामुल्मुल्कानें भोपाळच्या लढाईनंतर तह केला होता, त्यांत माळव्याची सनद मिळवून देण्याचें कबूल केलें होतें. परंतु पुढील गडबडीमुळें पेशव्यांस माळव्याची सनद मिळाली नाहीं. नंतर बाळाजी व चिमाजीआप्पा या दोघांनीं दिल्लीच्या बादशहास एक पत्र पाठविलें. त्यांत त्यांनीं पुढील मजकूर लिहिला. "सनद मिळाल्यास आम्ही दोघेही तुम्हांस योग्य मान देऊं. मराठे सरदारांपासून प्रांतास त्रास होऊं देणार नाहीं व बादशहाच्या सेवेस पांचशें घोडा लावून देऊं. बंडखोर जमीनदारांचें पारिपत्य करण्यास चार हजार सैन्य माळव्यांत सतत

ठेवूं व अगोदरपासून चालत आलेल्या देणग्या परत घेणार नाहीं, ” बादशहाकडून या पत्राचें कांहींच उत्तर आलें नाहीं व माळव्याच्या सनदेचें प्रकरण तसेंच भिजत पडलें. यानंतर लवकरच चिमाजीआप्पा वारला. त्याला सदाशिवरावभाऊ म्हणून एक अकरा वर्षांचा मुलगा होता.

५ दोन वर्षांनीं १७४३ त माळव्याच्या सनदेच्या प्रकरणाचा निकाल लागण्याचा योग आला. दिल्लीच्या बादशहाच्या साम्राज्यांत पूर्वेकडे बंगालचा सुभा असे. बंगालच्या सुभेदाराच्या ताब्यांत बहार प्रांतही मोडत होता. रघूजी भोसले बहारप्रांतावर स्वाऱ्या करूं लागला. तेव्हां बंगालच्या सुभेदारानें बादशहास मदत करण्याविषयीं विनंति केली. दिल्लीच्या बादशहानें हें काम बाळाजीस सांगितलें व सुभेदाराचें रक्षण केल्यास ‘ माळव्याची सनद ’ देण्याचें वचन दिलें. बाळाजी मोठ्या झपाट्यानें बहारकडे चालून गेला. पेशवे आपल्यावर चालून आले असें पाहतांच बचावासाठीं रघूजी डोंगरांत पळूं लागला. पण बाळाजीनें स्वतः आडवाटेनें शिरून रघूजीस गांठलें व एक दोन लढायांत त्याचा अगदीं मोड करून टाकला. तेव्हां रघूजी नागपुरास पळून गेला.

६ बाळाजीनें बादशहाचें काम यथास्थित बजावलें तेव्हां सनद देणें महमदशहास भाग पडलें. बादशाहीचा डौल राखण्यासाठीं एक पोकळ युक्ति जयसिंग व निजामुल्मुल्क यांनीं बादशाहास सुचविली. बादशहाचा मुलगा अहमद याचे कारभारी म्हणून पेशव्यास माळव्याची सनद देण्यांत आली.

---

## ३४ आधीं एकी, मग मुलूखगिरी.

१ बाळाजी सनद मिळविल्यावर आपल्या मुलुखाचा हिशेब दाखविण्याकरितां साताऱ्यास शाहूकडे गेला. रघूजी मोठा धोरणी होता.

आपला पराभव झाल्यावर त्यानें पेशव्यांकडे एक वकील पाठीवला व 'तुम्हीं जी वागणूक केली ती मराठ्यांच्या राज्यप्रसारास अत्यंत उपयोगी आहे' असा निरोप त्याजबरोबर कळविला. निरोप ऐकून बाळाजीस समाधान झालें.

२ इतक्यांत रघूजी मोठी फौज घेऊन साताऱ्याकडे चाल करून येत आहे असें बाळाजीस कळलें. दमाजी गायकवाडही सैन्यासकट साताऱ्यास येत आहे असेंही समजलें. श्रीपतराव प्रतिनिधि आजारीच असे. पण त्याचा मुलगा जगजीवनराव मोठा कर्तबगार व हुशार असून दमाजी गायकवाडाच्या पक्षाचा होता. हे सर्व साताऱ्यास जुळले म्हणजे आपणाविरुद्ध एक मोठा तट होईल व राज्यांत घोटाळा उडेल अशी बाळाजीस भीति पडली.

३ हा कट फोडण्यास बाळाजीनें एक युक्ति काढली. रघूजीस त्यानें कटाबाहेर काढलें. शाहूनें उत्तरेकडील सर्व मुलुखांत खंडणी वसूल करण्याचा हक्क बाळाजीस देऊन टाकला होता. बाळाजीनें त्यापैकीं लखनौ, पाटणा, दक्षिण बंगाल व बहार या प्रांतांची खंडणी वसूल करण्याचा हक्क शाहूकडून रघूजीस देवविला. शिवाय कटक प्रांतापर्यंत खंडणीचा हक्क रघूजीस मिळाला. याच वेळेस शाहूनें बाळाजीस एक सनद करून दिली तींत कोंकण व माळवा प्रांतांचा अम्मल बाळाजीस सांगितला. शिवाय आलाहाबाद, आग्रा व अजमीर येथील खंडणीची वांटणी बाळाजीस मिळाली. येणेंप्रमाणें मुलूख देऊन बाळाजीनें रघूजीस खूष केलें. मराठ्यांचा परस्परांतील कलह थांबल्यामुळें बाहेरच्या मुलुखांत मराठ्यांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या.

४ मग रघूजीनें बंगालवर स्वारी केली; बाळाजीनें माळव्यांत जाऊन खंडणी वसूल केली व लवकरच तो दक्षिणेंत परत आला. बाबूजी नाइकानें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील दुआब शाहूपासून सात लक्षांच्या

मक्त्यानें घेतला होता. नाइकास प्रांतांतून वसूल करतां येईना. तेव्हां बाळाजीनें कर्नाटकाचा वसूल आणण्याकरितां चिमाजीआप्पाचा मुलगा सदाशिवरावभाऊ यास पाठविलें. या स्वारींत भाऊबरोबर सखारामबापू बोकील या धोरणी मुत्सद्यास पाठविलें होतें. भाऊनें या स्वारींत तुंगभद्रे-पर्यंत खंडणी वसूल केली व बहादूरभेंडा हा किल्ला हस्तगत केला. मग सावनूरच्या नबाबाची भेट घेऊन त्याचेपासून पंचवीस लक्षांचा मुलूख मिळवून भाऊ परत आला ( १७४७ ).

५ बहादूरभेंड्याच्या स्वारीहून परत आल्यावर शाहूनें भाऊस बाळाजी-चा मुख्य मदतगार नेमिलें. सदाशिवरावभाऊ मोठा हुशार होता. वासु-देव जोशी व रघुनाथ हरी असे दोन कारकून नेमून तो दप्तरचें काम पाहूं लागला. कांहीं दिवस शांतता होती; तितक्या अवकाशांत त्यानें देशांतील शेतीची सुधारणा केली. त्यामुळें जिकडे तिकडे सुबत्ता दिसू लागली.

---

## ३५ शाहूचा मृत्यू १७४९

१ शाहू आपल्या वयाच्या दहाव्या वर्षापासून पंचविसाव्या वर्षापर्यंत नजरकैदेंत होता. त्यामुळें ऐषआरामांत दिवस काढण्याची त्यास संवय लागली. कैदेंतून सुटल्यावर चार पांच वर्षें तो लढाईवर गेला. यापुढें पंतप्रधानांवर युद्धाचीं कामें सोंपवून शाहू सुखानें राहूं लागला. तो प्रत्यक्ष राज्यव्यवहारांत पडत नव्हता, तरी सर्व मराठे सरदारांत एकी होण्यास त्याचा वारंवार उपयोग होई. कारण साताऱ्च्या गादीबद्दल सर्व मरा-ठ्यांस सारखाच आदर वाटे.

२ शाहूच्या वेळेस मराठी राज्याचा अम्मल करण्याचें जोखमीचें काम पेशव्यांवर पडलें. दाभाडे, रघूजी भोंसले, दमाजी गायकवाड, बाबूजी नाईक, प्रतिनिधि इत्यादि मराठे सरदारांस पेशव्यांचा अम्मल सहन होत नसे व म्हणून ते दंगे करीत. परंतु राज्याचा विस्तार करण्यास पेशवे

लायक आहेत असा शाहूचा भरंवसा होता. त्यानें दंगेखोर सरदारांची समजूत करून पेशव्यांस राज्यविस्ताराच्या कामांत मदत केली.

३ शाहूस दोन बायका होत्या. वडील सकवारबाई व धाकटी सगुणाबाई. सकवारबाई हेकेखोर होती. सगुणाबाई शाहूची लाडकी होती. पुढें सगुणाबाईस क्षय होऊन त्यांत तिचा अंत झाला. तेव्हां शाहू अगदीं उदासीन झाला. त्यानें सातान्यास राहणें सोडून दिलें. सातारा व माहुली यांच्यामध्यें एक वाडी आहे तेथें तो राहूं लागला. त्यावरून त्या वाडीस 'वनवासवाडी' असें नांव पडलें. दोन्ही बायकांपासून शाहूस मुळींच संतान झालें नाहीं.

४ मालोजीचा भाऊ विठोजी यांचे वंशज भोसले होते. त्यांपैकीं एखाद्या मुलास दत्तक घेण्याचें शाहूच्या मनांत होतें. इतक्यांत ताराबाई सातारच्या किल्ल्यांत बंदींत होती तिनें सांगून पाठविलें कीं, "दुसरा मुलगा कां पहतां? माझा मुलगा शिवाजी याचा मुलगा रामराजा मीं गुप्तरूपें ठेविला आहे. तो असतांना दत्तक कशाला?" चौकशीअंतीं रामराजा खरा ठरला. मग शाहूनें त्यासच आपल्यामागून गादीवर बसविण्याचा विचार ठरविला.

५ हें पाहून शाहूची बायको सकवारबाई हीस फार राग आला, तिनें निराळाच एक मुलगा दत्तक घेण्याचें ठरविलें. तिनें जगजीवनराव प्रतिनिधि व त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव या दोघांस अनुकूल करून घेतलें. कोल्हापूरच्या संभाजीसही तिनें वश करून घेतलें. शाहूची प्रकृति जास्त बिघडूं लागली. सकवारबाईनें एकदां बाळाजी शाहूच्या भेटीस आला असतां त्याजवर मारेकरी घातले पण बाळाजी अत्यंत सावधगिरीनें वागत असल्यामुळें तिचा बेत फसला.

६ शाहूचें दुखणें जास्त वाढलें. तेव्हां राज्याची आपल्या पाठीमागें व्यवस्था लावण्यास बाळाजीशिवाय दुसरा कोणी समर्थ नाहीं, असें पाहून

त्यानें बाळाजीस एक यादी करून दिली. "कोल्हापूरचें राज्य एक करूं नये. माझ्या पाठीमागें रामराजास दत्तक घेऊन राज्य चालवावें. सर्वांचें आहे तसेंच चालवून राज्याचें संरक्षण करावें" हाच तिचा तात्पर्यार्थ होता.

७ बाळाजीनें साताऱ्याच्या किल्ल्यावर आपले लोक पाठवून किल्ला आपल्या हातांत आणण्याची सिद्धता करून ठेविली. पुढें थोडयाच दिवसांत शाहू मृत्यु पावला (१७४९). सर्व सरदारांस दुःख झालें. बाळाजीस तर अत्यंत वाईट वाटलें. पण सकवारबाईच्या पक्षांतील मंडळी दगा करतील अशी भीति असल्यामुळें त्यांचा तावडतोब बंदोबस्त करण्याचा पेशव्यानें निश्चय केला; शहरांत फौज पाठवून तेथें नाकेबंदी केली. यमाजी शिवदेव व जगजिवनराव प्रतिनिधी यांस कैद केले.

८ प्रधानपंतांची सरशी झाली, आतां जीव ठेवण्यांत अर्थ नाहीं. असा विचार करून सकवारबाईनें सती जाण्याचें ठरविलें. संगम माहुलीस जेथें सकवारबाई सती गेली, तेथें शाहूचें पाषाणाचें लिंग व सकवारबाईची मूर्ति स्थापन करण्यांत आलीं. तीं अजून तेथें आहेत.

## ३६ राज्यव्यवस्था १७५०.

शाहूच्या मृत्यूनंतर थोडया दिवसांनीं रामराजाला साताऱ्यास आणलें. इतक्यांत रघूजी भोंसले साताऱ्यास येऊन पोहोंचला. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, ताराबाईनें रामराजाबरोबर एका ताटांत जेवण करावें. रामराजाबरोबर ती एका ताटांत जेवली, व रघूजी भोंसले आदिकरून मराठे सरदारांची रामराजाच्या खरेपणाविषयीं खात्री झाली. मग १७५० च्या आरंभीं रामराजास राज्याभिषेक झाला.

१ ताराबाई सत्तर वर्षांची झाली होती तरी तिची अधिकार गाजविण्याची हौस मुळींच कमी झाली नव्हती. पेशव्याचा अधिकार स्थिर होण्याच्या अगोदर जुन्या मराठे सरदारांस अनुकूल करून घेऊन पेश-

व्याचा नक्षा उतरविण्याचा तिनें बेत केला. सचिवाचें मन वळविण्याकरितां ती सिंहगडास गेली. बाळाजीनें चिमणाजी नारायण सचीव यास कैद केलें; ताराबाईची समजूत करून तीस पुण्यास आणलें. रामराजाही पुण्यास आला.

३ ह्या दोघांच्या संमतीनें बाळाजीनें पुढीलप्रमाणें राज्याची व्यवस्था लाविली. वऱ्हाड, गोंडवण व बंगालच्या नव्या सनदा रघुजीस करून दिल्या. अर्ध्या गुजराथेच्या सनदा यशवंतराव दाभाड्यास पाठविल्या. या सुमारास राणोजी शिंदे वारला. त्याला जयाजी व दत्ताजी असे दोघे मुलगे होते. त्याच्या जहागिरीवर थोरला मुलगा जयाप्पा याची नेमणूक झाली. अष्ट प्रधानांचीं कामें पूर्वीप्रमाणें राहिलीं नव्हतीं तरी त्यांचीं इनामें कायम झालीं. जगजीवन परशुराम प्रतिनिधी व यमाजी शिवदेव या दोघांस पेशव्यांनीं बंधमुक्त केलें, व फत्तेसिंग भोंसल्यास त्याच्या जहागिरीवर कायम केलें.

४नंतर रामराजानें 'पेशव्यांनीच सर्व राज्याचा कारभार व्हावा आपण राजकारणांत पडणार नाहीं, सातारजवळ कांहीं मुलूख आपल्या खाजगी खर्चाकरितां पेशव्यांनीं द्यावा, अशी एक याद लिहून दिली. त्यावरून यापुढें सर्व कारभार पुण्यासच चालूं लागला. मग ताराबाई व रामराजे यांचा आदर करून बंदोबस्तास बरोबर नाना पुरंदरे यास फौजेनिशीं देऊन साताऱ्यास त्यांची रवानगी झाली. ताराबाईच्या प्रसन्नतेसाठीं पेशव्यांनीं साताऱ्च्या गडावर आपले लोक ठेवले होते ते काढून फिरून पूर्वीचे गडकरी नेमले. परंतु ताराबाई मोठी महत्त्वाकांक्षी. तिनें दमाजी गायकवाड व निजाम यांच्याशीं कारस्थानें चालविलीं, व खुद्द रामराजा पेशव्यांच्या तंत्रानें चालतो म्हणून त्यास साताऱ्च्या किल्ल्यावर कैदेंत ठेविलें! पण बाळाजी सावध असल्यामुळें तिचे प्रयत्न फसले. शेवटीं

बाळाजीनें दहा हजार फौज चंदनवंदननजीक ठेवून दिली; तेव्हां ताराबाईस स्वस्थ बसणें भाग पडलें.

५ चिमाजीआप्पा जसा बाजीरावाचा सर्व कारभार करीत, तसा मला तुमचा करूं द्या, असें बाळाजीपाशीं सदाशिवरावभाऊनें याच सुमारास मागणें घातलें. महादोबा पुरंदरे हा बाळाजीचा कारभारी होता, व त्याचे बाळाजीवर फार उपकार झाले होते. तेव्हां भाऊस कारभारी नेमून महादोबाचें मन दुखविणें बाळाजीस पसंत पडलें नाहीं. म्हणून त्यानें भाऊचें मागणें नाकबूल केलें. इतक्यांत ' पेशवाई, पांच हजारांचा सरंजाम व तीन किल्ले देतों ' असें कोल्हापूरच्या राजाकडून भाऊस पत्र आलें, व भाऊ कोल्हापुरास जाण्यास तयार झाला. पण या वेळीं महादोबा पुरंदऱ्यानें स्वार्थत्याग करून ' मी कारभारीपद सोडण्यास तयार आहें,' असें बाळाजीस सांगितलें. तेव्हां कारभाऱ्याचें काम भाऊस मिळालें व पेशव्यांच्या घराण्यांतील दुही नाहींशी झाली.

---

## ३७ शाबास ! शिंदेहोळकर, शाबास ! ! १७५०-५१

१ ताराबाई व निजाम या दोघांचीं कारस्थानें हाणून पाडण्यांत बाळाजी गुंतला होता; त्याच वेळीं मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांनीं दिल्लीच्या बादशहाच्या वजिरास साहाय्य करून मराठ्यांचें नांव सर्व हिंदुस्थानभर दुमदुमावयास लाविलें. त्याविषयींची माहिती या प्रकरणांत द्यावयाची आहे.

२ सन १७४८ त दिल्लीचा बादशहा महंमदशहा वारला. त्याच्या मागून त्याचा मुलगा अहंमदशहा गादीवर बसला. त्यानें अयोध्या प्रांताचा सुभेदार सफदरजंग ह्यास वजीर नेमलें. अयोध्या प्रांताच्या पश्चिमेकडे गंगेच्या उत्तरेस रोहिले लोकांचा मुलूख होता. त्याचप्रमाणें गंगा यमुना या नद्यांच्या मधील प्रदेशांत—त्यास अंतर्वेद किंवा दुआब म्ह_

णतात—पठाण लोकांचा अम्मल असे. सफदरजंगास वजिरी मिळतांच त्यानें पठाण व रोहिले या दोघांचाही नाश करण्याचा निश्चय केला. त्यानें दुआबामधील पठाणांचा सर्व प्रांत खालसा केला; व तेथील अंमल आपला दिवाण नवलराय यास सांगून तो दिल्लीस निघून गेला.

३ परंतु या व्यवस्थेनें त्या प्रांतांत स्वस्थता झाली नाहीं. एके दिवशीं नवलरायाच्या लोकांनीं एका पठाण स्त्रीचा अपमान केला. तेव्हां ती पठाणांचा मुख्य अहमदखान बंगष याजकडे जाऊन म्हणाली, " तुझ्या समक्ष एका पठाण स्त्रीचा काफिरांनीं अपमान केला तरी तुला राग येत नाहीं ना! तुझ्या बापास अल्लानें मुलगी दिली असती तर फार बरें असतें ! ! " हें भाषण ऐकून अहमदखानाचा स्वाभिमान जागृत झाला. त्यानें दुआबांतील राजधानीचें शहर फरुकाबाद फिरून सर केलें, व राजा नवलराय याशीं युद्ध करून त्याला ठार केलें. मग रोहिले व अहमदखान पठाण यांनीं एक होऊन अयोध्या प्रांतावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. तेव्हां वजीर अगदीं घाबरून गेला. अशा संकटसमयीं मराठ्यांची मदत मागण्याची बुद्धि त्यास सुचली, त्यामुळें त्याचा बचाव

४ या वेळीं मराठे सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे हे जयपुराजवळ होते. त्यांची वजिरानें भेट घेतली. कादरगंजाजवळ दहा हजार फौजेसह एक पठाण सरदार होता. यमुना उतरून मराठ्यांनीं त्याचा तेव्हांच नाश केला. इतक्यांत अहमदखान पठाण प्रयाग प्रांतीं आश्रय करून होता, तो फरुकाबादेस आला. तेव्हां मराठ्यांनीं लागलीच त्या शहरास वेढा घातला. एकसारखें पंचवीस दिवस युद्ध झालें; परंतु पठाणांस गंगेच्या पलीकडून रोहिले मदत करीत होते, त्यामुळें पठाणांचा पाडाव होईना. मग मराठ्यांची फौज गंगापार झाली व तिकडे रोहिले व पठाण मिळून तीस हजार फौज होती तिला गांठून मराठ्यांनीं तिचा फन्ना उडविला. त्याच दिवशीं रात्रीं अहमदखान पठाण फरुकाबादें-

तून निसटून पळून जाऊं लागला, पण मराठ्यांनीं त्याचे हत्ती, घोडे, उंट, निशाणें सर्व लुटून आणलीं. अशा रीतीनें सफदरजंगाच्या शत्रूंचा नाश करून मराठ्यांनीं सफदरजंगावार उपकार केले. त्याबद्दल पेशव्यांच्या नांवानें बादशहाकडून शिंदेहोळकरांनीं एक सनद करून घेतली. तींत मुलतान, पंजाब, राजपुताना व रोहिलखंड या सर्व मुलुखांत चौथाई वसूल करण्याचा हक्क बादशहानें मराठ्यांना दिला.

५ या युद्धांत शिंदे–होळकरांनीं जो पराक्रम केला त्याची बातमी जेव्हां बाळाजी बाजीरावास समजली, तेव्हां त्यानें एक पत्र पाठवून त्यांना शाबासकी दिली. त्या पत्रांत पुढील मजकूर आहे:—" शाबास तुमच्या हिमतीची ! व दिलेरी रुस्तुमीची ! व शाबास लोकांची ! आमच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुनागंगापार होऊन रोहिले पठाणांशीं युद्ध करून आपण फत्ते पावावे, हें कर्म लहान सामान्य न झालें. तुम्ही एकनिष्ठ सेवक या दौलतीचे स्तम्भ आहां ! ! या यशास जोडच नाहीं. इराणतुराणपावेतों लौकिक झाला कीं वजीर मोडला, पळाला असतां फिरून गादीवर बसविला. याहून यश कोणतें अधिक आहे ! "

---

## ३८ राघोबाची हिंदुस्थानांत पहिली भरारी.

१ १७५३ सालीं बाळाजीचा धाकटा भाऊ राघोबादादा गुजराथेंत गेला. गुजराथेचा बंदोबस्त करण्यासाठीं रावोबा तीन वर्षें सारखा जात होता. पण अजून त्या प्रांताचा बंदोबस्त झाला नव्हता. तेव्हां खुद्द अहमदाबाद आपल्या ताब्यांत घेण्याचा राघोबानें बेत केला. त्याच्याबरोबर सखाराम भगवंत बोकील—सवाई माधवरावाच्या वेळेचे प्रसिद्ध सखारामबापू—हा कारभारी होता. अहमदाबादेस वेढा घातल्यावर थोड्याच दिवसांत तें शहर मराठ्यांच्या हातीं आलें. या वेढ्यांत विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो

शंकर राजेबहाद्दर या दोघां मराठे सरदारांनी खूपच पराक्रम गाजविला. अहमदाबादचा बंदोबस्त करून मग रजपूत राजांपासून खंडणी घेत घेत राघोबा चंबळा नदी ओलांडून जाटांच्या मुलुखाजवळ आला.

२ निजामुल्मुल्काचा नातू मीर शहाबुद्दीन या नांवाचा होता. त्यानें आपल्यास गाजीउद्दीन असा किताब घेतला. व सफदरजंग वजिराविरुद्ध तो कारस्थानें करूं लागला. तेव्हां सफदरजंगानें सुराजलम जाट यास आपल्या मदतीस बोलाविलें. गाजीउद्दीनानें वजिराविरुद्ध आपल्या साहाय्यास मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे यास बोलाविलें होतें. इतक्यांत राघोबाही येऊन पोंचला. तेव्हां राघोबा, मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे या सर्वांनीं मिळून सुराजमल जाटाच्या कुंभेरी किल्ल्यास वेढा घातला.

३ वेढा चालू असतां मल्हारराव होळकराचा एकुलता एक मुलगा खंडेराव—प्रसिद्ध अहिल्याबाई होळकरणीचा नवरा—मोर्चांत निशाणापाशीं सहज गेला असतां बंदुकीची गोळी अकस्मात् लागून ठार झाला. मल्हाररावास मुलाच्या मरणामुळें अत्यंत दुःख झालें, त्यानें प्रतिज्ञा केली कीं, " सुराजमल जाटाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक. "

४ होळकराचा पण ऐकून सुराजमल जाट घाबरला व त्यानें जयाजी शिंद्यास शरण जाण्याचा निश्चय केला. त्यानें आपल्या दिवाणाचा मुलगा तेजराम याजबरोबर ' आजचे समयीं तुम्ही वडील बंधु व मी धाकटा बंधु आहें. कळेल त्या रीतीनें बचाव करावा ' असा निरोप पाठविला व आपली पगडी त्याच्याजवळ दिली. तेजरामानें जयाप्पाकडे येऊन आपल्या धन्याचा निरोप सांगितला; व बरोबर आणलेली पगडी जयाप्पाच्या डोक्यास घालून त्याची पगडी आपण घेतली. शिंदे मोठ्या विचारांत पडला. पण शेवटीं शरणागताचें रक्षण करणें

हेंच आपलें कर्तव्य ( ! ) असें ठरवून त्यानें जाटास अभयपत्र दिलें.

५ हें वर्तमान सुरजमल जाटास कळतांच त्याला पुनर्जन्म झाला असें वाटलें. शिंदे आंग चोरून काम करूं लागल्याबरोबर वेढ्याचें काम नीट होईना. शिवाय बाहेरून जाटास दाणा, दारूगोळा इत्यादि सामानाचा पुरवठा होऊं लागला. शेवटीं जयाप्पानें राघोबास सांगितलें कीं, ' सध्यां तह करून मोकळें व्हावें. एका ठिकाणीं एवढी मोठी फौज फार दिवस गुंतवून निभावयाचें नाहीं. ' या शिंद्याच्या वर्तनावरून मल्हाररावास मोठा राग आला व एव्हांपासून शिंदेहोळकरांमध्यें वितुष्ट आलें. त्यांच्यामध्यें यापुढें खरें सख्य असे केव्हांच झालें नाहीं. मग जयाजी शिंद्याच्या मध्यस्थीनें साठ लक्ष खंडणी ठरून तह झाला.

६ राघोबा पुढें आठ नऊ महिने दिल्लीकडेच होता. मराठ्यांचीं रोहिलखंडांत व अंतर्वेदींत जीं ठाणीं होतीं त्यांचा त्यानें बंदोबस्त केला. रोहिलखंडांत कुमाऊच्या पहाडापर्यंत एक स्वारी केली. गाजीउद्दीनास वजिरीवर कायम करून दिल्लीदरबारीं त्याचें वजन स्थिर केलें. इतकीं कामें करून राघोबा १७५५ च्या पावसाळ्याच्या आरंभीं पुण्यास परत आला.

---

## ३९ शिंद्यांचे मारवाडांतील पराक्रम.

१ राजपुतान्यांत जोधपुरचें एक संस्थान आहे. तेथील राजा अभयसिंह १७५४ त वारला. त्याच्या मागून त्याचा मुलगा रामसिंग हा राज्याचा वारस, पण तो जात्याच दुर्बळ असल्यामुळें जोधपूरची गादी त्याचा चुलत भाऊ बिजेसिंग यानें उपटली. मग रामसिंगास युक्ति सुचली कीं, शिंद्यांची मदत घ्यावी. जयाप्पा शिंद्यानेंही रामसिंगास साहाय्य करण्याचें मोठ्या हौसेनें कबूल केलें.

२ मग कुंभेरीचा वेढा संपवून जयाजी फौज घेऊन निघाला. त्याच्या बरोबर त्याचा भाऊ दत्ताजी व मुलगा जनकोजी होते. तिकडे

बिजेसिंगानें पन्नास हजार फौज जमविली व तो मेडतें या गांवीं तळ देऊन बसला. मग मेडतें गांवाजवळ मोठी लढाई झाली. रजपूत मोठ्या आवेशानें लढले: पण विजयश्रीनें शेवटीं मराठ्यांस माळ घातली. खुद्द बिजेसिंग एका खटाऱ्यांत बसून कसा तरी निसटून नागोरास गेला. जयाप्पानें बिजेसिंगास वठणीस आणण्याचा निश्चय केला, व वेळ न दवडतां नागोरास वेढा दिला. पण सात आठ महिने झाले तरी तें स्थळ हस्तगत होईना. तेव्हां सगळी फौज एके ठिकाणीं अडकवून ठेवणें बरें नाहीं असा विचार करून जयाप्पानें रामसिंगाबरोबर जनकोजीस मेडतें सर करण्यास पाठविलें.

३ हट्टास पडून फार नुकसानकारक लढाईत पडण्यांत अर्थ नाहीं अशीं बाळाजी बाजीरावाचीं शिंद्यास वारखीं पत्रें येत होतीं. शिवाय सफदरजंग वजिरास साहाय्य केल्यापासूनच त्याच्याकडून काशी व प्रयाग हीं दोन्ही क्षेत्रें सोडवून घेण्याविषयीं बाळाजीचा शिंद्यास आग्रह होता. आतां तरी सफदरजंगाचा मुलगा सुजाउद्दवला यास वजिरी देऊन क्षेत्रें सोडविण्याचें काम करून घ्यावें असें बाळाजीनें जयाप्पा शिंद्यास लिहिलें. रजपुतांचा रग जिरवून मग क्षेत्रें सोडविण्याचें त्याच्या मनांत होतें; पण तें साधलें नाहीं.

४ शिंद्यानें काम नेटानें चालविलें. त्यामुळें बिजेसिंग बराच जेरीस आला. त्यानें संरक्षणाकरितां इतर रजपूत संस्थानांची मदत मागितली. पण कोणीच साहाय्य करीना. तेव्हां त्यानें जयाप्पाचा नीचपणानें घात करण्याकरितां तीन मारेकरी पाठविले. एके दिवशीं जयाप्पा स्नान करून चौरंगावर तोंडावर रुमाल टाकून डोळे चोळीत होता. इतक्यांत ते तिघे मारेकरी धांवले, व एकदम दोघांनीं दोन सुरे जयाप्पाच्या कुशींत खुपसले. त्याबरोबर जयाप्पा धाडकन जमिनीवर पडला (१७५५).

५ इतक्यांत ती बातमी नागोर गांवांत गेली; तेव्हां बिजेसिंगास

नवीन दम चढला व तो फौजेसह मराठ्यांशीं युद्ध करण्यास निघाला. जयाजी शिंदे मोठ्या हिंमतीचा सरदार असून सावध होता, डोळे उघडून पाहिलें तों धाकटा बंधु दत्ताजी शोक करीत असलेला दिसला. तेव्हां त्यास धीर देऊन बोलला " वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस ! हें क्षात्रधर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं, तुम्ही शत्रूचा पराभव करावा. " या भाषणानें दत्ताजीस शत्रूची फार चीड आली व तो फौजेची व्यवस्था करून रजपुतांशीं सामना देण्यासाठीं गेला. निकराचें युद्ध झालें; त्यांत बिजेसिंग हटून गांवांत जाऊन बसला. थोड्याच दिवसांत जनकोजी मेडतें सर करून आला; मग दत्ताजी व जनकोजी या दोघांनीं नागोरच्या वेढ्याचें काम जोरांत चालविलें. अखेरीस तह झाला. त्यांत रामसिंगास नागोर, मेडतें वगैरे प्रांत मिळाळे, व मराठ्यांस लढाईचा खर्च, अजमीर शहर व जवळचा कांहीं मुलूख मिळाला.

६ याच सुमारास बुंदीचा राजा वारला. त्याचा मुलगा लहान होता, तेव्हां राज्यांत दंगे होऊं लागले; त्या लहान मुलाच्या आईनें दत्ताजीचें सहाय्य मागितलें. तेथें जाऊन बंडखोरांस कैद करून पाऊणकोट रुपये कामाबद्दल घेऊन दत्ताजी उज्जनीस आला. फौजेचा पगार चुकता करून दोघे चुलतेपुतणे मर्दुमकी गाजवून विजयध्वज फडकावीत श्रीगोंद्यास आले.

---

## ४० मराठी राज्याचा कर्नाटकांत विस्तार.

१ पेशव्यांची कर्नाटकावरील पहिली स्वारी बाजीरावाच्या हस्तें सन १७२६त झाली. पुढें उत्तर प्रांतांतील मोहिमा करण्यांतच त्याचा काळ गेला. १७४०त रघूजी भोसल्यानें पूर्व–कर्नाटकची एक स्वारी केली, त्यावर सदाशिवरावभाऊनें बहादुरभेंडा घेतला, ती एक स्वारी झाली. परंतु एकंदरीनें कर्नाटकाकडे मराठ्यांचें दुर्लक्षच झालें. निजामुल्मु-

ल्क हैद्राबादच्या गादीवर येऊन त्यानें मराठ्यांची सत्ता संपुष्टांत आणण्यास आरंभ केला. त्यावरून बाजीरावाचें लक्ष निजामाचा मोड करण्यांत गुंतलें. नंतर त्यानें माळवा हाताखालीं घालून दिल्लीपर्यंत स्वाऱ्या केल्या. बाळाजी बाजीरावाचीही निम्मी कारकीर्द उत्तरेकडचा बंदोबस्त करण्यांत व शाहूच्या मृत्यूमुळें उत्पन्न झालेला घोटाळा मोडण्यांत गेली. १७५३ पासून मात्र मराठ्यांची दरसाल कर्नाटकावर स्वारी होऊं लागली.

२ या वेळीं कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या मधील दुआबांत सावनूरच्या नबाबाचा अंमल फैलावला होता. तुंगभद्रेच्या खालीं कर्नूल व कडप्पा येथील नबाब व म्हैसूरचें राज्य हीं बळावलीं होतीं. गुत्तास संताजी घोरपड्याच्या वंशांतील मुराररराव घोरपडे याचा अंमल होता; पण तो मुख्य सत्तेशीं मिळून वागत नसे. शिवाय बिदनूर, सोंधें वगैरे तद्देशीय लोकांचीं संस्थानें होतीं.

३ सन १७५३ पासून श्रीरंगपट्टण, होळीहुन्नर व बिदनूर या ठिकाणांवर पेशव्यांनीं तीन वर्षें एकामागून एक स्वाऱ्या केल्या. १७५६ त सावनुरावर स्वारी केली. ही मोहीम मोठी जंगी होती यावेळीं सावनूरकर नबाबानें बराच मुलूख व अकरा लक्ष रुपये खंडणी मराठ्यांस दिली; शिवाय सोंधें व बिदनूर या संस्थानांपासून खंडणी घेण्याचा आपला हक्कही त्यानें मराठ्यांस देऊन टाकिला. दहा वर्षांपूर्वीं मराठी राज्याची दक्षिण हद्द कृष्णेवर होती, ती आतां तुंगभद्रेपर्यंत पोंचली.

४ सन १७५७च्या आरंभीं बाळाजी व सदाशिवराव साठ हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस निघाले. वाटेनें त्यांस मुराररराव घोरपडे मिळाला. त्यांनीं म्हैसूरच्या राजधानीचें शहर श्रीरंगपट्टण यास वेढा दिला. तेथील राजाचा दिवाण नंदराज यानें पुष्कळ दिवस मोठ्या नेटानें त्या स्थळाचें रक्षण केलें. परंतु त्याचें कांहीं न चालून तें मराठ्यांच्या हातीं पडण्याच्या बेतांत आलें.

५ इतक्यांत पुढील गोष्ट घडली. त्या शहरांत श्रीरंगाचें देवालय प्रसिद्ध आहे. एके दिवशीं त्याच्या शिखरास बाहेरील तोफेचा गोळा लागून शिखर मोडलें, व त्याच वेळीं बाहेरच्या तोफखान्यांतील एक तोफ फुटून कित्येक गोलंदाज ठार झाले. तेव्हां उभय पक्षीं हा अपशकून झाला असें ठरविण्यांत येऊन तहाचें बोलणें सुरू झालें. त्यांत ३२ लक्ष रुपये खंडणी घेऊन मराठ्यांनीं वेढा उठविण्याचें कबूल केलें. नंदराजानें पांचलक्ष रुपये रोख दिले व बाकीच्या रुपयांच्या फेडीबद्दल चौदा सुपीक महाल मराठ्यांकडे लावून दिले.

६ शिवाजीच्या ताब्यांत जे प्रांत होते त्यांस स्वराज्य म्हणत. या स्वराज्यांत तुंगभद्रेपर्यंतचा मुलूख येई. शिवाय तिच्या दक्षिणचे शिरें, बंगलूर, होस्कोटे, कोल्हार व बाळापूर हे पांच परगणे व पाइनघाटांतील बारामहाल, जिंजी, वेलोर इत्यादि प्रांत इतका मोठा कर्नाटकाचा भाग स्वराज्यांत येत होता. चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा बाळाजी विश्वनाथानें बादशहापासून मिळविल्या होत्या. पण 'स्वराज्या'ची सनद मिळाली तरी औरंगजेबानें जिंकून परत घेतलेला स्वराज्याचा सर्व मुलूख मराठ्यांच्या हातीं आला नाहीं. आतां बाळाजी बाजीरावानें कर्नाटकांतील पांच परगणे सोडविण्याचें ठरविलें. त्यानें शिरें काबीज केलें. इतक्यांत पावसाळा जवळ आल्यामुळें बाकीचे प्रांत जिंकण्याचें काम बळवंतराव गणपत मेहेंदळे या सरदारावर सोपवून बाळाजी पुण्यास परत आला. पुढील सालीं दंगा करणाऱ्या त्या प्रांतांतील संस्थानिकांस बळवंतरावानें चांगली जरब बसविली. पण लवकरच त्याला पेशव्यांच्या बोलावण्यावरून पुण्यास जावें लागलें व कर्नाटकांतील 'स्वराज्य' सोडविण्याचें काम अर्धवटच राहिलें.

## ४१ भगवा झेंडा अटकेवर फडकतो ! १७५८.

१ दिल्लीचा वजीर गाजीउद्दीन अहमदशहास आपल्या मनाप्रमाणें वागण्यास लावी. तेव्हां बादशहा गाजीउद्दीनाचा मोड करण्याच्या मसलती करूं लागला. तेव्हां गाजीउद्दीनानें त्या दुर्दैवी बादशहास ठार केलें, व अलमगीर हें नांव देऊन एक नवीनच बादशहा गादीवर बसविला. पुढें वजिरानें प्रसिद्धीस आणलेला नजीबखान रोहिला त्याच्याविरुद्ध कारस्थानें करूं लागला. त्यानें अफगाणचा बादशहा अहमदशहा अबदाली यास गाजीउद्दीनाचें पारिपत्य करण्याकरितां बोलाविलें. सन १७५६ चा पावसाळा संपतांच अबदाली हिंदुस्थानांत उतरला. त्यानें आल्याबरोबर लाहोर व मुलतान हे प्रांत हस्तगत केले, दिल्लीवर चाल करून बादशहा व गाजीउद्दीन या दोघांसही कैद केलें, व शहर लुटलें.

२ अबदाली हिंदुस्थानांत आला, ' ही बातमी ऐकतांच बाळाजी बाजीरावानें राघोबास त्याचें पारिपत्य करण्यासाठीं उत्तरेस पाठविलें. वाटेंत मल्हारराव होळकर त्याला मिळाला; पण इकडील उन्हाळा सैन्यास सहन न झाल्यामुळें अबदाली उन्हाळ्याच्या आरंभींच परतला. नवीन जिंकलेल्या लाहोर व मुलतान या प्रांतांवर आपला मुलगा तैमूरशहा यास नेमून तो अफगाणिस्थानांत परत गेला.

३ आतां राघोबास दिल्लीदरबारांत मराठ्यांचें वजन फिरून स्थापण्याचें तेवढें काम राहिलें. पहिल्यानें नजीबखानाची खोड मोडण्याचा राघोबाचा बेत होता. पण मल्हारराव होळकराची त्यास अंतःस्थ मदत असल्यामुळें तो बचला. राघोबानें पहिल्यानें दिल्ली दरबारीं गाजीउद्दीनाच्या मदतीनें बंदोबस्त केला. पुढें काशी, प्रयाग घेऊन बंगालवर चालून जाण्याचा त्याचा विचार होता. परंतु लाहोर व मुलतान हे परगणे अगोदर सोडविण्याचें ठरल्यामुळें तो लाहोरकडे चाल करून गेला. तो पोंचण्याच्या-

पूर्वींच तैमुरशहानें अफगाणिस्थानांत पळ काढला. म्हणून ते प्रांत घेण्यास मराठ्यांस कांहींच श्रम पडले नाहींत.

४ ही स्वारी म्हणजे मराठ्यांच्या राज्यवैभवाच्या मंदिराचा कळसच होय ? या वेळीं कृष्णाकांठचे घोडे हिंदुस्थानच्या वायव्य सीमेवरील अटक नदीचें पाणी प्याले व मराठ्यांचा भगवा झेंडा हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर फडकला ! या स्वारींत मराठी लष्कराची फारच चंगळ झाली. पेंढारी व लष्कर केवळ कुबेर बनले.

५ राघोबाच्या भोळेपणामुळें या स्वारींत पेशव्यास एक कोट रुपये कर्ज मात्र झालें. लाहोरची स्वारी होते तोंच पावसाळा जवळ येऊन ठेपला; त्यामुळें राघोबा पुण्यास परत येण्यास निघाला. परत जात असतां त्याला वाटेंत जनकोजी व दत्ताजी शिंदे भेटले. त्यांस राघोबानें सांगितलें कीं, " नजिबखान रोहिल्याचें पारिपत्य करा; त्यास जिवंत सोडूं नका. "

६ पुढें त्या दोघांस मल्हारराव होळकर भेटला. त्यानें राघोबाच्या उलट उपदेश केला. " अटकेपासून रामेश्वरापर्यंत एकछत्री राज्य झालें. एक नजीबखान मात्र खळी राहिला आहे. त्याचें पारिपत्य केल्यास पेशवे जासुदाच्या हातून अटकेपासून पैसे आणवितील. मग आपल्याला कोणी पुसणार नाहीं. यास्तव येवढा खळी रक्षून काय करणें तें करावें. " पूर्वीं शिवाजीच्या वेळीं ' मराठा तितुका मेळवावा ' असा दिव्य उपदेश श्री समर्थ रामदासस्वामी यांनीं केला; व त्याप्रमाणें वागून शिवाजीनें स्वराज्यस्थापना केली. पण आतां मल्हाररावानें ' मराठी राज्याचा शत्रु नजीबखान याचें केवळ स्वार्थ साधण्यासाठीं रक्षण करा, ' असा कानमंत्र शिंद्यांच्या कानांत सांगितला. दत्ताजीनें नजीबखानाचें रक्षण केलें. त्यामुळें दत्ताजी तर प्राणास मुकलाच. शिवाय पानिपतचा भयंकर प्रसंग मराठी राज्यावर कोसळला व हिंदुपदपातशाही स्थापण्यासाठीं मेहनत करणाऱ्या बाळाजीस " भाऊ भाऊ " करीत प्राण सोडावा लागला ! !

---

## ४२ अर्धी दक्षिण सर झाली! १७६०.

रावोबादादा अटकेवर मराठी अंमल बसवून आला. स्वतः बाळाजीनें श्रीरंगपट्टणावर चाल करून बराच कर्नाटक घेतला. महाराष्ट्रांत बाळाजी-चा वडील मुलगा विश्वासराव व शिंदे मंडळी यांनीं निजाम जेरीस आ-णला. असा या वेळीं मराठ्यांना चोहोंकडे जय येत होता. याच सुमारास बाळाजी व सदाशिवरावभाऊ यांच्या मनांत प्रचंड कल्पना घोळूं लागल्या. सर्व हिंदुस्थानभर एक दोन वर्षांत मराठी साम्राज्य पसरविण्याचा त्यांनीं बेत केला. उत्तर हिंदुस्थान सोडविण्याचें काम दत्ताजी, जनकोजी व रावोबा या तिघांवर सोंपवून दक्षिणचा बंदोबस्त करण्याचें काम बाळाजी, सदाशिवराव व विश्वासराव या तिघांनीं आपल्या अंगावर घेतलें. सन १७६०मध्यें सगळी दक्षिण मोकळी करण्याचा पेशव्याचा बेत होता. अगोदर निजामास चांगलाच चेपून मग श्रीरंगपट्टणाकडे वळून तें राज्य काबीज करावयाचें अशी ही योजना होती.

२ १७४८ सालीं हैद्राबादचा निजामुल्मुल्क वारला. पुढें गादीविषयीं तंटे सुरू झाले. शेवटीं त्याचा तिसरा मुलगा सलाबतजंग हा फ्रेंचांच्या मदतीनें गादीवर बसला. नंतर बाळाजीनें निजामास एकसारखें पेंचांत आणून त्याजपासून बराच मुलूख मिळविला. १७५९ त हैद्राबादेस सलाबतजंगाचा भाऊ निजामअल्ली दिवाण होता, व राज्याचा सर्व कारभार तोच पहात असे. त्यानें १७५७ त शिंदखेडची लढाई झाल्यावर मराठ्यांस दहा लाखांचा मुलूख व नगर आणि परिंडा हे दोन किल्ले देण्याचा करार केला होता; पण तो आतां मुलूख व किल्ले देईना. तेव्हां मराठ्यांस लढाई करणें भाग पडलें. बाळाजीनें यावेळीं निजा-माचा चांगलाच समाचार घेण्याचा निश्चय केला. सदाशिवरावभाऊ स्वारीवर निघण्याच्या तयारींत होता. इतक्यांत अहमदनगरचा किल्ले-दार कविजग याशीं भेद करून विसाजी कृष्ण बिनिवाल्यानें तो किल्ला

घेतल्याची बातमी आली. यामुळें मराठ्यांच्या बाजूस जास्त उत्तेजन आलें. मग बाळाजी नगराकडे गेला व भाऊ राक्षसभुवनाकडे गेला. निजामअल्ली आतां ती जहागीर व किल्ले देण्यास तयार झाला, पण आतां त्याचें म्हणणें पेशवे बरे ऐकतील ?

३ निजामाचें बरेंच सैन्य धारुरास जाऊन बसलें व स्वत: सलाबतजंग व निजामअल्ली हे तोफखाना व सात आठ हजार सैन्यासह उदगिरावर राहिले, तेथें त्यांच्या व मराठी सैन्याच्या चकमकी चालल्या होत्या. मग ते दोघे भाऊ आपल्या धारूर येथील सैन्यास मिळण्याकरितां चालले. मराठ्यांकडील इभ्राइमखान गारदीच्या तोफखान्याचा त्यांच्या सैन्यावर फार मारा होऊं लागला. निजामाचें सैन्य अगदीं त्रासून गेलें. मग मरूं कीं मारूं अशा निराशेमुळें उत्पन्न झालेल्या धैर्यानें त्यांनीं इभ्राइमखानाच्या पलटणावर मोठ्या जोराचा हल्ला केला. त्यामुळें इभ्राइमखानाच्या लोकांत बरीच चलबिचल झाली. इतक्यांत मराठे घोडेस्वारांनीं निजामाच्या उजव्या बाजूवर चाल करून तीन हजार माणूस लोळविलें. निजामअल्ली अतिशय घाबरून गेला. त्यानें भाऊकडे आपले शिक्के पाठवून देऊन ' तुमच्या मर्जीस येतील त्या शर्तीवर तह करा, ' असें बोलणें लाविलें. मग उभयपक्षीं तह ठरला. त्यांत अशिरगड, बऱ्हाणपूर, दौलताबाद, सोल्हेर, मुल्हेर, व नगर असे सहा किल्ले मराठ्यांस मिळाले व साठ लक्षांचा मुलूख मराठ्यांच्या हस्तगत झाला.

४ नंतर भाऊ श्रीरंगपट्टण घेऊन सारी दक्षिण मोकळी करणार होता, परंतु अबदालीनें शिंद्याचा पराभव केल्यामुळें शिंद्यास मदत करणें पेशव्यांस भाग पडलें व दक्षिण सोडविण्याचा बेत तूर्त बाजूस ठेवावा लागला. भाऊ गोविंदपंत बुंदेल्यास लिहितो "या झुंजानें मोगलांत बाकी न राहतां साठ लक्षांची जहागीर व सदर्हूप्रमाणें स्थळें घेतलीं. याउपरी इकडील गुंता उरकला. इकडे मुलूख स्थळें चांगलीं मिळालीं; पण खर्च झाला. कर्नाट-

कची स्वारी न झाली. तिकडेही अबदालीचा पेंच; तिकडील पेंचामुळें इकडे आटोपावें लागलें. नाहीं तर सारी दक्षिण मोकळी होती. "

## ४३ पानिपतचा घनघोर संग्राम !! १७६१

१ दत्ताजी शिंद्यानें मल्हारराव होळकराच्या उपदेशाप्रमाणें नजीबखानाचा बचाव करण्याचें ठरविलें व त्याच्या मदतीनें बंगालवर स्वारी करण्याची तयारी चालविली; पण नजीबखान अत्यंत नीच होता. त्यानें दत्ताजीशीं गोड बोलून आंतून अहमदशहा अबदालीशीं गुप्तपणें कारस्थानें चालविलीं. लवकरच अबदाली हिंदुस्थानवर चाल करून आला. त्यानें लाहोर व मुलतान हे प्रांत घेतले व तो पुढें चालून आला. तेव्हां दत्ताजीस त्याच्याशीं लढाईस सज्ज होणें भाग झालें. दिल्लीजवळ बदाऊंच्या वाटावर युद्ध झालें; त्यांत दत्ताजी पडला, व जनकोजी जखमी झाला ( १७६० ).

२ त्यावेळीं निजामचा उदगीर येथें पराभव झाला असून पेशव्यांचे सर्व दक्षिण मोकळी करण्याचे बेत चालले होते. इतक्यांत शिंद्याच्या वरील पराभवाची बातमी पेशव्यास समजली. तेव्हां अबदालीचा समाचार घेण्याकरितां व सरदारांची अब्रू रक्षण करण्याकरितां सदाशिवरावभाऊच्या हाताखालीं जंगी फौज पाठविण्याचें ठरलें. भाऊबरोबर विश्वासरावही निघाला.

३ भाऊनें आरंभीं गोविंदपंत बुंदेले यास अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यास आपले बाजूकडे वळविण्याची कामगिरी सांगितली. पण ती त्याच्या हातून झाली नाहीं. नजीबखान सुजास भेटला व त्यानें त्याचें मन वळविलें. नंतर आग्र्यास पोंचल्यावर तेथेंच यमुना उतरून सुजाउद्दवला व अबदाली यांच्यामध्यें जावयाचें व ते एक होण्यापूर्वी त्यांचा निरनिराळा पराभव करावयाचा असाही भाऊनें बेत केला; परंतु गोविंद-

पंतानें आग्रयास नावा न जमविल्यामुळें तोही बेत फसला, मग भाऊनें मथुरा, दिल्ली, कुंजपुरा हीं यमुनेच्या दक्षिणेकडचीं ठाणीं घेऊन उत्तरेकडून दुआबांत उतरावयाचें व तेथें अबदालीस बुडवावयाचें असें ठरविलें.

४ पहिल्यानें भाऊनें दिल्ली घेतली. तें बादशाहीचें मुख्य ठिकाण अबदालीच्या लोकांपासून हिसकून घेतल्यावर मराठ्यांचा चोहोंकडे वचक बसला. मग उत्तरेकडे कूच करून भाऊनें कुंजपुरा सर केला; नंतर तो यमुना उतरून दुआबांत शिरणार होता; तोंच अबदाली यमुना उतरून अलीकडे आल्याची बातमी आली. तेव्हां यमुना उतरण्याचा बेत रहित करून भाऊनें पानिपतजवळ तळ दिला. आतां दुआबांतून अबदालीस धान्य न पोंचूं देणें अवश्य होतें. पण तशी व्यवस्था झाली नाहीं. दिल्लीहून पानिपतास राहिलेल्या मराठी सैन्यास येणारी धान्यसामुग्री मात्र अबदालीचे लोक मारूं लागले, व लवकरच पानिपतच्या मराठी सैन्याची उपासमार होऊं लागली. शेवटीं सर्व सरदार भाऊकडे येऊन म्हणाले, " भाऊसाहेब, आह्मांस रणांत मारावें; पण अन्नाशिवाय मारूं नये. " तेव्हां भाऊनें कोंडी फोडून दिल्लीकडे जाण्याचा निश्चय केला.

५ दुसऱ्या दिवशीं पहाटे मराठी फौज व्यवस्थेनें उभी राहिली. मध्यावर खासे भाऊ व विश्वासराव हुजरातीसह होते. उजवीकडे जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर आपल्या सेनेसह सज्ज होते. डावीकडे दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव विंचूरकर व समशेरबहाद्दर हे सरदार होते. सर्व सैन्यापुढें तोफखाना असून त्यावर इभ्राहिमखान गारदी होता. पाठीमागें बुणगें असून त्यामागें कांहीं किरकोळ पथकें होतीं. अशा तयारीनें मराठी फौज तळावरून निघाली. मराठे निघाले ही बातमी कळतांच अबदालीनें आपलें सैन्य युद्धास तयार केलें. सर्व सैन्यापुढें त्याचा तोफखाना होता. खासा अबदाली मागेंच राहिला होता.

६ मराठी फौज तळावरून निघाल्यावर थोड्याच वेळानें लढाईस

सुरुवात झाली. मोठें तुंबळ युद्ध सुरू झालें. मराठ्यांस जय येत चालला व गिलच्यांच्या फौजेंत पळ सुरू झाला. हें पाहून अबदालीनें आपल्या-जवळ शिल्लक ठेवलेली चार हजार फौज पळणाऱ्या लोकांवर पाठवून त्या सर्वांस परत लढाईस नेलें.

७ सुमारें दोन वाजले होते. मराठे अगदीं निकरानें लढत होते. इत-क्यांत दुर्दैवानें विश्वासरावास एक बंदुकीची गोळी अचानक येऊन लाग-ली. याच वेळीं डाव्या बाजूस विठ्ठल शिवदेवाच्या लष्करांतील हजार पठाणांनीं आपल्या डोक्यांवरील भगवीं फडकीं काढून टाकिलीं; त्याबरो-वर मराठ्यांच्या फौजेंतील बुणगें पळूं लागलें. इतक्यांत भाऊनें आपला हत्ती विश्वासरावाजवळ नेला. त्याची स्थिति पाहून भाऊच्या मनास धक्का बसला. पण भयंकर जखम झाली होती तरी विश्वासरावानें "तुम्ही चला, लढाई बिघडेल" असें भाऊस सांगितलें. हत्ती टाकून भाऊ घोड्यावर स्वार झाला व मोठ्या निकरानें लढूं लागला. इतक्या वेळांत मराठ्यांची पिछाडी पळूं लागली. मराठे पळतात हें पाहून अबदालीचे लोक दोहों बाजूंनीं बुणग्यावर घुसले व कत्तल सुरू झाली. शेवटीं त्वेषानें शत्रूवर चाल करून भाऊ गर्दींत मिसळला. याप्रमाणें मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला. त्यांचें सर्व सामानसुमान शत्रूच्या हातीं लागलें. सर्व रणांगणावर प्रेतांचे ढीगच्या ढीग पडले होते; जे लोक दडून बसले होते त्या सर्वांस गिलच्यांनीं कैद केलें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांपैकीं बायकामुलांस गुलाम ह्मणून ठेवून घेऊन पुरुषांची त्यांनीं क्रूरपणानें कत्तल केली. पळा-पैकीं सुमारें पांच सात हजार लोक दिल्लीकडे आले. त्यांत समशेरबहाद्दर मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड, महादजी शिंदे, नाना फडणीस वगैरे मंडळी कशीबशी निघून आली.

८ इतक्यांत बाळाजी बाजीराव भाऊच्या मदतीस निघाला होता, तो नर्मदापार होऊन सिरोंजेस पोंचला होता. तेथें त्याला पानपतचें भयंकर

वर्तमान समजलें, " दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहरा हरवल्या व रुपये व खुर्दा यांचा पत्ताच नाहीं, " अशी व्यापारी खबर लागली. इतक्यांत पळाचे लोकही येऊन मिळाले. पानिपतची बातमी ऐकून बाळाजीस जबर धक्का बसला. तो पुण्यास आला तो सारखा "भाऊ भाऊ" ह्मणून ओरडत होता. शेवटीं या मानसिक दुःखाचा त्याच्या प्रकृतीवर परिणाम होऊन तो लवकरच पर्वतीवर मृत्यु पावला.

---

## ४४ राक्षसभुवनची लढाई १७६३.

बाळाजी बाजीरावास तीन मुलगे होते. त्यांपैकीं सर्वांत वडील विश्वसराव पानिपतांत पडला. त्याच्या मागें दोघे होते. थोरला माधवराव सतरा वर्षांचा, व धाकटा नारायणराव सहा वर्षांचा. बाळाजी बाजीराव वारल्यावर माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं; व तो अजून लहान असल्यामुळें राघोबाच सर्व कारभार पाहूं लागला. त्याचा दिवाण सखारामबापू बोकील हा होता. बापूचें व माधवरावाची आई गोपिकाबाई यांचें वाकडें होतें. तेव्हां मराठे दरबारांत दुही झाली.

२ पानिपत येथील अपजयामुळें मराठ्यांचा दरारा अगदीं नाहींसा झाला व त्यांच्या शत्रूंस जोर आला. या वेळीं हैद्राबादच्या गादीवर सलाबतजंग होता; पण सर्व अधिकार त्याचा धाकटा भाऊ निजामअलीच गाजवीत असे. पानिपतास पराभव झाल्यामुळें मराठे हतवीर्य झाले आहेत, असें पाहून त्यानें पेशव्यास पुढीलप्रमाणें उद्दामपणाचा निरोप पाठविला:—"भीमेअलीकडचें तुमचें सर्व राज्य आम्हांस देऊन टाकावें. व आम्ही सांगूं तो कारभारी नेमून राज्यकारभार चालवावा. इतकें करीत असाल तर आमचें तुमचें सख्य राहील."

३ मग निजामानें एक लाख फौज जमविली, व तो मराठ्यांच्या मुलुखावर चालून आला. मराठी राज्यांतील दुहीमुळें कित्येक मराठे

सरदार त्याला मिळाले होते. त्यानें मराठी मुलुखांत बरीच गडबड केली व मग तो परत औरंगाबादेकडे जाऊं लागला. इतक्यांत मराठे मुत्सद्यांनीं निजामाकडे गेलेल्या सरदारांची समजूत केली व त्यांस परत मराठ्यांकडे आणिलें. मग सर्व मराठ्यांनीं मिळून निजामानें गोदावरी ओलांडली नाहीं तोंच त्यास गांठावें असें ठरविलें. पेशव्यांनीं जलद कूच केलें व ते राक्षसभुवनापासून, आठ कोसांवर आले. तेथें त्यांस अशी बातमी लागली कीं, निजामअल्लीनें गोदावरी ओलांडली आहे, पण फौजेसह त्याचा दिवाण विठ्ठल सुंदर मात्र अजून अलिकडल्या तीरीं आहे. हें ऐकतांच मराठी सैन्यानें कूच केलें व विठ्ठल सुंदरास गांठलें.

४ थोड्याच वेळांत निजामाच्या तोफखान्यांत घोंटाळा झाला. त्याबरोबर आबा पुरंदरे व विठ्ठल शिवदेव विंचूरकर शत्रूच्या सैन्यांत शिरले. मग खुद्द राघोबा सैन्याची टोळी घेऊन कापाकापी करीत आंत गेला. इतक्यांत विठ्ठल सुंदरानें मोठ्या आवेशानें हल्ला करून पुरंदरे व विंचूरकर यांस पार हुसकून दिलें. नंतर सारें निजामाचें सैन्य मध्यभागीं सांपडलेल्या एकट्या राघोबावर तुटून पडलें. राघोबानें पराक्रम करून बराच वेळ आपला बचाव केला; परंतु शेवटीं तो शत्रूच्या हातीं लागतो कीं काय असें वाटूं लागलें.

५ अशा कठीण प्रसंगीं कुमक पाठवून राघोबास माधवरावानें सोडविलें. या युद्धांत सैन्यांत स्वतः हिंडून माधवराव लोकांस उत्तेजन देत होता. एकदां राघोबा सुटल्यावर मराठ्यांनीं असा निकराचा हल्ला केला कीं, त्यामुळें शत्रूची अगदीं गाळण उडाली. खुद्द विठ्ठल सुंदर मारला गेला. आणखी निजामाचे बावीस सरदार जखमी होऊन कैद झाले.

---

१ पेशवाईंत साडे तीन शहाणे प्रसिद्ध होते. १ सखारामबापू बोकील, पुण्याचे दिवाण. १ देवाजीपंत चोरघोडे, नागपूरकर भोंसल्यांचे कारभारी. १ विठ्ठल सुंदर संगमनेरकर, हैद्राबादच्या निजामाचे कारभारी. ।।। नाना फडणीस. एकूण ३।।.

निजामअल्ली उत्तर तीरावर होता. तो सर्व जड सामान तेथल्या तेथें टाकून औरंगाबादेस पळून गेला. या युद्धांत मराठ्यांस जय आला ते माधवरावाच्या शौर्यामुळें होय, ही गोष्ट राघोबानें एका पत्रांत कबूल केली. " चिरंजीव रायांनीं यंदा शिपायीगिरींत व मेहनतींत कांहीं कमी केलें नाहीं; आह्मांपेक्षां अधिक झालें. इतके दिवस त्यांनीं लढाई देखिली नव्हती. पहिली लढाई पाहिली. यांत सर्व प्रकारें तरतूद अधिक केली. ह्यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा आह्मांस आला. सांप्रत कारभार चिरंजीवच करीत आहेत. "

६ आठ दिवसांनीं गोदावरीचें पाणी उतरतांच मराठी लष्कर उत्तर तीराला जाऊन औरंगाबादेकडे चाललें. तेथें जाऊन पेशव्यांनीं त्या शहरास वेढा दिला. पण आतां दोन्ही बाजू युद्धास कंटाळल्या होत्या. तेव्हां उभय पक्षीं तह ठरला. निजामानें उदगीरच्या लढाईत मराठ्यांनीं घेतलेला बासष्ट लक्षांचा प्रांत बहुतेक परत घेतला होता. या तहांत निजामानें एकंदर ब्यायशीं लक्षांचा मुलूख मराठ्यांस दिला. माधवराव राघोबा पुण्यास आले. मग राघोबानें सर्व राज्यकारभार माधवरावावर सोंपविला, व तो स्नानसंध्या करण्याकरितां नाशिकास निघून गेला.

---

## ४१ माधवरावाचा दरारा.

१ राज्यकारभार माधवरावानें हातीं घेतला तेव्हां मराठी राज्याचें वजन अगदीं गेलें होतें. लवकरच माधवरावानें आपल्या कर्तबगारीनें सर्व शत्रूंस नरम आणिलें व राज्याचा दरारा बसविला.

२ म्हैसूरकडे मूळचा हिंदु राजा चिक् कृष्णराज यास गुंडाळून ठेवून हैदरअल्ली हा सेनापतिच आतां राजा बनला होता. त्यानें पानिपतच्या अरिष्टापासून आपला फायदा करून घेण्याकरितां कंबर कसली व लवकरच मराठ्यांचा तुंगभद्रेपलीकडचा मुलूख घेतला, इतकेंच नव्हे तर तो कृष्णे-

पर्यंतच्या मुलुखांत स्वाऱ्या करूं लागला. पुढील पांच सात वर्षांत माधवरावानें हैदरवर तीन स्वाऱ्या केल्या व दरवेळीं त्याचा पूर्ण पराभव केला. या स्वाऱ्यांत माधवरावाचें शौर्य, तडफ व हुशारी उत्कृष्टपणें दिसून आलीं. हैदरपासून तुंगभद्रेपर्यंतचा मुलूख सोडविला. शिवाय तुंगभद्रेपलीकडील 'स्वराज्याचे' प्रांत ताब्यांत आले व 'लढाईचा खर्च' म्हणून जबर खंडणी मिळाली.

३ माधवरावास बाहेरच्या शत्रूंप्रमाणें घरच्या शत्रूंचा मोड करावा लागला. तेंही काम त्यानें उत्तम रीतीनें बजाविलें. मागील गोष्टींत मराठ्यांत दुही होऊन कित्येक मराठे सरदार निजामास जाऊन मिळाले होते म्हणून सांगितलेंच आहे. त्यांपैकीं मुख्य म्हटला म्हणजे नागपूरचा जानोजी भोंसले हा होय. हा बाळाजी बाजीरावाचा प्रतिस्पर्धी रघूजी भोंसले याचा मुलगा असून त्या वेळीं नागपूरच्या गादीवर होता. तो निजामास मिळाला. मग पेशव्यांकडे परत येण्यासाठीं राक्षसभुवनच्या लढाईच्या वेळीं त्यानें बत्तीस लक्षांचा मुलूख मिळविला. माधवरावानें जानोजीवर दोन स्वाऱ्या केल्या; त्यास तो धमकी देऊन मिळविलेला मुलूख ओकावयास लाविला व त्याच्यावर चांगलाच वचक बसविला.

४ दुसरा घरांतील शत्रू म्हणजे माधवरावाचा चुलता राघोबा हा होय. राक्षसभुवनच्या लढाईनंतर राघोबानें स्नानसंध्या करून स्वस्थ बसण्याचें ठरविलें; पण हा बेत वरकरणी होता. त्याची बायको आनंदीबाई ही महाकारस्थानी होती. तिच्या आग्रहावरून राघोबानें राज्याचा अर्धा वांटा मागितला. 'तुम्हांस मुलगा नाहीं, तेव्हां तुह्मांस राज्य काय करावयाचें असें म्हणण्यास कोणास जागा राहूं नये म्हणून त्यानें कोंकणांतील भुस्कुटे आडनांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव अमृतराव ठेविलें. माधवरावानें राघोबाची विंचुराजवळ भेट घेतली. राघोबानें स्नानसंध्या करीत स्वस्थ बसण्याचें कबूल केलें व माधवरावानें त्याला

झालेलें पंचवीस लक्ष कर्ज फेडण्याची हमी घेतली. पण बाईलबुद्धि राघोबा स्वस्थ कसा बसणार ? त्यानें लवकरच निजाम व भोंसले यांच्याकडे कारस्थानें चालविलीं. तेव्हां माधवरावानें चुलत्याचा कायमचा बंदोबस्त करण्याचें ठरविलें. राघोबावर माधवराव चालून गेला. मग घोडप किल्ल्यांत त्याला पकडून पुण्यास आणून शनिवारवाड्यांत बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें ( १७६८ ).

५ राघोबासारख्या भोळसटाच्या जागीं माधवरावासारखा तरबेज यजमान आलेला पाहतांच कांहीं कामचुकार फाजील शिष्टाई मिरविणाऱ्या वृद्ध लोकांचा बडेजाव कमी झाला. त्यामुळें राघोबा कामावरून गेला हें या लोकांस आवडलें नाहीं. गंगाधर यशवंत चंद्रचूड अशा लोकांपैकीं एक होता. एके दिवशीं दरबार भरला असतां गंगोबा म्हणाला " हल्लीं राज्यकारभाराचा बोज कांहींच नाहीं. एका लहान मुलाच्या हातांत कारभार गेल्यानें पोरखेळ माजला आहे. " ही त्या म्हाताऱ्याची वटवट ऐकून माधवरावास राग आला. तो एकदम गादीवरून उठला; व गंगोबाच्या जवळ जाऊन त्यानें सर्वांच्या देखत जोरानें एक त्याच्या थोबाडींत लगाविली.

६ माधवरावास लबाडी बिलकुल खपत नसे, व तो जात्याच हुशार असल्यामुळें त्यास फसविणेंही शक्य नव्हतें. बातमी काढण्याच्या कामां त्याची कमाल असे. निरनिराळ्या खात्यांतील लोकांनीं लांच खाल्ल्याचें त्याला कळलें, तेव्हां त्यानें हिशेब तपासून त्यांच्या लबाड्या उघडकीस आणिल्या व त्यांस कडक शासन केलें; तेव्हांपासून सर्व लोक सचोटीनें वागूं लागले. त्यावेळीं सरकारी किंवा अधिकाऱ्यांच्या मालाची ने आण करावयाची असल्यास ती शेतकरी लोकांकडून फुकट करून घेण्यांत येई. या पद्धतीस वेठ म्हणत. तिच्यामधील अन्याय माधवरावास दिसून आला व त्यानें ती अजीबात बंद केली.

७ एकदां पुण्यांतील शास्त्रीलोकांची भाषणें ऐकून स्नानसंध्येंत माधवराव बराच वेळ घालवूं लागला. रामशास्त्री प्रभुणे हा बाणेदार गृहस्थ त्या वेळीं न्यायाधीश होता. तो माधवरावास भेटण्याकरितां आला असतां त्याला कळलें कीं, पेशवे जपांत गुंतले आहेत. तेव्हां तो परत गेला, असें एक दोन दिवस झालें. तेव्हां तिसऱ्या दिवशीं रामशास्त्री निराळ्याच वेळीं माधवरावाकडे गेला व म्हणाला, " मी आपल्या जागेचा राजीनामा देतों, मला काशीस जाऊन रहावेंसें वाटूं लागलें आहे. " माधवरावानें रामशास्त्र्याच्या बोलण्यांतील हेतु तेव्हांच ताडला व म्हणाला, " मी काल जपांत गुंतल्यामुळें तुमची भेट घेण्यास वेळ मिळाला नाहीं, याबद्दल मला क्षमा करा. " रामशास्त्र्यानें यावर उत्तर केलें, " तुम्ही आपणास राजे म्हणवितां व प्रजेचें काम पाहण्यास तुम्हांस वेळ मिळत नाहीं. मला तर असें वाटतें कीं, राजास जर मोक्ष पाहिजे असेल तर त्यानें प्रजेच्या हिताविषयीं तत्पर रहावें म्हणजे झालें. " माधवरावास हा सुंदर उपदेश पटला व त्यानें जपजाप्यांत गुंतून राहण्याचें सोडून दिलें. अशा रीतीनें शूर, न्यायी व प्रजेच्या हिताची काळजी वाहणारा माधवराव गादीवर आल्यावर मराठ्यांच्या नांवाचा दरारा चोहोंकडे पूर्वी प्रमाणें बसला.

---

## ४६ पानिपतचा सूड.

१ सन १७६६ सालीं राघोबानें उत्तर हिंदुस्थानावर स्वारी केली; मराठ्यांचे पानिपतचे शत्रु रोहिले, सुजाउद्दवला व पठाण यांस तंबी पोंचविणें जरूर होतें. जाटही अलीकडे उन्मत्त झाले होते. परंतु चांगली तयारी नसल्यामुळें कोणाचाच समाचार न घेतां राघोबा देशीं परत आला. तेव्हां मराठ्यांचे शत्रु अगदीं शेफारून गेले. त्यांचें पारिपात्य करण्यासाठीं माधवरावानें उत्तर हिंदुस्थानांत फौज पाठविण्याचें ठरविलें. या फौजेवर रामचंद्र गणेश कानडे हा मुख्य नेमून, विसाजी कृष्ण बिनीवाले यास

त्याचा कारभारी नेमिलें. त्यांच्या हाताखालीं पंधरा हजार फौज होती. शिवाय तुकोजी होळकर व महादजी शिंदे हे दोघेही पंधरा पंधरा हजार फौजेसह स्वारींत हजर होते.

२ पावसाळा लागण्याच्या अगोदर सर्व फौज नर्मदा उतरून पलीकडे जावी या हेतूनें माधवरावानें सर्व सरदारांस ताबडतोब कूच करण्याविषयीं हुकूम केला होता. तथापि महादजी शिंद्यानें कांहींच सामानसुमानाची तयारी न करितां तसेच कांहीं दिवस लोटले. थेऊरास जातांना शिंद्याची फौज तशीच असल्याचें माधवरावाच्या नजरेस आलें. त्याबरोबर महादजीस त्यानें सांगितलें कीं, ' पाटील, मी परत येतांना तुमच्या तळावर जर एक तंबू दिसला तर सर्व गोट लुटून तुमची जहागीर जप्त करीन. यासाठीं आतांच्या आतां कूच करून चला. ' महादजीनें मुकाट्यानें आपला गोट आवळून माधवराव परत येण्याच्या आंत कूच केलें !

३ नर्मदा उतरून गेल्यावर सन १७६९ चा पावसाळा या सैन्यानें बुंदेलखंडांतील बंडखोरांचा बंदोबस्त करण्यांत घालविला. नंतर सर्व फौजा एक होऊन जाटांच्या मुलखावर चालून गेल्या. जाट शरण आले. त्यानीं मराठ्यांचा आग्रा प्रांत व किल्ला बळकावला होता, तो आतां मराठ्यांस परत दिला.

४ पुढें मराठे आपल्या पानिपतच्या स्वारींतील शत्रूंचा समाचार घेण्याकरितां निघाले. पहिल्यानें मराठे पठाणांवर चालून गेले. पठाण शरण आले. त्यांनीं पानिपतच्या लढाईनंतर बळकाविलेला सर्व मुलूख मराठ्यांस परत दिला व आपला बचाव करून घेतला.

५ नंतर मराठ्यांनीं सन १७७१ च्या शेवटीं शहाअलम बादशहास दिल्लीस नेऊन गादीवर बसविलें. त्यावेळीं दोघांमध्यें पुढीलप्रमाणें ठराव झाला. मराठ्यांकडे पानिपतच्या लढाईपूर्वी ज्या ज्या जहागिरी होत्या त्या त्या पुन्हां त्यांजकडे सुरू कराव्या; व अहमदशहाच्या कारकीर्दीपा-

सून चौथाईची बाकी तुंबली होती ती द्यावी. याबद्दल मराठ्यांनीं बादशहाच्या शत्रूचें पारिपत्य करावें. यापुढें शत्रूवर दोघांनीं मिळून मोहिमा कराव्या व होणारी मिळकत सारखी वांटून घ्यावी.

६ आतां मराठ्यांचा रोहिल्यांची खोडकी मोडण्याचा बेत कायम झाला; मराठे गंगा उतरून रोहिलखंडांत शिरले. नंतर सर्व बिजनूर जिल्हा त्यांनीं लुटून फस्त केला. त्यांनीं फत्तरगड सर केला. तेथें नजीबउद्दवल्यानें पानिपतच्या वेळीं लुटून घेतलेली अपार संपत्ति भरलेली होती, ती सर्व आतां मराठ्यांच्या हातीं आली. नंतर सर्व रोहिलखंडभर मराठी फौज पसरली व मुलूख उध्वस्त करूं लागली. रोहिले लोक शूर खरे; पण मराठ्यांपुढें त्यांची अगदीं गाळण उडाली. त्यांचे सर्व सरदार उत्तरेकडे तिराईच्या रानांत पळून गेले.

---

## ४७ दक्षिणचा दिवा मालवला ! हिरा हरपला !!

१ माधवराव हुशार, उद्योगी व न्यायी होता; पण या गुणांचा आपल्या राष्ट्रास पूर्ण उपयोग होण्यास एक अडचण होती; ती ही कीं, त्याची प्रकृति वरचेवर बिघडत असे. एकदां त्याची आई गोपिकाबाई हिनें त्यास एका पत्रांत लिहिलें, " तालीम तुमच्या प्रकृतीस मानवत नाहीं; ती करण्याचें तुम्हीं सोडून द्यावें. " त्यावर माधवरावानें उत्तर लिहिलें, " मला वडिलांच्या आज्ञेपेक्षां तालीम अधिक आहे कीं काय? तालीम सोडली, हल्लीं नमस्कार मात्र घालीत असतों. "

२ सन १७७२ चा उन्हाळा सुरू होतांच त्याची प्रकृति बिघडली व दिवसेंदिवस शक्तिपात होऊं लागला. तेव्हां तो थेऊरास येऊन राहिला. आपल्या राज्याचें पुढें काय होईल याची त्यास सारखी काळजी लागून राहिली होती. या वेळीं माधवरावाजवळ बाळाजी जनार्दन भानु ( प्रसिद्ध नाना फडणीस ), त्रिंबकराव मामा पेठे, सखारामबापू, रास्ते

व पटवर्धन वगैरे मंडळी होती. आपल्यामागें नारायणरावाच्या एकट्याच्या हातून राज्याचा बंदोबस्त होणार नाहीं, असें माधवरावास वाटलें, आणि वरील मंडळीच्या सल्ल्यावरून राघोबास कैदेतून सोडण्याचा त्यानें बेत केला. राघोबास कुटुंबांत कलह व राज्यांत फंदफितुरी न करण्याविषयीं त्यानें सांगितलें, व नारायणरावाचा हात त्याच्या हातीं देऊन त्याचा संभाळ करण्याविषयीं फिरून फिरून त्याला विनंती केली. नारायणरावास पुढें कोणाशीं कसें वागावयाचें याचा उपदेश केला. ' माझ्या जिवांत जीव आहे तेथवर मी नारायणरावास अंतर देणार नाहीं, ' असें सखारामबापूपासून त्यानें वचन घेतलें.

३ पुढें थोड्याच दिवसांनीं माधवराव मृत्यु पावला. ' आम्ही महाय त्रेस जातों व आमची तयारी करा ' असें सांगून स्मृतींत ( शुद्धीवर असतां ) ' गजानन गजानन ' असा नामघोष करीत असतां मोठ्या योग्याप्रमाणें नेत्रद्वारें त्याचा प्राण गेला रमाबाई सती गेली. सती जाण्यापूर्वीं तिनें आपले अलंकार गरीबांस वांटले व नारायणरावाचा हात राघोबाच्या हातीं देऊन त्यास ' वडिलाप्रमाणें सर्वांचें यथास्थित चालवावें ' असा तिनें बोध केला. मग सर्वांचा निरोप घेऊन अग्नीच्या ज्वालांत ती महासती अदृश्य झाली. थेऊरचा गणपती व त्याजवळचें सती रमाबाईचें वृंदावन पाहून अद्यापि त्या दुःखद प्रसंगाची आठवण होते.

४ पूर्वीं बाळाजी बाजीराव व सदाशिवरावभाऊ यांनीं हिंदुपदपातशाही स्थापण्याचा आटोकाट प्रयत्न केला; इतक्यांत दुर्दैवानें पानिपतचें अरिष्ट मराठी राष्ट्रावर कोसळलें. परंतु अशा संकटसमयीं माधवरावासारखा तरुण, वजनदार व न्यायी नायक मराठी राष्ट्रास मिळाला. मग अवघ्या पांच दहा वर्षांतच निजाम शमला, हैदर नमला, उत्तरेकडील रोहिले आदिकरून शत्रूही हरले ! मराठी राष्ट्राचें कीर्तितेज बाळाजी बाजीरावाच्या वेळेप्रमाणें झळकूं लागलें ! लवकरच हिंदुपदपातशाही स्थापण्याचा सं-

कल्प पूर्णपणें फळास येण्याचा रंग दिसूं लागला; पण क्रूर कालानें अचानक घाला घातला ! ! दिवा मालवला ! हिरा हरपला ! !

---

## ४८ ‘ध’ चा ‘मा’ १७७३.

माधवराच्या मृत्यूनंतर नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. त्याचें वय सतरा वर्षांच होतें, व अजून त्याचा लहानपणचा उतावळेपणा गेला नव्हता. एकदां सखारामबापूचें म्हणणें न ऐकतां नारायणरावानें त्याचें मन दुखविलें. नारायणराव वाटेल त्या माणसाच्या बोलण्यावर विश्वास टाकीत असे. त्यामुळें हलक्या लोकांचा दरबारांत मान होऊं लागला. राघोबाची फंदफितुरी सुरू झाल्याचें नारायणरावास कळलें. त्यावरून त्यानें राघोबास फिरून कैदेंत टाकिलें.

२ थोड्या दिवसांनीं राघोबाची सुटका करण्याचा एक कट झाला. लवकरच सखारामबापूसारखे लोक त्यांत सामील झाले. मग राघोबास सोडवावयाचें हा साधा हेतु जाऊन त्याच्या जागीं नारायणरावास कैद करावयाचें हा दुष्ट हेतु आला. नारायणरावास धरण्याचें काम गारदी लोकांकडून पार पाडण्याचें ठरलें होतें. गारद्यांपैकीं सुमेरसिंग, खरकसिंग व महंमद इसफ या तीन जमादारांस पांच लक्ष रुपये देण्याचा करार झाल्यावर गारदी पेशव्यास धरावयास तयार झाले; व ‘नारायणरावास धरावें’ असा हूकूम राघोबानें गारद्यांस दिला.

३ पण या धरण्याच्या कटाच्या आंत कांहीं निवडक मंडळींनीं, आनंदीबाईच्या सम्मतीनें, नारायणरावास ठार मारून टाकावें, असें ठरविलें मग राज्यासाठीं हपापलेल्या आनंदीनें हुकुमाच्या वाक्यांतील ‘ध’ च्या ठिकाणीं ‘मा’ केला ! गारद्यांना आपल्या नवऱ्यानें देऊं केलेले पांच लक्ष रुपये देऊन शिवाय साष्टी, नगर व पुरंदर हे तीन किल्लेही देण्याचें तिनें वचन दिलें;

आणि नारायणरावास ठार मारूं, अशाबद्दल गारद्यांकडून बेलभंडार उचलून घेतला.

४ एके दिवशीं सकाळीं पर्वतीचें दर्शन घेऊन सासुरवाडीस नारायणराव भोजनास गेला. भोजन झालें तोंच त्यास कोणीं सूचना केली कीं, गारद्यांचा दंगा चालू आहे; आपण वाड्यांत जाऊं नये. नारायणरावास गारदी दंगा करणार आहेत ही बातमी पर्वतीवरच समजली होती. तेव्हां त्यानें हरिपंत फडक्यास त्यांचा बंदोबस्त करण्यास सांगितलें होतें, पण हरिपंतानें जेवण झाल्यावर बंदोबस्त करण्याचें ठरविलें.

५ इकडे नारायणराव जेवण झाल्यावर थोडयाच वेळानें शनवारवाडयांत आला. तिसऱ्या मजल्यावर तो अम्मळ उभा होता. इतक्यांत सुमेरसिंग, खरकसिंग व महंमद इसफ असे तिघे आले व म्हणाले, “ महाराज आमचा पगार द्यावा. ” पेशव्यांनीं आज्ञा केली ‘ तिसरे प्रहरीं कचेरीस विनंती करावी. ’ गारद्यांनीं उत्तर केलें, ‘ आपण धनी; आपण द्यावा. ’ नंतर नारायणराव जिना उतरूं लागला. गारद्यांनीं लगट केली, इच्छारामपंत ढेरे म्हणून कारकून जवळ होता, तो गारद्यांस राग भरला; तेंव्हां गारद्यांनीं त्याचा तेथल्या तेथें प्राण घेतला. खालीं चौकांत पूजेच्या दोन गाई बांधल्या होत्या, त्या बुजल्या व दावीं तोडून अंगावर आल्या; तेव्हां गारद्यांनीं तरवारीनें ठार केल्या ! इतक्यांत नारायणरावानें जाऊन राघोबाच्या कमरेस मिठी घातली व तो मोठ्या दीनपणानें म्हणाला “ काका ! मला मारूं नका ! किल्ल्यावर पीठमीठ लावून ठेवा ” हें ऐकून राघोबास दया आली व तो गारद्यांस म्हणाला. “ यास मारूं नका. ” गारदी म्हणाले, “ आतां यांस आम्ही जिवंत सोडणार नाहीं. सर्पास दुखवून कोणी सोडील काय ?” इतकें बोलून गारद्यांनीं वार केला, लागलीच राघोबानें नारायणरावास सोडून दिलें. आनंदीचा खिजमतगार तुळ्या पवार यानें नारायणरावाचा पाय ओढून त्यास खालीं पाडलें.

तोंच चापाजी टिळेकर म्हणून विश्वासु खिजमतगार पेशव्यांच्या अंगावर पडला, व जीव न घेण्याविषयीं गारद्यांची विनवणी करूं लागला. पण त्या क्रूर गारद्यांस कसची दया येणार ! त्यांनीं तरवारी चालवून दोघांसही ठार केलें.

६ दुसऱ्या दिवशीं शिष्ट ब्राह्मण बोलावून प्रायश्चित्त काय घ्यावें, याचा राघोबानें विचार आरंभिला. त्या सभेस रामशास्त्री प्रभुण्यासही बोलविलें. सभेंत रामशास्त्री बोलला, "यास देहान्त प्रायश्चित्त करावें !" त्यावर सर्व पंडित म्हणाले " शास्त्रीबोवा, असें काय म्हणून बोलतां? " त्यावर त्या निस्पृह रामशास्त्र्यानें उत्तर केलें, " मला यांच्या राज्यांत रहावयाचें नाहीं "

---

## ४९ बारभाई १७७३.

१ राघोबास पेशवाई प्राप्त होतांच त्याचे मित्र वर चढूं लागले व जुने मुत्सद्दी मागें पडले. खुद्द सखारामबापूसही राघोबा फारसा विचारीत नसे. मग इतरांची कथा ती काय ! या गोष्टींचा परिणाम बापूवर अतिशयच झाला. राघोबास पेशवाई पचूं देतां कामा नये असें त्याच्या मनानें घेतलें. इतक्यांत नारायणरावाची बायको गरोदर आहे असें त्यास समजलें; तेव्हां या आधारावर नवीन व्यूह रचण्याचा त्यानें निश्चय केला.

२ पुणें दरबारांत सखारामबापूची व नाना फडणिसाची अशा दोन फळ्या होत्या. गंगाबाईचा जीव बचवावा, राघोबास पदच्युत करून तिच्या नांवाची द्वाही फिरवावी, तिला पुत्र झाला तर बरेंच नाहीं तर तिच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवें राज्यकारभार चालवावा, अशी बापूची मसलत होती. नाना फडणीस आपल्या पक्षास सहज अनुकूल होईल, असा त्यास सुमार दिसला. मग दोन्ही पक्ष एक होऊन

बापूची मसलत अमलांत आणण्याचें ठरलें. यांत बारा मंडळी मुख्य होती. म्हणून ही मसलत ' बारभाईचें कारस्थान ' या नांवानें प्रसिद्ध आहे.

३ पावसाळा संपतांच राघोबा स्वारीस निघाला तो पहिल्यानें निजामावर गेला. पेडगांवच्या मुक्कामीं असतांच बापू आजारीपणाचें सोंग करून परत आला. इतर मंडळीही कांहींना कांहीं निमित्त काढून पुण्यास परत आली. नंतर पूर्वी ठरलेली मसलत अमलांत आणण्यास सुरुवात झाली. नारो आप्पाजी तुळशीबागवाले यानें पुणें शहर ताब्यांत घेतलें, आणि गंगाबाई व पार्वतीबाई यांस पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेविलें. सखारामबापू व नाना फडणीस यांनीं राघोबास सातारच्या महाराजाकडून पदच्युत करून पेशवाईचीं वस्त्रें गंगाबाईच्या नांवें व कारभाराचीं वस्त्रें आपल्या उभयतांच्या नांवें आणविलीं, व शिंदे, होळकर, आदिकरून सर्व सरदारांस आपण काय केलें हें कळविण्यासाठीं पत्रें पाठविलीं.

४ या बातम्या राघोबास समजतांच त्यानें कर्नाटकची मोहीम तहकूब केली, व परत कूच केलें. तो कृष्णा उतरला, व मग पटवर्धन व रास्ते या दोघांच्या जहागिरींत लुटालूट करण्याचा त्यानें सपाटा चालविला. इतक्यांत कारभाऱ्यांकडील पन्नास हजार फौज त्याच्यावर चाल करून आल्यामुळें तो उत्तरेस पळूं लागला. येवढ्या वेळांत त्रिंबकराव मामा, पटवर्धन व हरिपंत फडके हे एक झाले, व राघोबाचा पाठलाग करूं लागले. राघोबा पंढरपुराकडे आला; व तो पुढें जाणार अशी बातमी होती. मागून मामाची फौज पाठलाग करीत होती; इतक्यांत राघोबानें मामाच्या फौजेशीं कासेगांवीं गांठ घातली. या लढाईत त्रिंबकरावाचा पराभव झाला व तो स्वतः जखमी होऊन मरण पावला. हा कारभाऱ्यांच्या फौजेवर मोठाच कठीण प्रसंग होता. पण हरिपंत फडक्यानें मुळींच कच न खातां फौजेस भरंवसा देऊन फिरून एकत्र केलें. तेव्हां फडक्याचें

पारिपत्य करण्याचें राघोबास धैर्य होईना. सबब तो उत्तरेस बऱ्हाणपुराकडे पळत सुटला. हरिपंतही, भोंसले व निजाम यांसह त्याचा पाठलाग करीत चालला.

५ इतकें होतें तों पुरंदरास गंगाबाई प्रसूत होऊन मुलगा झाला (१७७४). या मुलाचें नांव माधवराव असें ठेवलें. त्यास पुढें कौतुकानें सवाई माधवराव म्हणूं लागले. त्याच्या चाळिसाव्या दिवशींच कारभाऱ्यांनीं पेशवाईचीं वस्त्रें त्याच्या नांवें आणविलीं. ही बातमी राघोबास कळतांच पेशवाई मिळण्याची त्याची आशा नष्ट झाली. त्यानें बोलणें लावलें कीं, " आपण कारभारांत बोलणार नाहीं; स्वस्थ पुण्यांत राहूं. तसें नसल्यास पूर्वींची जहागीर द्यावी. स्वस्थ स्नानसंध्या करून राहूं. " तें बोलणें कारभाऱ्यांनीं मान्य केलें नाहीं. त्यांनीं साफ सांगितलें कीं, " फक्त दानधर्माकरितां दोन लक्ष रुपये घेऊन आनंदवल्लीस रहावें, तें होत नसेल तर अंगांत दम असेपर्यंत भटकत रहावें. "

---

## ५० इंग्रजांशीं लढाई १७७५–१७८३.

१ हिंदुस्थान देश श्रीमंत म्हणून येथें व्यापारासाठीं पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज वगैरे युरोपिअन लोक आले होते. पण हे लोक केवळ व्यापारांत फार दिवस राहिले नाहींत. त्यांनीं समुद्रकिनाऱ्याला मुलूख मिळविला. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीपासून फ्रेंच व पोर्तुगीज मागें पडले. इंग्रजांचा मात्र उत्कर्ष होऊन त्यांनीं मद्रास, बंगालकडे मुलूख मिळविला. आतां कारभाऱ्यांनीं गंगाबाईचा पक्ष घेऊन राघोबाविरुद्ध कारस्थान रचलें. तेव्हां मराठी राज्यांत दुहीं उत्पन्न करणारा राघोबा सुरतेस गेला; आणि त्याला आश्रय देण्याचें मुंबईच्या गव्हर्नरानें मोठ्या खुषीनें कबूल केलें. ' इंग्रजांनीं राघोबास पेशवाईच्या गादीवर बसविण्याकरितां तीन हजार फौजेची कुमक करावी, राघोबानें ह्या फौजेच्या खर्चाबद्दल गुजराथेंतील

चार महाल इंग्रजांच्या हवालीं करावे, शिवाय संकटसमयीं मदत केल्याबद्दल इंग्रजांनीं घेतलेली साष्टी त्यांजकडे ठेवून सव्वा एकोणीस लक्षांचा मुलूख राघोबानें इंग्रजांस द्यावा,' असा तह राघोबा व इंग्रज या दोघांमध्यें ठरला ( १७७५ ).

२ मग गुजराथेंतून इंग्रज फौज राघोबाच्या मदतीस निघाली. कारभाऱ्यांतर्फे हरिपंत फडके राघोबाचा पाठलाग करीत होता. त्याच्या सैन्याशीं इंग्रजांच्या लढाया होऊं लागल्या. पावसाळा लागल्यामुळें युद्ध थांबलें. इतक्यांत नवीनच प्रकरण उद्भवल्यामुळें लढाई तूर्त तहकूब झाली. त्यावेळीं हेस्टिंग्ज म्हणून कलकत्त्याचा गव्हर्नर होता. इंग्रजांच्या हिंदुस्थानावरील सर्व मुलुखावर त्याचाच अधिकार चालावा असा इंग्लंडांत नुक्ताच ठराव झाला होता. पुतण्याचा खून करून राज्य मिळवूं पाहणाऱ्या राघोबास मुंबईच्या गव्हर्नरानें मदत करण्याचें कबूल केलें हें हेस्टिंग्जला आवडलें नाहीं. त्यानें मुंबईकरास युद्ध थांबविण्याविषयीं हुकूम पाठविला व कारभाऱ्यांकडे वकील पाठविला. मग पुरंदर येथें पुढील तह ठरला. " साष्टी, भडोच शहर व त्याजवळील तीन लक्षांचा मुलूख इंग्रजांस द्यावा. इंग्रजांनीं आपली फौज परत न्यावी. खर्चाकरितां दरमहा२५००० रुपये घेऊन राघोबानें कोपरगांवीं रहावें. राघोबानें किंवा पेशव्याकडील इतर कोणीं बंड केल्यास इंग्रजांनीं त्यास मदत करूं नये " ( १७७६ ).

३ पण मुंबईकरास हा तह पटला नाहीं व त्यानें राघोबास तसाच आश्रय कायम ठेविला. पुढें बापू व नाना यांच्यामध्यें फूट पडली. तिचा फायदा घेऊन खुद्द पुण्यास जाऊन राघोबास गादीवर बसविण्याकरितां इंग्रजांनीं मुंबईहून फौज पाठविली. मग राघोबाला घेऊन इंग्रज घाटावर चढून आले. तेथपासून मराठ्यांशीं त्यांच्या चकमकी होऊं लागल्या. कार्लें येथील एका चकमकींत क्याप्टन स्टुअर्ट हा प्रसिद्ध इंग्रज सरदार गोळी

लागून पडला. त्यास मराठे ईष्ठूर फाकडा म्हणत. पुढें दाभाड्याचे तळेगांवपर्यंत इंग्रज चालून आलें. परंतु मराठ्यांनीं सर्व गांवें जाळून फस्त केलीं होतीं. तेव्हां पुढें गेल्यास आपली उपासमार होईल अशी इंग्रजांस भीति पडली व त्यांनीं परत जाण्याचें ठरविलें. परंतु ते वडगांवपर्यंत पोंचतात तोंच मराठ्यांनीं त्यांना चोहों बाजूंनीं घेरलें. तेव्हां इंग्रजांचा नाइलाज होऊन ते शरण आले ( १७७९ ). वडगांव येथें तह ठरला त्यावरून इंग्रजांनीं राघोबास मराठ्यांच्या हवालीं केलें व मराठ्यांचा सर्व मुलूख परत देण्याचें कबूल केलें. मग मराठ्यांनीं इंग्रज फौजेस मुंबईस जाऊं दिलें. या लढाईच्या वेळीं मराठ्यांकडील महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं चांगला पराक्रम केला.

४ या लढाईनंतर युद्ध थांबेल असें वाटलें होतें; परंतु राघोबा मराठी राज्यास पुरता भोंवणार होता ! तो फिरून पळून इंग्रजांकडे गेला व मुंबईकरानें त्यास आश्रय दिला. पुनः गुजराथेंत व कोंकणांत युद्ध सुरू झालें. दोन वर्षें युद्ध चाललें होतें. शेवटीं इंग्रजांस कळून चुकलें कीं, राघोबास पेशवाई मिळवून देणें अशक्य आहे. मग १७८३ सालीं महादजी शिंद्याच्या मध्यस्थीनें साल्बाई येथें पुढीलप्रमाणें तह झाला. "लढाई सुरू झाल्यापासून इंग्रजांनीं घेतलेल्या मुलुखापैकीं साष्टीखेरीज सर्व मुलूख मराठ्यांस परत द्यावा; तह ठरल्यापासून चार महिन्यांच्या आंत राघोबानें पेशव्याकडे जावें. इंग्रजांशीं स्पर्धा करणाऱ्या कोणाही टोपीवाल्याशीं मराठ्यांनीं दोस्ती करूं नये व मराठ्यांचा द्वेष करणाऱ्या कोणाही पगडीवाल्याशीं इंग्रजांनीं मैत्री करूं नये." नंतर राघोबा आपली बायको

---

१ एकंदर फाकडे तीन, १ कोन्हेर त्रिंबक एकबोटे, २ मानाजी शिंदे ३ क्याप्टन स्टुअर्ट.

आनंदीबाई व पुत्र बाजीराव आणि अमृतराव यांसह कोपरगांव येथें येऊन राहिला. तेथें तहानंतर अकरा महिन्यांनींच तो मृत्यु पावला.

---

## ५१ भाग्यवान सवाईमाधवराव पेशवे.

१ सवाई माधवराव पुरंदरास जन्मल्याची हकीकत मागें सांगितलीच आहे. त्याच्या जन्माच्या पूर्वी गंगाबाईस पुत्र व्हावा म्हणून सर्व प्रजा अगदीं आतुर झाली होती ! गंगाबाईस पुत्र होणें प्रजेस जितकें सुखावह होतें तितकेंच तें आनंदी व राघोबा या दुकलीस दुःखावह होतें. तेव्हां अर्थातच गंगाबाईचा गर्भपात करण्याविषयीं आनंदीबाईनें अतिशय खटपट केली. कारभाऱ्यांच्या प्रयत्नास सुदैवानें यश येऊन गंगाबाई सुरक्षितपणें प्रसूत झाली. माधवरावाचें बालपणहीं आनंदीनें त्याचा घात करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय जाऊं दिलें नाहीं. पण तेव्हांही ईश्वरानें कृपा केल्यामुळें तिचें कांहीं चाललें नाहीं. इंग्रजांशीं वडगांवचा तह झाल्यावर नानानें बालपेशव्यास पुण्यास आणिलें. पुढें १७८२ मध्यें माधवरावाचें लग्न झालें; त्यावेळीं सातारचा शाहू, हैद्राबादच्या निजामअलीचा मुलगा व सर्व मराठे सरदार जमले होते. समारंभ मोठ्या थाटाचा झाला. मराठे लोकांत अजूनही एकी आहे हें सर्व हिंदुस्थानभर जाहीर झालें.

२ माधवराव पुण्यांत राहूं लागल्यापासून त्याच्या थोर पदास उचित असें शिक्षण त्याला देण्याविषयीं नानानें तजवीज केली. तिरंदाजी व दांडपट्टा ह्यांचा अभ्यास माधवरावानें केला. सायंकाळीं तालीमखान्यांत जाऊन तेथें तो व्यायाम करीत असे. त्याच्या बौद्धिक शिक्षणाचीहीं सोय झाली होती. त्याला बोधपर व मनोरंजक गोष्टी वाचावयास सांपडाव्या व मोडी वाचावयाचाही सराव व्हावा म्हणून नानानें भारत व भागवत यांच्या मराठी बखरी लिहविल्या व सारिकाशतक नांवाचा चमत्कारिक गोष्टींचा ग्रंथ रचविला. पेशवा मोठा होऊं लागला तेव्हां दर

बारांत परकीय राज्यांतील वकील आला असतां त्याला उत्तरें देणें वगैरे कामें नाना पेशव्याकडूनच करवून घेऊं लागला. कोणतेंही काम पेशव्यास नीट समजावें यासाठीं नानाची सारखी खटपट असे.

३ एकदां माधवरावानें आपली आजी गोपिकाबाई हीस "मी अज्ञान बालक, नित्यव्यवहार कसा करावा हें आपण मला लिहून धाडावें." म्हणून पत्र लिहिलें होतें. गोपिकाबाई नाशिकजवळ गंगापुरास राहत असे. तिनें माधवरावास एक पत्र धाडिलें. त्यांत त्यास उत्तम बोध केला. त्या पत्रापैकीं महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे.

"प्रात:काळचे घटका रात्रौ उठोन दिशेस जाऊन पादप्रक्षालन मुखप्रक्षालन करून दिवाणखान्यांतील मृत्तिकागणपतीचें दर्शन घेऊन प्रात:स्मरणाचे श्लोक म्हणावे. वैद्याकडून प्रकृतीअन्वयें औषध घेतल्यावर लिहावयास बसावें मग तालीमखान्यांत जाऊन दंड काढावे. स्नान झाल्यावर संध्या थोडकी पण न बोलतां करावी. भोजनाचेपूर्वी सोंवळें झाल्यावर थोरल्या देवघरांत जाऊन फुलें घालून नमस्कार करून ब्राह्मणांस उदक सोडून भोजनास बसावें. ते समयीं भाषण करणें तें राजसूययज्ञांतील ब्राह्मणभोजनप्रकरणीं वगैरे योग्य सर्वांस दिसेल तें बोलावें. नंतर शास्त्री याजजवळ विराटपर्वापासून भारताची चिंतनिका करावी. व वृद्ध मनुष्यें पदरचीं व अन्यत्र शहाणे असतील त्यांशीं दिल्लीप्रकरणीं व महाराजप्रकरणीं गोष्टी कशा झाल्या त्या ऐकण्यांत असाव्या. तसबिरा व नकाशे अनेक पाहत असावे, ते समयीं शहाणे बुद्धिमान् असतील ते जवळ असावे. घोडीं फिरवावयास चार रोजांनीं जावें; ते समयीं बरोबर पटवर्धन मंडळी व अन्यत्र सरदार असावे. दीपदर्शन झाल्यानंतर संध्येस वस्त्रान्तर करून बसावें. रात्रीच्या भोजनानंतर कार्याकारण मंडळी जवळ असावी. ते समयीं बातमीदारांनीं गुप्त वर्तमान

सांगत असावें. हरएक बातमीचीं पत्रें पहावयाजोगीं असतील तीं पहावीं. नंतर निद्रेस जावें. ”

---

## ५२ महादजी शिंद्याचा उत्कर्ष

१ पानिपतच्या लढाईतून जे लोक पळून आले त्यांत महादजी शिंदे व नाना फडणीस हे दोघे होते. माधवरावाच्या अकालीं मृत्यूनंतर मराठी राज्याचे हेच दोन आधारस्तंभ होते. नानाची बुद्धि व महादजीची तलवार या दोन आधारांवर मराठी राज्याची बळकटी अवलंबून होती.

२ महादजी हा राणोजी शिंद्याचा दासीपुत्र होय. माधवरावाच्या वेळीं शिंदे घराण्याची सरदारी महादजीकडे आली. महादजीस सरदारीचीं वस्त्रें देण्याच्या विरुद्ध राघोबा होता, परंतु खुद्द माधवरावाच्या आग्रहामुळें महादजीस सरदारी मिळाली. पुढें इंग्रजांच्या आश्रयानें राघोबा मराठी राज्यावर उठला त्यावेळीं महादजीनें नानाफडणिसास उत्कृष्ट साहाय्य केलें व माधवरावाचें ऋण फेडिलें ! मुख्यतः महादजीच्या शौर्यामुळेंच मराठ्यांचा इंग्रजांशीं चाललेल्या लढाईत निभाव लागला. तेव्हां अर्थातच शिंद्याचें प्रस्थ पुष्कळच वाढलें. साल्बाईच्या तहाच्या वेळीं व त्यानंतर इंग्रजांशीं कांहींही बोलणें व्हावयाचें तें महादजीच्या तर्फेच होऊं लागलें.

३ साल्बाईच्या तहानंतर महादजीनें आपलें लक्ष दिल्ली दरबाराकडे वळविलें. त्यानें डी बायन नांवाचा एक फ्रेंच अंमलदार नोकरीस ठेविला व त्याच्या देखरेखीखालीं कवाइती फौज बनविली. दिल्लीस जाऊन महादजीनें बखेडा मोडला व बादशहा शहाअलम याची सत्ता कायम केली. तेव्हां बादशहानें खूष होऊन आपला मुलूख व फौज महादजीच्या स्वाधीन केली. व बादशहाच्या खाजगी खर्चाकरितां महादजीनें महिना पांसष्ट हजार रुपयांची नेमणूक करून दिली. बादशहानें ‘पेशव्यास वकील इ मुतालक’ हें पद दिलें व वकील इ मुतालकची नायबी महादजीस वंश-

परंपरा सांगितली. जेथें जेथें बादशाही सत्ता चालते तेथें तेथें गोवध होऊं न देण्याचेंही बादशहानें कबूल केलें. पुढें लवकरच रजपूत राजांनीं व पठाण सरदारांनीं शिंद्याविरुद्ध बंडें उभारिलीं. परंतु थोड्याच वेळांत त्यानें मुसलमानांचीं बंडें मोडलीं व रजपुतांस शरण यावयास लाविलें. मग उज्जनीस जाऊन तेथें फौजेची बाकी चुकवून आपल्या मुलुखाची त्यानें व्यवस्था केली.

४ नंतर महादजी आपल्या फौजेसह पुण्यास आला ( १७९२ ). त्यानें मोठ्या समारंभानें वकील इ मुतालक पदाचीं वस्त्रें सवाई माधवरावास अर्पण केलीं व त्याच दरबारांत पेशव्यानें महादजीस त्या पदाच्या नायबीचीं वस्त्रें दिलीं. पुण्याचा सर्व कारभार नाना फडणीस पहात असे. तो कारभार आपल्या हातीं यावा अशी महादजीनें खटपट सुरू केली. एकदां पेशवे व महादजी पर्वतीहून परत येत असतां हिराबागेच्या मागें पर्वतीच्या तलावांत नावेंत बसून चालले. तेव्हां नावाड्याशिवाय दुसरा कोणी परका माणूस तेथें नव्हता. ही संधी उत्तम आहे असें पाहून महादजीनें कारभार आपल्या हातीं देण्याविषयीं पेशव्यास विनंती केली. तेव्हां पेशव्यानें उत्तर केलें, " नाना व तुम्ही माझे दोन हात; उजवा हात नाना व डावा हात तुम्ही. या दोन हातांपैकीं कोणताही हात कमी झाला तरी मी लंगडा होणार ! याकरितां आहे ही व्यवस्था चालावी हें उत्तम ! "

५ आपण कारभार करावा असें पेशव्यांच्या मनांत नाहीं असें पाहून महादजीनें कारभार मिळविण्याचा प्रयत्न सोडून दिला. मग त्याचा व नाना फडणिसाचा हरिपंत फडक्याच्या मध्यस्थीनें एकोपा झाला. आतां मराठी राज्यास स्वस्थता लाभणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. दुर्दैवानें लवकरच महादजी वानवडी येथें नवज्वर होऊन मृत्यु पावला ( १७७४ ). पुढें त्याच वर्षीं हरिपंत फडके व अहिल्याबाई होळकरीण हीं

नररत्नेंही गमावलीं व मराठी राज्यांत चांगल्या माणसांचा तोटा पडूं लागला. शिंद्यांचीं सरदारीचीं वस्त्रें महादजीच्या इच्छेप्रमाणें त्याच्या भावाचा नातू दौलतराव यास देण्यांत आलीं. अहिल्याबाई गादीवर होती तेव्हां पासूनच होळकरांचा कारभार तुकोजी होळकर या सरदाराकडे होता अहिल्याबाईच्या मृत्यूनंतर इंदूरच्या गादीचा तो मालक झाला.

---

## ५३ खर्ड्यांची लढाई १७९५.

१ निजामाच्या प्रांतांतून मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखी यांबद्दल दरसाल खंडणी मिळत असे. अलीकडे राघोबाचें खूळ उत्पन्न झाल्यापासून ही खंडणी देण्याबद्दल निजामानें अळंटळं चालविली. पुढें इंग्रजांशीं तह झाल्यावर बाकी वसूल करण्यासाठीं नानानें तगादा चालविला. पण निजामाचा दिवाण मशीरउल्मुल्क दाद देईना. मराठ्यांचे पराक्रमी सरदार महादजी शिंदे व हरिपंत फडके वारले होते. तेव्हां लढाईचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं, असा निजामास धीर वाटूं लागला.

२ पेशव्यांचा वकील गोविंदराव काळे यानें निजामअलीस नानानें तयार केलेली एक याद दाखविली व सांगितलें कीं, दोन कोटी सात लक्ष रुपये पेशव्यांचें निजामाकडे येणें निघतें. तेव्हां मशीर म्हणाला, "या यादींतील कलमांचा अर्थ आम्हांला समजून देण्यासाठीं तुमच्या नानांस येथें आणलें पाहिजे." गोविंदरावानें उत्तर केलें, "नानास उद्योग आहेत ते सोडून ते येथें कसे येतील ?" मशीर आवेशानें बोलला "पहा, त्यांस लवकरच येथें आणतों तें !" एकदां करमणुकीसाठीं निजामानें तमाशा केला व त्यांत नाना व सवाईमाधवराव यांचीं सोंगें आणिलीं ! त्या वेळीं मात्र गोविंदराव काळे यानें उठून सांगितलें; "या अपमानाबद्दल तुमचे दिवाण मशीरउल्मुल्क यांस धरून नेऊन पुण्यास दारोदार

हिंडवूं. " मग काळे पुण्यास आला. हैद्राबादच्या हकीकती कळतांच नानानें लढाई करण्याचा निश्चय केला.

३ नानानें दौलतराव शिंद्यास आपली हिंदुस्थानांतील फौज व प्रख्यात सरदार जिऊबादादा बक्षी यांस आणवावें, असा हुकूम केला. त्याचप्रमाणें होळकर, भोंसले, गायकवाड, पटवर्धन, रास्ते, प्रतिनिधि इत्यादि सर्व जहागीरदारांस जलदीनें पुण्यास येण्याविषयीं लिहिलें. निजामअल्लीच्या पारिपत्यासाठीं दीड लाख फौज निघाली. दोन महिन्यांनीं ती सरहद्दीवर जाऊन पोहोंचली.

४ निजामअल्ली पन्नास साठ हजार स्वार व सतरा हजार गारदी यांसह चालून आला. तेव्हां भोंसल्यानें निजामावर बाणांचा पाऊस पाडला, व शिंद्यांनीं तोफांचा भडिमार फारच केला. या दोन्ही माऱ्यांपुढें निजामाचे स्वार पळून गेले; व खाशा निजामअल्लीच्या मनांत भीति उत्पन्न होऊन तो मागें हटला. इतक्यांत गारद्यांसही मागें फिरविण्याविषयीं निजामअल्लीकडून हुकूम आल्यामुळें गारदीही हटले. मग तें मोंगलांचे घाबरलेलें सैन्य खडर्याच्या गढीच्या आसपास उतरलें होतें, त्यावर मराठे छापा घालावयास आल्याची खोटीच हूल उठली; तेव्हां तें सारें आपलाच खजिना लुटून घेऊन रानोमाळ पळत सुटलें. वाटेंत मराठ्यांचे पेंढारी फिरत होते, त्यानीं या पळपुट्यांची सर्व चीजवस्त लुटून घेतली. आपल्या सैन्याची अशी दुर्दशा झालेली पाहून निजामअल्ली खडर्याच्या गढींत शिरला. दुसऱ्या दिवशीं मराठ्यांनीं त्यास घेरून तोफांचा मारा सुरू केला. नंतर दोन दिवस पराकाष्ठेचे हाल सोसल्यावर तिसऱ्या दिवशीं नबाबानें तहाचें बोलणें लाविलें. परंतु 'अगोदर मशीरास आमच्या हवालीं करा. मग तह करूं' असें पेशव्यांनीं बोलणें पडलें. तेव्हां तो स्वामिभक्त मशीर निजामास बोलला कीं, माझ्या जाण्यानें दौलत वांचत असेल तर मी खुषीनें जातों. ' मग

सर्व समारभाचा विरस होऊन स्वारी लवकर वाड्यांत परत आली !

५ या प्रसंगानें तर माधवरावाच्या प्रकृतीबद्दल सर्वांस अत्यंत काळजी वाटूं लागली. नानानें पेशव्याच्या हातून वायूच्या लहरींत केव्हां काय भयंकर गोष्ट होईल याचा नेम नाहीं असें जाणून त्याच्या भोंवतीं रात्रंदिवस माणसें ठेविलीं. पण दैवगति विचित्र असल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आश्विन शु० द्वादशीच्या दिवशीं वायूच्या लहरींत माधवरावानें रंगमहालांतून खोल कारंजावर उडी टाकिली. भयंकर जखम झाली. तिच्यामुळें तो तीन दिवसांनीं वारला. सवाई माधवराव वारल्यावर जो हाहाःकार झाला त्यास सीमा नव्हती. नानास तर अत्यंत दुःख झालें. त्यानें जीवापाड मेहनत करून पेशवाईचें रक्षण केलें; त्याचें शेवटीं चीज झालें नाहीं.

---

## ५५ पेशवे परतंत्र झाले !!

१ राघोबाच्या वंशास पेशवाईची गादी मिळूं न देण्याचा नानाचा विचार होता. त्यानें दौलतराव शिंदे, रघूजी भोंसले वगैरे सरदारांस परत बोलाविलें व सर्वांच्या संमतीनें 'यशोदाबाई ही माधवरावाची स्त्री जरी लहान आहे, तरी तिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नांवानें राज्यकारभार चालवावा' असा ठराव केला. पण बाळाजी विश्वनाथाचा औरस वंश हयात असतां दत्तक घेण्याची कल्पना दौलतराव शिंद्याच्या कारभाऱ्यांस पटली नाहीं. दौलतराव शिंदे बाजीरावास मिळाल्यास पेशवाई त्याला मिळणार हें निःसंशय होतें. या गोष्टीची खबर नानास लागली. त्यानें लागलीच शिंदे करणार तें आपणच अगोदर केल्यास भांडण्याचें मूळ राहणार नाहीं, असें पाहून बाजीरावास शिवनेरीहून सोडवून आणिलें. मग बाजीराव पेशवा झाला ( १७९६ ).

२ पेशवाई मिळतांच राज्याचा सर्व अधिकार आपल्या हातांत असावा

असें बाजीरावास वाटूं लागलें. आतां शिंदे हिंदुस्थानांत जाईल व मग नाना शिरजोर होईल, असा बाजीरावानें अंदाज केला. तेव्हां शिंद्याकडून अगोदरच नानास कैद करून टाकावें अशी त्यानें मसलत केली. शिंद्यानें नाना भेटीस आला असतां विश्वासघातानें त्यास पकडून अहमदनगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें (१७९७). या वेळीं शिंद्याचा सर्व कारभार त्याचा सासरा सर्जेराव घाटगे हा पहात असे. मग त्या घाटग्यानें पुण्यास नानाच्या लोकांचे भयंकर रीतीनें हाल करून त्यांच्यापासून पैका उकळिला. आतां शिंदे लवकरच उत्तर हिंदुस्थानांत जाईल अशी बाजीरावाची समजूत होती; पण शिंदे पुण्याहून जाईना. तेव्हां बाजीरावानें आपला भाऊ अमृतराव याच्या सल्ल्यानें शिंद्यास पकडावयाचें ठरविलें. मग एके दिवशीं अगदीं उत्तम संधि आली असतां बाजीराव कचरला. शिंदे मात्र सावध झाला. त्यानें बाजीरावाची खोडकी जिरविण्याकरितां नानास सोडिलें. यापुढें नाना फडणीस फार दिवस वांचला नाहीं. १८०० त तो वारला. 'खूप शर्तीनें राज्य राखणारा' नानाफडणीस अतिशय बुद्धिमान् असून कर्तबगार मुत्सद्दी होता. तो वारला व मराठशाहींतील जोम व ऐक्य नाहींसें झालें.

३ तुकोजी होळकर १७९७ त वारला. त्याचा मुलगा यशवंतराव होळकर मोटा शूर व पराक्रमी होता. त्याचें दौलतराव शिंद्याशीं भांडण झालें. दोघांनीं एकमेकांच्या राजधान्या जाळल्या. मग यशवंतराव पुण्यावर चाल करून आला. होळकराची व शिंद्याच्या फौजेची पुण्याजवळ लढाई होऊन तींत शिंद्याचा पुरता मोड झाला. युद्ध चाललें असतां बाजीराव पर्वतीवरून तें पहात होता. निकाल ऐकतांच तो पळून सिंहगडास गेला. यशवंतराव होळकरानें बाजीरावास परत बोलाविलें व पुणें शहर न लुटण्याविषयीं आपल्या फौजेस ताकीद केली; पण बाजीरावास होळकराचा भरंवसा आला नाहीं.

४ बाजीराव सिंहगडाहून निघून महाडास गेला व मागें राघोबानें सुरतेस जाऊन जसा इंग्रजांचा आश्रय मागितला, तसाच बाजीरावानें वसईस जाऊन त्यांचा आश्रय घेतला. तेथें इंग्रजांचा बाजीरावाशीं तह ठरला ( १८०२ ). त्यांत इंग्रजांनीं बाजीरावास नेऊन गादीवर बसविण्याचें कबूल केलें. यापुढें इंग्रजांनीं सहा हजार फौज व तोफखाना पेशव्याच्या राज्यांत ठेवावा; या फौजेच्या खर्चाकरितां सव्वीस लक्षांचा मुलूख बाजीरावानें तोडून द्यावा; इंग्रजांचा द्वेष करणाऱ्या कोणत्याही युरोपियन राष्ट्रांतील माणसास पेशव्यानें आश्रय देऊं नये; निजाम व गायकवाड यांच्याशीं इंग्रजांनीं असाच तह केला असल्यामुळें त्यांच्यांशीं जें कांहीं बोलणें बोलावयाचें तें इंग्रजांच्या मध्यस्थीनें बोलावें; या दोघांशिवाय इतर कोणत्याही राज्यकर्त्याशीं, फार काय शिंदेहोळकरासारख्या आपल्या सरदारांशीं देखील तह करावयाचा किंवा लढाई करावयाची ती पेशव्यानें इंग्रजांस विचारल्याशिवाय करावयाची नाहीं; अशी तहाची कलमें होती. मग दोन हजार कवायती फौज बरोबर देऊन इंग्रजांनीं पेशव्यास पुण्याच्या गादीवर नेऊन बसविलें. इंग्रजांचें बस्तान ठीक बसलें; पण तेव्हांपासून पेशवाई बुडाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## ५६ मराठी राज्याचा शेवट.

बाजीरावास इंग्रजांनीं पुण्यास आणून गादीवर बसविलें, तेव्हांपासून पेशव्यास स्वातंत्र्य असें मुळींच उरलें नाहीं. भोंसले, शिंदे, होळकर वगैरे मराठे सरदारांशीं कसलेंही बोलणें इंग्रजांच्या परवानगीशिवाय त्यास करतां येईनासें झालें. असें इंग्रजांचें सामर्थ्य वाढीस लागलें.

२ बाजीराव इंग्रजांचें सामर्थ्य आणखी वाढविण्यास व मराठ्यांचें कमी करण्यास कारण झाला. पेशवा आपल्या सर्व जहागीरदारांस दडपूं लागला. त्यानें प्रतिनिधि व रास्ते या सरदारांच्या जहागिरी जप्त केल्या,

व इतर लहान जहागीरदारांचीं संस्थानें खालसा केलीं. त्यामुळें मराठे सरदारांचीं मनें अगदीं चिडून गेलीं. मुलुखांतील किल्लेकोट यांचे खर्च तोडिले. मामलती मक्त्यानें देण्याचें काम झपाट्यानें सुरू होऊन शेतकरी लोकांस मक्तेदार अगदीं पिळून काढूं लागले. रयतेची दाद कोणीच घेईना. शिवाय बाजीराव व्यसनी असल्यामुळें प्रजेच्या त्रासांत भरच पडली.

३ सन १८१० त रेसिडेंटच्या जागीं एलफिन्स्टन याची नेमणूक झाली. हा हुशार असून इंग्रजांच्या हिताविषयीं अत्यंत दक्ष असे. त्यानें बाजीराव गबाळ, अन्यायी व भित्रा आहे असें पाहून इंग्रजांचें वर्चस्व पुष्कळच वाढविलें. हें बाजीरावास खपलें नाहीं, व इंग्रज आणि पेशवे यांजमध्यें नेहमीं भांडणें होऊं लागलीं.

४ गायकवाडाकडे पेशव्याची बरीच बाकी होती. तिचा हिशेब करण्याचें काम इंग्रजांतर्फे व्हावयाचें होतें. तें त्यांनीं बराच वेळ लांबणीवर टाकलें. शेवटीं बाजीरावानें फारच तगादा केल्यावरून इंग्रजांनीं बडोदेकराचा दिवाण गंगाधरशास्त्री पटवर्धन यास हिशेब करण्यासाठीं पुण्यास पाठविलें. तो एकदां सहज पेशव्याबरोबर पंढरपुरास गेला असतां तेथें त्याचा खून झाला. इंग्रजांनीं चौकशी केल्यावर तो खून त्रिंबकजी डेंगळ्याच्या सांगण्यावरून झाला असें त्यांस समजलें, व त्यांनीं त्रिंबकजीस आपल्या हवालीं करण्याबद्दल बाजीरावास निकड लाविली. तेव्हां त्यानें निरुपाय म्हणून त्रिंबकजीस इंग्रजांच्या स्वाधीन केलें. त्याला इंग्रजांनीं ठाण्यास कैदेंत ठेविलें. पण तेथून तो पळून गेला. फिरून बाजीराव व त्रिंबकजी या दोघांचा संबंध आहे, असा इंग्रजांस संशय आला. तेव्हां त्यांनीं त्रिंबकजीस एक महिन्याच्या आंत पकडून द्यावें, म्हणून बाजीरावास ताकीद दिली.

५ नंतर इंग्रजांनीं पेशव्याशीं नवीन तह केला ( १८१७ ). तो असाः– "राहिलेल्या बाकीबद्दल वर्षास साडेचार लक्ष रुपये गायकवाडा-

कडून घेऊन पेशव्यानें स्वस्थ बसावें. इंग्रजांस पलटणीच्या खर्चाकरितां मागें सव्वीस लाखांचा मुलूख दिला होता, तो आतां चौतीस लक्षांचा द्यावा." यापुढें इंग्रजांविषयीं त्याच्या मनांत पक्का द्वेष उत्पन्न झाला. संधि सांपडतांच हे इंग्रज आपलें सर्व राज्यच गट्ट करतील, असें त्यास वाटलें व एकदां सोक्षमोक्ष करून पाहण्याचा त्यानें निश्चय केला.

६ १८१७ च्या पावसाळ्यांत बाजीराव पंढरपुराहून माहुलीस गेला. तेथें तो इंग्रजांशीं युद्ध करण्याची तयारी करूं लागला. त्याचा मुख्य सेनापति बापू गोखले होता. त्यास पेशव्यानें लढाईची तयारी करण्यास सांगितलें, व शिंदे आणि भोसले यांजकडे वकील पाठविले. त्या वर्षींचा दसऱ्याचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा झाला. त्या दिवसापासून पेशव्यांची पुष्कळ फौज जमा होऊं लागली. पण येवढ्याशा अल्प तयारीनें हुशार इंग्रजांशीं युद्ध करून त्यांत जय मिळविणें अशक्य होतें. मराठे व इंग्रज यांच्या खडकी, कोरेगांव व अष्टें या तीन ठिकाणीं लढाया झाल्या. त्या तिन्हींतही मराठ्यांचा पराभव होऊन तिसरींत तर मुख्य सेनापति बापू गोखले पडला. नागपूरकर भोंसल्यानें थोडी हालचाल केली; पण त्याचाही पराभव झाला. होळकराच्या फौजेनेंही इंग्रजांशीं महिदपूर येथें गांठ घातली. पण तिचादेखील मोड झाला. अष्टें येथें पराभव झाल्याबरोबर बाजीराव पळूं लागला. शेवटीं तो नर्मदा उतरून इंदुराजवळ मालकम नांवाच्या इंग्रज सरदारास शरण गेला. तेव्हां इंग्रजांनीं त्याला आठ लक्षांची वार्षिक नेमणूक ठरवून देऊन गंगाकांठीं ब्रह्मवर्तास ठेविलें. अशा शोकप्रद रीतीनें पेशवाईचा अंत झाला! १८१८.

---

## ५७ सातारचे नामधारी छत्रपती.

सन १८४८ त बाजीरावास ब्रह्मवर्तास ठेवून पेशव्याचा सर्व मुलूख इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतला. पण त्या वेळीं मराठे लोक अगदींच

असंतुष्ट होऊं नयेत म्हणून साताऱ्याच्या राजाकडे चौदा लक्षांचा मुलूख ठेवून त्यांनीं सातारचें संस्थान कायम ठेविलें. शाहू राजा वारला तेव्हां त्याच्या मागून सातारच्या गादीवर बसलेल्या रामराजानें पेशव्यास याद़ी लिहून दिली. तेव्हांपासून सातारचे राजे केवळ नांवाचे राजे असा प्रकार झाला. नवीन पेशवे होण्याच्या वेळीं पेशवाईचीं वस्त्रें सातारच्या राजाकडून घेण्याचा परिपाठ शेवटपर्यंत चालला होता. पण सातारच्या राजाकडे खरी सत्ता अशी कोणत्याच गोष्टींत उरली नव्हती. राज्यकारभाराचें सर्व काम पुण्यास पेशवे आपल्या मुखत्यारीनें करीत. त्यांत सातारच्या राजाचा काडीइतकाही संबंध नव्हता. त्यामुळें रामराजापासून जे सातरचे राजे झाले ते केवळ नामधारी होत.

२ रामराजा सन १७७७ पर्यंत सातारच्या गादीवर होता. त्याच्या अंगीं मुळींच कर्तृत्व नव्हतें. त्याच्यामागून बावीकर भोंसल्याच्या वंशांतील एका मुलास शाहू असें नांव देऊन नाना फडणिसानें गादीवर बसविलें. या शाहूचा भाऊ चतुरसिंग म्हणून शूर होता. पेशव्यांची सत्ता नाहींशी करून सातारच्या राजास स्वतंत्र करण्यासाठीं त्यानें अतोनात खटपट केली. पण शेवटीं परशरामभाऊ पटवर्धनानें त्याचा पराभव केला. तेव्हां तो उत्तर हिंदुस्थानांत पळून गेला. या शाहूस आबासाहेब म्हणत. हा सन १८०८ त वारला.

३ शाहूला असे तीन मुलगे होते; प्रतापसिंह, शहाजी, व रामराजा. वडील प्रतापसिंह बापामागून गादीवर बसला. याची कारकीर्द चालू असतांच सन १८१८ त पेशवाईचा अंत झाला ! तेव्हां इंग्रजांनीं चौदा लक्षांचा मुलूख देऊन प्रतापसिंहासच गादीवर ठेविलें. हा प्रतापसिंह मोठा धोरणी व चतुर होता; व त्यानें सातारच्या संस्थानचा राज्यकारभार योग्य रीतीनें चालविला परंतु इंग्रजांस त्याच्याबद्दल सं-

शय येऊन त्यांनीं सन १८३९ त त्यास गादीवरून काढून काशीस नेऊन ठेविलें.

४ त्याच्यामागून त्याचा भाऊ शहाजी हा साताऱ्च्या गादीवर आला. तो नऊ वर्षे राज्य करून सन १८४८ त वारला. त्याला औरस पुत्र नव्हता. मरणापूर्वी त्यानें दत्तक घेतला होता; परंतु या वेळीं डल-हौसी नांवाचा इंग्रज कलकत्त्यास गव्हर्नर जनरल होता. संस्थानि-कास औरस पुत्र नसला कीं तें संस्थान खालसा करावयाचें, म्हणजे इंग्रजी मुलखास जोडावयाचें, अशी युक्ति तो अमलांत आणीत असे. त्यानें नागपूर, झांशी, तासगांव, अयोध्या येथील राज्यें खालसा केलीं होतीं; त्याचप्रमाणें शहाजीस औरस संतति नव्हती, या सबबीवर त्यानें साताऱचें राज्य खालसा केलें. असा मराठी राज्याचा शेवट झाला !

---

## ५८ मराठी राज्य कां बुडलें ?

१ शिवाजीनें स्वराज्यस्थापना केली त्या वेळीं श्रीरामदासांनीं '**मराठा तितुका मेळवावा**' हा उपदेश केला. त्या वेळीं रामदासांचा हा उपदेश महाराष्ट्रांतील सर्व कर्त्या माणसांस पटला होता असें त्यांच्या आचरणावरून दिसून येतें. परंतु पुढें रामदासासारख्या उपदेशकांची ही परंपरा मुळींच चालू राहिली नाहीं. बाळाजी बाजीरावाच्या वेळची हिंदुपदपातशाहीची कल्पना कांहीं थोड्या मुत्सद्यांसच पटली होती, व मराठमंडळापैकीं बरेच सरदार ही कल्पना यशस्वी करण्यासाठीं अंग चोरून काम करीत होते. शिवाय पानिपतच्या लढाईनंतर मराठमंडळांतील निरनिराळे सरदार एकीनें असे काय ते खर्ड्याच्याच लढाईत लढले. बाकी शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले यांपैकीं प्रत्येकजण आप-आपला स्वार्थ साधण्यांत गर्क झाला होता. एकंदर मराठमंडळ विजयी होत आहे कीं अवनत दशेस जात आहे याची कोणीच फिकीर करीत

नव्हता. इकडे पुण्यास पहावें तों राघोबानें पेशवा होण्याची हांव धरली. त्यामुळें हें घरगुती विघ्न आवरतांनाच तेथील मुत्सद्यांची तारांबळ उडाली. मराठ्यांचें एकंदरीनें पाऊल पुढें कां मागें, याचा विचार करण्यासही कोणास फुरसत उरली नाहीं.

२ दुसरें असें कीं, शेवटीं मराठी राज्यास—यापेक्षां मराठे सरदारांस म्हटलें तर जास्त बरोबर होईल—इंग्रजांशीं तोंड द्यावें लागलें. सैन्याची शिस्त, लांब पल्ल्याच्या तोफा व सुधारलेल्या बंदुका यांचा इंग्रजांस पक्का आधार होता. त्यामुळें इंग्रज व इकडील लोक यांच्यामध्यें जीं युद्धें झालीं त्यांत थोडक्या इंग्रज सोजिरांना इकडील बऱ्याच मोठ्या सैन्याचाही पराभव करतां येई. बाळाजी बाजीरावाच्या वेळेपासूनच इंग्रज—फ्रेंचांच्या इकडील लोकांशीं लढाया होत असत; तेव्हां मराठी मुत्सद्यांचें लक्ष या इंग्रजांच्या साधनांकडे वेधावयास पाहिजे होतें, परंतु तसें झाल्याचें फारसें आढळत नाहीं. महादजी शिंद्यानें फ्रेंच लोक चाकरीस ठेवून ही शिस्त इकडील लोकांत आणण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट खरी, परंतु तसा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर व सर्व मराठमंडळानें केलेला दिसत नाहीं. आतां याचेंही कारण घरगुती भांडणांतच वेळ व श्रम खर्च होऊन राष्ट्रीय दृष्टीनें कांहींच काम नाना फडणिसासारख्यासही करतां आलें नाहीं हेंच होय !

३ तिसरा मुद्दा असा कीं, पानिपतानंतर मराठमंडळांत कर्ते पुरुष फारसे निघाले नाहींत. पहिले माधवराव, महादजी शिंदे व नाना फडणीस हीं तीन नांवें गाळलीं तर बाकीच्या मंडळींत सर्व मराठी साम्राज्यावर छाप बसवूं शकेल असा पुरुष आढळत नाहीं. यावरून एकी, ज्ञान व सामर्थ्य हीं अनुकूल झालीं तर राज्यस्थापना होते; परंतु त्याच्या उलट यांचा अभाव झाला असतां राज्यें धुळीस मिळतात, हा मुख्य धडा शिकतां येण्यासारखा आहे.

# मराठी राज्याची अंतर्व्यवस्था.

१ शिवाजीनें केलेल्या राज्यव्यवस्थेचें वर्णन मागें चौदाव्या प्रकरणांत केलें आहे. आतां मराठी राज्यांत मुख्यतः पेशव्यांचे वेळीं जी व्यवस्था चालू होती तिचें वर्णन या प्रकरणांत करावयाचें.

## सैन्यव्यवस्था.

२ फौजः—पेशव्यांची हुजरात व दक्षिणेकडील सरदारांची फौज मिळून ५०००० घोडेस्वार असत. मराठ्यांचीं पायदळ व तोफखाना हीं कधींच चांगल्या स्थितींत नव्हतीं. किल्ल्यावरील शिबंदी सोडून पेशव्यांचें १०००० पायदळ असे. त्यांत गारद्यांचा व आरबांचाच भरणा विशेष असे. याशिवाय गायकवाड, भोंसले यांचें दहा पंधरा हजार सैन्य, शिंदे–होळकर यांचें कमींत कमी तीस हजार सैन्य, हीं सैन्यें जमेस धरलीं तर पेशव्यांच्या हाताखालीं एकंदर एक लाख सैन्य होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत पेंढाऱ्यांची गणति केलेली नाहींच.

३ आरमारः—मराठ्यांच्या आरमाराची स्थापना शिवाजीच्या हातूनच झाली. मालवणचा सिंधुदुर्ग, कुलाबा, सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग इत्यादि जंजिरे त्यानें बांधिले, व हींच मराठ्यांच्या आरमाराचीं मुख्य ठाणीं होतीं. इ. स. १७५६ मध्यें बाळाजी बाजीरावानें कान्होजी आंग्र्याचे मुलगे मानाजी व तुळाजी यांजमध्यें तंटा माजला असतां तुळाजीस इंग्रजांच्या साहाय्यानें चीत केलें व विजयदुर्ग हें ठाणें आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हांपासून पेशव्यांच्या राज्यांत ‘ सुभा आरमार ’ अस्तित्वांत आला. विजयदुर्गच्या आरमारामध्यें लढाऊ लोक सुमारें दोन तीन हजार असत व चाळीसपासून पन्नासपर्यंत लहानमोठीं जहाजें असत.

## मुलकी व्यवस्था.

४ जमीनमहसूलः—जमाबंदीच्या व्यवस्थेसाठीं पेशव्यांच्या प्रत्यक्ष

अमलाखालील प्रांताचे बारा सुभे केले होत. पुष्कळ गांवें मिळून एक तर्फ होई. त्यावर शेखदार म्हणून अम्मलदार असे पुष्कळ तर्फ मिळून महाल. त्यावरील अधिकाऱ्यास मामलेदार म्हणत. पुष्कळ महाल मिळून सुभा होई व त्याच्यावर सुभेदार असे. वसुलाचें काम मामलेदारावरच फार पडे. तो महालांतील देशमुख, देशपांड, पाटील, कुळकर्णी यांच्या मदतीनें तें काम करी. पूर्वी मलिकंबरानें जमिनीच्या प्रती लावून धाऱ्याचे नियम बसविले होते. त्याच्या प्रतबंदीस तनखा म्हणत. सदाशिवराव-भाऊनें नवीन मोजणी करून जमिनीच्या प्रती लाविल्या व धाऱ्याचे नवीन नियम केले. भाऊची प्रतबंदी फक्त पुण्याच्या सुभ्यास सुरू झाली होती. तिला ' कमाल " म्हणत. जमिनीपासून येणाऱ्या वसुलास " ऐन-जमा " म्हणत व बाकीचा वसूल " शिवाय जमा " या सदराखालीं येई. ज्या ठिकाणीं ऐन जिनसी वसूल घेण्याची वहिवाट होती त्या ठिकाणीं शेतकऱ्याचा बियाणें, मजुरी इत्यादि सदरांवर झालेला खर्च घालवून राहिलेल्या धान्यापैकीं द्वितीयांश किंवा तृतीयांश शेतकऱ्यास राखीत व बाकीचें सरकारी वसूल म्हणून घेत. वसुलाबद्दल जेथें द्रव्य घेण्याची वहिवाट होती तेथें दर खंडी उत्पन्नामागें १५. २० अगर ३०, रुपये असा वसुलाचा दर होता.

५ सवलती:––तळीं, पाणी अडविण्यास बांध, सार्वजनिक रस्ते, प्रवासी लोकांसाठीं विहिरी, इत्यादि लोकोपयोगी कामें करण्यासही सर-कार नेहमीं तयार असे. एकाद्या गांवची खराबी होऊन जमीन पडित झाल्यास कांहीं वर्षेपर्यंत वसुलाचा अगदीं हलका दर ठेवून व इतर सव-लती देऊन जमीन लागवडीस आणण्यास उत्तेजन मिळे.

६ इतर कर––जमीनमहसुलाशिवाय इतर कांहीं कर होते. त्यांतील मुख्य म्हणजे परमुलुखांतून पेशव्यांच्या मुलुखांत येणाऱ्या मालावर घेतली जाणारी जकात हाय. मराठ्यांच्या बंदरांत समुद्रावरून येणाऱ्या मालावर

जकात घेत, ती 'सुभा आरमाराकडे' जमा होई. मिठावरही कर पडे. घर व दुकानें यांजवर 'मोहतर्फा' नांवाचा एक कर वसूल करीत. त्याचप्रमाणें तूप, कुरणें, लग्नविधि, म्हशी इत्यादींवर कर असून मच्छेमारीबद्दलही कांहीं जकात वसूल करीत. नद्यांवर नावा सरकारतर्फे राखण्यांत येत असून त्यांजवर बहुधा कर नसे. पण कोठें कोठें या नावांचे मक्ते देण्यांत येत असून मक्तेदार रयतेकडून कर वसूल करीत.

७ उत्पन्न—मराठ्यांच्या एकंदर मुलुखाचें उत्पन्न साडेसात कोटी होतें. खुद्द पेशव्यांच्या अंमलाखालील प्रांताचें उत्पन्न अडीच कोट होई. पेशव्यांना नेहमीं स्वाऱ्या कराव्या लागत असल्यामुळें दौलत सारखी कर्जाखालीं असे. माधवराव वारला तेव्हां पेशव्यांस चोवीस लक्ष रुपये कर्ज होतें. पुढें नाना फडणिसानें कर्ज बरेंच कमी केलें व शेवटीं रावबाजीच्या वेळीं तर खजिन्यांत शिल्लकच होती.

## न्यायव्यवस्था.

८ दिवाणी—महाराष्ट्रांतील वतन, दत्तक, वांटणी इत्यादि बाबींत जे वाद उत्पन्न होत, त्यांचा निर्णय करण्याचे सर्वांत खालचे अधिकारी म्हणजे त्या गांवांतील शिष्ट लोकांच्या सभा असत. या सभांस गोत हें नांव असून त्यांनीं करून दिलेल्या निवाडपत्रास गोत–महजर म्हणत. एकादा वाद परभारें पाटलाकडे अगर इतर सरकारी अधिकाऱ्यांकडे नेल्यास ते सामान्यतः वाद्यास गोत–महजर करून आणण्यास सांगत असत. त्या गोतांच्या निवाड्यानें वाद्यांचें समाधान न झाल्यास फिर्याद देशकाकडे जाई. देशकामध्यें परगण्यांतील शिष्ट लोक असत. देशकाच्या निवाडपत्रास देशक–महजर अशी संज्ञा असे. गोतांच्या व देशकांच्या सभा सामान्यतः देवालयांत, नदीच्या तीरीं, अथवा दोन नद्यांच्या संगमावर भरत. गोत व देशक यांच्याहून वरिष्ठ अधिकारी ह्मटले म्हणजे राजानें नेमिलेला न्यायाधीश व खुद्द राजा हे होत. परंतु न्याया-

धीश व राजा निवाडा करीत तो देशकाचे बरोबर करीत. यावरून न्यायाच्या कामांत लोकांचा हात अगदीं वरिष्ठ संस्थेपर्यंत होता हें स्पष्ट आहे. जातिभ्रष्टास पावन करून घेणें यासारख्या धार्मिक वादाचा निकाल करण्याचें काम श्रीशंकराचार्यांसारख्या धर्मगुरूकडे सोंपविलेलें असे.

९ फौजदारी:—गांवांत बंदोबस्त ठेवण्याचें काम पाटलाकडे असे, व त्याला कुलकर्णी, चौगुला व गांवचा महार हे मदत करीत. मामलेदाराजवळ स्वार बरेच असत. त्यांचाच तो आपल्या महालांत शांतता व व्यवस्था राखण्याच्या कामीं हल्लींच्या पोलीससारखा उपयोग करी. एखाद्या गांवांत फौजदारी गुन्हा घडल्यास त्याचा निवाडा गांवच्या पंचांनीं करावा, अशी वहिवाट असे. पुण्यासारख्या मोठमोठ्या शहरांतून कोतवाल असत. त्यांजकडे शहरांतील 'मातबर कजिये' निकालासाठीं येत. सर्व न्यायाधिकाऱ्यांवर एक मुख्य न्यायाधीश असे, व त्याजपुढें फौजदारी व दिवाणी या दोन्ही स्वरूपांचे खटले चालत. या पदावर सन १७५९पासून न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे हे होते.

१० शिक्षा:—चोरी व दरोडेखोरी या दोन्ही प्रकारचे गुन्हे करणारांस अटकेंत ठेवावयाची, ठार मारण्याची, अगर हात, पाय, कान कापण्याची शिक्षा करण्यांत येई. राजद्रोह, फंदफितुरी यांजसारख्या भयंकर गुन्ह्यांबद्दल कैद, मिळकतीची जप्ती अगर हातपाय तोडणें, तर कधीं कधीं कडेलोट असल्या भयंकर शिक्षा देत.

११ शिक्षण:—मराठेशाहींतील शिक्षणाचे तीन भाग करितां येतील. १ वैदिक, २ शास्त्रीय व ३ व्यावहारिक. वैदिक ब्राह्मण दशग्रंथांचें पठण करीत व पंडित लोकांनीं साही शास्त्रांचा अभ्यास करण्याचें काम पत्करिलें असे. आतां तिसरें व्यवहारशिक्षण. हें बहुतेक सर्व ब्राह्मणांना, वैश्यांना व उच्च प्रतीच्या मराठ्यांना मिळत असे. व्यवहारशिक्षणास अक्षरांचे कित्ते गिरविण्यापासून आरंभ होई. पुढें त्यांत

हिशेबी गणित, जमाखर्चाच्या पद्धति, भूमापन, पत्रें लिहिण्याचे मायने, मराठी कविता यांचा समावेश होई. साधुसंतांचें त्या काळीं समाजावर मोठेंच वजन होतें. म्हणून त्यांच्या कथाकीर्तनांनीं धर्माची जागृति राहून समाजांत शुद्ध आचार व विचार यांचा फैलाव होई. शिवाय प्रत्येक संताच्या मठांत हस्तलिखित पोथ्यांचा मोठा संग्रह असून त्याचें पठन व अभ्यास नित्य चालू असे. निरनिराळ्या कलाकौशल्यांचीं कामें पिढीजाद चालत आल्यानें त्यांत वाकबगार लोकांची कधींही तूट पडली नाहीं; त्या काळीं मराठे हे 'राज्यकर्ते' असल्यामुळें त्यांस लष्करी शिक्षणाची अत्यंत आवड होती. जार, बैठकी यांजसारखा व्यायाम घेऊन शरीर सुदृढ करावें; घोड्यावर बसावें, तरवारी, भाले इत्यादि हत्यारें चालवावीं; याचें तर त्यांस जसें कांहीं बाळकडूच लागलेलें होतें! मी लढाईवर जाईन व कीर्ति मिळवीन अशी महत्त्वाकांक्षा हजारों तरुणांत दिसून येई.

१२ दक्षिणा:—दरवर्षी श्रावणांत दक्षिणा वांटण्याचा समारंभ होई. त्या वेळीं हिंदुस्थानच्या सर्व भागांतून वैदिक, पंडित, ज्योतिषी, वैद्य, इत्यादि विद्वानांच्या झुंडीच्या झुंडी येत; व त्यांना विद्वत्तेनुरूप दक्षिणा मिळे. साधारण ब्राह्मणांस रमण्यांत दक्षिणा वांटीत. पण जे मोठे विद्वान् असत त्यांची सरकारी वाड्यांत संभावना होई. देवालयांस इनामें करून दिलेलीं असत.

१३ टपाल:—जेव्हां मराठी फौजा बाहेर मुलुखास जात, तेव्हां त्यांच्याशीं पत्रव्यवहार करण्याकरितां जासूद असत. सावकार वगैरे लोकांनीं आपल्या हुंड्या लांब लांब नेण्यास माणसें ठेवलेलीं असत. तीं ठरीव वेळीं निघत. लांब राहणाऱ्या आप्तेष्टांस ज्या कोणास पत्र पाठवावयाचें असे तो सावकाराच्या नोकराजवळ आपलें पत्र देई.

१४ टांकसाळ व नाणीं:—इ. स १६६४ मध्यें शिवाजीनें

रायगड येथें टांकसाळ उघडून आपल्या नांवचीं नाणीं पाडण्यास सुरवात केली. सोन्याचे होन, रुप्याचीं नाणीं व तांब्याचे शिवराई हीं नाणीं त्या वेळचीं होत. पेशवाईत नाणीं तयार करण्याची परवानगी खासगी व्यक्तींस देण्यांत येई. नाशिक, चिंचवड, तळेगांव दाभाडे, चांदवड इत्यादि ठिकाणीं टांकसाळी चालविण्याचे मक्ते दिल्याचे दाखले आढळून येतात. बाळाजी बाजीरावाचा मेहुणा मल्हार भिकाजी रास्ते यानेंही पहिल्यानें बागलकोट व नंतर वाई येथें टांकसाळ चालविली असून ' मल्हारशाई रुपये 'हे नमुनेदार नाणें म्हणून पेशवाईत प्रसिद्ध असत.

१५ पदव्या व इनामें—त्या काळीं मराठ्यांच्या हातून अ णित पराक्रम होत. अशा मर्दुमकी गाजविणाऱ्या योद्ध्यांस पदव्या व इनामें देण्यांत येत. लढाईत पडलेल्या अगर जखमी झालेल्या लढवय्यांच्या कुटुंबास उदारपणानें इनामें व बक्षिसें देण्यांत कधींही कसूर होत नसे. केव्हां केव्हां मुलाची त्याच्या मृत बापाच्या पदावर नेमणूक होई. आजारी लोकांना फुकट औषधें देण्याकरितां सुप्रसिद्ध व कुशल वैद्य आणि हकीम नेमिलेले असत; व या कामगिरीबद्दल त्यांना गांवें इनाम दिलेलीं असत.

१६ सांपत्तिक स्थितिः—गडी व शिपायी यांच्या पगाराचे दर महिना ३ रुपयांपासून ७ रुपयांपर्यंत असत. गवंडी, सुतार, इत्यादिकांना रोजीं ६ आण्यांपासून १० आण्यांपर्यंत मजुरी पडे. कारकुनांस सात रुपयांपासून दहा रुपये महिना पगार मिळे. परंतु त्या वेळचे बाजारभाव पाहिले तर बहुतेक सर्व संसारोपयोगी रोज लागणारे धान्यादि पदार्थ अतिशय स्वस्त होते. याशिवाय मराठ्यांच्या परमुलखावर स्वाऱ्या सुरू असल्यामुळें सर्व हिंदुस्थानांतून महाराष्ट्राकडे संपत्तीचा एकसारखा ओघ वहात होता. त्यामुळें सरकारी कर देणें अगर संसार चालविणे हीं कामें लोकांस मुळींच जिकिरीचीं वाटत नसत.

१७ व्यापार व उद्योगधंदे:—अरबस्थानांतील लोक घोड्यांचा व्यापार करीत असत. त्यांस कोंकण बंदरांत वसाहत करून राहण्यास उत्तेजन देण्यांत आलें. त्यांना जकात वगैरे कर माफ केला होता. माल घेऊन येणाऱ्या युरोपिअन व्यापाऱ्यांसही सवलती ठेविल्या होत्या. शहरांची भरभराट व्हावी म्हणून धंदेवाले लोक आणून त्यांना वस्ती करण्यास हरएक तऱ्हेनें सरकार मदत करी. जमीन मोफत देत व कर माफ करीत.

## परिशिष्ट–१. सनावली.

१६३० शिवाजीचा जन्म.
१६४६ तोरणा घेतला.
१६५९ अफझलखानाचा वध.
१६६५ पुरंदरचा तह.
१६६६ शिवाजीचें दिल्लीस गमन व सुटका.
१६७० तानाजीनें सिंहगड घेतला.
१६७४ शिवाजीस राज्याभिषेक.
१६८० शिवाजीचा मृत्यु.
१६८३–१७०७ औरंगजेबाची दक्षिणची स्वारी.
१६८६–१६८७ विजापूर व गोवळकोंडे येथील राज्यांचा नाश.
१६९० संभाजीस तुळापुरीं जिवें मारिलें.
१७०७ शाहूची सुटका.
१७१३ बाळाजी विश्वनाथास पेशवाई.
१७१९ स्वराज्याची सनद.
१७३१ डभईची लढाई.
१७३८ भोपाळचा वेढा.
१७३९ वसईचा वेढा.
१७४० बाजीरावाचा मृत्यु.
१७४३ माळव्याची सनद.
१७४९ शाहूचा मृत्यु.
१७५० पुणें राजधानी झालें, राणोजी शिंद्याचा मृत्यु.
१७५८ अटकेवर भगवा झेंडा.
१७६० उदगीरची लढाई.
१७६१ पानिपतची लढाई.
१७६३ राक्षसभुवनची लढाई.
१७६६ मल्हारराव होळकराचा मृत्यु.
१७७२ माधवरावाचा मृत्यु.
१७७३ नारायणरावाचा खून.
१७७५–१७८३ इंग्रजांशीं लढाई.

| | |
|---|---|
| १७९२ | ' वकील इ मुतालक ' या पदवीचें पेशव्यांस अर्पण. |
| १७९४ | महादजीचा मृत्यु. |
| १७९५ | खर्ड्याची लढाई, सवाई माधवरावाचा मृत्यु. |
| १८०० | नानाफडणिसाचा मृत्यु. |
| १८०२ | वसईचा तह. |
| १८१८ | पेशवाईचा शेवट. |
| १८४८ | मराठी राज्य खालसा झालें. |

## राजे.

| | |
|---|---|
| शिवाजी | १६७४—१६८० |
| संभाजी. | १६८०—१६८९ |
| राजाराम. | १६८९—१७०० |
| शिवाजी. | १७००—१७०८ |
| शाहू. | १७०८—१७४९ |
| रामराजा. | १७५०—१७७७ |
| दुसरा शाहू | १७७७—१८०८ |
| प्रतापसिंह | १८०८—१८३९ |
| शहाजी. | १८३९—१८४८ |

## पेशवे.

| | |
|---|---|
| बाळाजी विश्वनाथ. | १७१३—१७२० |
| बाजीराव बल्लाळ. | १७२०—१७४० |
| बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब. | १७४०—१७६१ |
| माधवराव बल्लाळ. | १७६१—१७७२ |
| नारायणराव बल्लाळ. | १७७२—१७७३ |
| रघुनाथ बाजीराव | कांहीं महिने. |
| गंगाबाई. | ,, ,, |
| माधवराव नारायण | १७७४—१७९५ |
| बाजीराव रघुनाथ. | १७९६—१८१८ |

# परिशिष्ट-२. कठिण शब्दांचा कोश.

आंतबट्ट्याचा–नुकसानीचा.
उच्चाटन—हकालपट्टी.
कच खाणें–भीति धरणें, माघार घेणें
कब्जा—ताबा.
कमाविसदार—मामलेदार.
खलबत–पुष्कळ माणसें एका ठिकाणीं जमून करितात तो विचार.
खवासखाना—हत्तीचे अंबारींतील पाठीमागची जागा. ही जागा मोठी मानाची असे.
खळी—शत्रु.
खिजमतगार—सेवक.
गनीम—शत्रु.
गोट—तळ.
चौथाई—वसुलाचा चतुर्थांश.
जरब—वचक, धाक.
जिरटोप—लोखंडी टोप.
जंजिरा–समुद्रकिनाऱ्यावरील किल्ला.
डेरा—तंबू.
तांडा—समुदाय.
दरफदार—हिशेब तपासणारं अधिकारी.
दस्त—कबुलीचा कागद.
दिलेरी रुस्तुमी—पराक्रम. दिलेर व रुस्तुम हीं दोन महायोद्ध्यांचीं नांवें आहेत.

नक्षा—ताठा
नायबी—मुखत्यारी.
निर्वेध—सुरक्षित.
नौबत—नगारा.
पंचहजारी—पांच हजार स्वारांची.
पथक—सैन्याची तुकडी.
पद—किताब.
पोत—जाळून उजेड पाडण्याकरितां तेलांत बुडवून गुंडाळलेलीं फडकीं.
फत्ते—जय.
फंदाफितुरी—बंडाळी.
फर्मान्—सनद.
बक्षीगिरी—सेनापतीची जागा.
बरकंदाज—बंदुकवाला.
बिचवा—एक प्रकारचें हत्यार.
बिनी—अघाडी.
बेचिराख—उजाड.
मनसब—स्वार बाळगण्याचा हक्क व त्याकरितां उत्पन्नाची नेमणूक.
मुजरा—सलाम.
मुतालीक—मोठ्या अधिकाऱ्याचा दिवाण.
मोर्चा—एकाद्या ठिकाणावर हल्ला करण्याच्या वेळीं वाळूचीं पोतीं ठेवून त्यांजवर तोफा ठेवतात ती

जागा.

लघु—हलकट, क्षुद्र.

वकील–ई–मुतालक—बादशहाचा खास प्रतिनिधि.

विवंचना—चिंता.

व्यूह—कारस्थान, मसलत.

शक्कल—युक्ति.

शर्त—अट.

शिबंदी–किल्ल्याच्या रक्षणास ठेविलेलें सैन्य.

शेलके—निवडक.

समेट—एकी.

सरदेशमुखी—वसुलाचा दशांश.

सरनोबत—सेनापति.

सामोपचारानें—गोडीगुलाबीनें.

सूत्रें असणें—संबंध असणें.

हक—कर, उदाहरणार्थ चौथाई.

हलाकीची स्थिती—दुर्दशा

हुजरात—खास पेशव्यांची फौज; सरदारांची नव्हे.

हुजुर मजलस —मुख्य सभा.

E
134